मासिकांक १२

# वार्षिकांक

# "ती"चं पान

तिच्याकडून सगळ्यांसाठी




संपादक: सौ. सायली अक्षय देशपांडे

# "ती"चं पान

तिच्याकडून सगळ्यांसाठी

“ती”चं पान ई-मेल:

tichapaan@gmail.com

मुखपृष्ठ आणि अंक मांडणी

अक्षय देशपांडे

# शुभेच्छापत्र

कोणतीही भाषा म्हणजे नुसतीच भाषा नसते. "ती" काही विशिष्ट शैलीचं, विचारांचं, आस्थेचं, मान्यतेचं, परंपरेचं, संस्कारांचं, संस्कृतीचं प्रतिबिंब असते. "ती" च्या माध्यमाने हा प्रवाह सतत सुरू असतो. कला आणि साहित्याच्या रूपाने "ती" चे दर्शन घडत असते. म्हणून एखाद्या भाषेचं लोप पावणं किंवा "ती" चं स्वरूप बिघडणं म्हणजे त्या विशिष्ट संस्कृतीवर, संस्कारांवर आघातच असतो. भाषेवर प्रेम करण्याची गरज ती यामुळेच.

हल्ली आपण बघतो वेगवेगळ्या सोशल मीडियावर तरुणवर्ग स्वतःला व्यक्त करू लागलाय पण भाषा मात्र दूषित होत चालली आहे. अशा परिस्थितीत भाषेचं पावित्र्य राखण्याचं कार्य जरुरीचे झाले आहे. "ती" चं पान मागील एक वर्षापासून हे काम व्यवस्थितरित्या करत आहे. नवोदित लेखिकांनी संधी मिळवून देत आहे. यासोबतच मान्यवर आणि ज्येष्ठ साहित्यिकारांचं मार्गदर्शन सुद्धा त्यांना प्राप्त करून देत आहे. हे सगळे प्रयत्न स्तुत्य आहे. सायली पेशवे देशपांडे सारख्या समर्थ लेखिकेने यासाठी  अक्षरशः जीव ओतला या कामाकरता त्यासाठी “ती” चे मन:पूर्वक अभिनंदन!

"ती" म्हणजे जननी, "ती" म्हणजे भाषा, " ती " म्हणजे स्त्री. या उपक्रमाच्या माध्यमाने भाषेचं संवर्धन आणि भावनिक दृष्ट्या स्त्री चं संरक्षण या दोन्ही गोष्टी साध्य करण्याचा मानस असावा असं मला वाटतं. सृजनाच्या या कार्याला उत्तरोत्तर यश प्राप्त होणे हीच अपेक्षा व्यक्त करतो. "ती" च्या पानाला एक वर्ष होतोय त्या निमित्ताने मनापासून शुभेच्छा व्यक्त करतो..!

श्री. मनोज जैन

नागपूर आकाशवाणी

# श्रेय नामावली

| | |
|---|---|
| प्रबंध संचालिका | सायली अक्षय देशपांडे |
| संपादक | सायली अक्षय देशपांडे |
| अतिथी संपादक व मार्गदर्शिका | सौ. शुभा साठे |
| टीम “ती” चं पान | |
| | तृष्णा आंबेकर |
| | अपूर्वा भालेराव |
| | रेणुका देशपांडे |
| | दिशा टिकेकर |
| | मृण्मयी सारंग |
| | भार्गवी बाबरेकर |
| | निर्मिती देवलसी |
| | संजीवनी मराठे |
| | स्वर्णिमा प्रकाश |
| | प्राजक्ता बर्वे |

# अंतरंग

टीप: लेखाच्या नावावर क्लिक/टॅप करून आपण आपल्याला हव्या असलेल्या लेखावर जाऊ शकता

(Works best with Adobe Acrobat Reader)


| | | |
|---|---|---|
| शिदोरी | रेणुका देशपांडे - कुकडे | १३ |
| साद | नीता खोत | १४ |
| सावट | मनीषा अतुल | १५ |
| थोडे काही आकळलेले | मंदार मोरोणे | १७ |
| कृष्ण ! | स्नेहा जोशी | १९ |
| मोरपीस | कल्याणी देशपांडे | २१ |
| प्रेमा स्वरूप आई | प्राजक्ता बर्वे | २४ |
| तिच्या मनातला चाफा | गौतमी करमरकर | २७ |
| संवाद-सेतू | डॉ. वंदना बोकील - कुळकर्णी | २९ |
| स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे | सायली देशपांडे | ३५ |
| मानवंदना | रेखा चवरे | ३८ |
| पुरुषी मानसिकता बदलायला कोणते युग उजाडेल? | वर्षा किडे - कुलकर्णी | ४२ |
| निसर्ग एक कलावंत...!!! | निर्मिती देवलसी | ५३ |
| कर्तुत्वशालिनी - लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर | सर्वेश फडणवीस | ५७ |

# अंतरंग

टीप: लेखाच्या नावावर क्लिक/टॅप करून आपण आपल्याला हव्या असलेल्या लेखावर जाऊ शकता

(Works best with Adobe Acrobat Reader)


| | | |
|---|---|---|
| दैवी स्वरावतार | सुनिल शिनखेडे | ६० |
| \|\| भाग्यदा लक्ष्मी बारम्मा \|\| | वादिराज लिमये | ६३ |
| पञ्चकन्या !! | डॉ. प्रज्ञा देशपांडे | ७२ |
| रिप व्हॅन विंकल | डॉ. सुरुची डबीर | ७६ |
| सुवर्ण काळातील अलौकिक रत्न - सचिन देव बर्मन | अर्चना साने | ८० |
| महाबळेश्वर येथील 'माल्कम पेठ' | अनुराग वैद्य | ८६ |
| धुरांच्या रेषा | जयश्री दाणी | ९० |
| गुंतता हृदय हे ! | स्वर्णिमा प्रकाश | ९६ |
| कळावे लोभ असावा...! | भार्गवी बाबरेकर | ९९ |
| सहवास | दिशा टिकेकर | १०२ |
| अधुरी एक कहाणी | अपूर्वा भालेराव | १०६ |
| लग्न जुळताना... | तृष्णा आंबेकर | ११७ |
| निसर्गाचे देणे भारतीयांचे लेणे | स्मिता होटे | १२५ |
| ओवाळणी | मीनाक्षी मोहरील | १३० |

# संपादकीय

सायली अक्षय देशपांडे

**देखणे ते हात ज्यांना निर्मितींचे डोहळे |**

**मंगलाने गंधलेले सुंदराचे सोहळे ||"**

कविवर्य बा.भ. बोरकर यांच्या  या सर्वश्रुत असलेल्या कवितेच्या ओळी "ती" चं पान या मासिकाच्या वार्षिकांकासाठी मला यथार्थ वाटतात. वाचन आणि लेखन या दोन्ही परस्परपूरक क्रिया आहेत. चांगलं लिहिण्यासाठी ज्याप्रमाणे चांगलं वाचावं लागतं त्याचप्रमाणे चांगलं वाचता यावं यासाठी चांगलं लिहावं लागतं. हा न्याय आजतागायत तसाच आणि तितकाच महत्वपूर्ण आहे.

मार्च २०२१ पासून "ती" चं पान या मासिकांकाचा प्रवास सुरु झाला. म्हणता म्हणता आमचं मासिक आज वर्षपूर्ती करतय याचा आनंद वर्णनातीत आहे.  या उपक्रमाचा एकमात्र उद्देश असा की हे "ती"चं पान आहे, तिने यात शब्दांच्या माध्यमातून व्यक्त व्हावं, तिचे विचार , तिच्या भावना तिने या माध्यमातून व्यक्त कराव्या आणि त्याही पलीकडे वाचन आणि लिखाण हे वृद्धिंगत व्हावं म्हणून हा प्रपंच. दर महिन्यात प्रकाशित होणारा अंक हा काहीतरी नवीन संकल्पनेवर आधारित असायचा. कधी कथा विशेषांक, कधी कविता, ललित, प्रवास, शाळा, पाऊस, कोजागरी आणि दिवाळी अशा वेगवेगळ्या विषयांचा समावेश आम्ही आमच्या प्रत्येक प्रकाशनात आम्ही केला.

हे जसं "ती"चं पान आहे तसंच या पानात त्याचंसुद्धा तितकंच महत्त्व आहे.

या संपूर्ण उपक्रमाचं वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक अंकात दोन शब्द हा मथळा हा त्यानीच लिहावा हा आग्रह! आणि त्या आग्रहाची पूर्तता प्रत्येक अंकात होत गेली.

आमचे सगळे मासिकांक हे सिद्धहस्त लेखिकांनी प्रकाशित केले. त्या सगळ्यांच प्रेम आणि आशिर्वाद कायमच आमच्या पाठीशी आहेत आणि ते राहतील.

या वार्षिकांकाबद्दल सांगायचे झाल्यास, हा वार्षिकांक सर्वांग सुंदर आहे. या अंकात दोन शब्द हा मथळा आपल्या सगळ्यांना सुपरिचित असलेल्या विद्यावाचस्पती स्वानंद पुंड यांनी शब्दांकित केला असून, आमच्या उत्तरोत्तर प्रगतीसाठी साक्षात गणपती आणि सरस्वती या देवतांचा आशिर्वादच जणू आम्हाला मिळाला, याबद्दल कृतार्थता वाटते. उर्वरित अंकाबद्दल बोलायचे झाल्यास, यात कथा आहेत, लेख आहेत, भटकंती आहे, कविता, ललित अशा विविधांगांनी नटलेला आहे. वार्षिकांक तयार करत असतांना हे प्रकर्षानी लक्षात ठेवलं की आजपर्यंत जे जे या उपक्रमात आम्हाला प्रमुख अतिथी आणि दोन शब्द लिहायला लाभले त्या सगळ्यांना या प्रवासात सामील करून घेऊन त्याचंसुद्धा लिखाण यात समाविष्ट करून घ्यावं असा विचार सर्वानुमते आम्ही केला आणि त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला. हा अंक वाचतांना तुम्हाला नक्कीच आनंद वाटेल असा विश्वास वाटतो.

तिच्या प्रत्येक ई - मासिकांकाला सर्वांगसुंदर करणारे आणि या संपादकीयची सुरुवात ज्या ओळीनी केली आहे ,अर्थातच “देखणे ते हात ज्यांना निर्मितीचे डोहळे” या ओळीला सार्थ ठरवणारे श्री. अक्षय देशपांडे यांच्या ऋणातच मी राहू इच्छिते.

हा वार्षिकांक छापील स्वरुपात ज्यांच्यामुळे आपल्या समक्ष आहे त्या पुणे येथील श्री. अमित भिडे यांचेसुद्धा खूप खूप आभार. अंततः या उपक्रमात सातत्याने लिहित्या असणाऱ्या सगळ्या लेखिकांचे मनापासून कौतुक आणि धन्यवाद.

यात जे जे म्हणून चांगलं आहे ते या सर्वांच्या प्रयत्नांचे फलित आहे, आणि उणिवा अर्थातच त्या आमच्या आहेत. या अर्थाने आमच्या प्रामाणिक प्रयत्नांचे स्वागत कराल या अपेक्षेत...

# "ती"चं पान प्रसादाचं

विद्यावाचस्पती स्वानंद पुंड

२०२० साल जगाच्या इतिहासातील काळा काळ रूपातच अवतरले. कोविड नावाच्या भयानक संकटाने सगळ्या जगाला त्रस्त केले. सगळ्या क्षेत्रांना आमूलाग्र हादरवले आणि बदलवले देखील. सगळ्याच क्षेत्रांसोबत शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्राचे देखील अपरिमित नुकसान झाले. सळसळत्या चैतन्याशी नाळ जोडलेली ही क्षेत्रे परस्पर सहसंबंधावर उभी असतात. त्यावरच मर्यादा आली.

कधीच न अनुभवलेल्या या विचित्र समस्येने सगळेच जण काही काळ किंकर्तव्यमूढ झाले. पण जगाचा इतिहास साक्षी आहे, येथे आलेल्या प्रत्येक समस्येवर याच क्षेत्रांनी उपाय शोधला आहे आणि जगाला दिला आहे.

यावेळची परिस्थिती देखील अपवाद नव्हती. आभासी शिक्षण आणि आभासी पद्धतीने अभिव्यक्ती हा नवीन मार्ग या क्षेत्राने चोखाळला. वयाच्या उत्तरार्धात देखील अनेकांनी या क्षेत्रात मिळवलेले प्रविण्य आणि केलेले उपक्रम खरोखरच स्तिमित करणारे आहेत.

इतर वेळी केवळ मनोरंजन किंवा कौटुंबिक संपर्कापुरती असणारी समाजमाध्यमे अभिव्यक्तीची आणि समाजप्रबोधनाची किती प्रभावी साधने होऊ शकतात? हे आपण याच काळात पाहिले.

घरात बसल्या बसल्या विश्वव्यापक होण्याची अद्वितीय संधी या निमित्ताने अनेकांना प्राप्त झाली. मोठमोठी प्रस्थापित माध्यमे प्राप्त होत नसली म्हणून काय झाले? या माध्यमावर मी सहज व्यक्त होऊ शकतो किंवा शकते, हा अत्यंत

वैशिष्ट्यपूर्ण आत्मविश्वास या माध्यमाने अनेकांना प्रथमच प्राप्त झाला.

अशा अनेक समविचारी माता भगिनींनी तथा मातृशक्ती वंदकांना सहनाववतु ! म्हणत साकारलेले *ती चं पान* याचसाठी अत्यंत स्तुत्य, अभिनंदनीय आहे.

**साहित्य संगीत कला विहीन:!**

**साक्षात् पशु पुच्छ विषाण हीन: !**

अशा शब्दात महाराज भर्तृहरी माणसांच्या मानवीय प्रवृत्तीला अधोरेखित करतात.

साहित्य, संगीत आणि कलेच्या क्षेत्रात आपला खारीचा वाटा देऊ इच्छिणाऱ्या माता-भगीनीच्या या उपक्रमाच्या अविरत प्रचलनाची म्हणूनच नितांत आवश्यकता आहे.

वास्तविक सामाजिक जीवनात एक वर्ष हा खूप लहान काळ आहे पण एखादा सकारात्मक उपक्रम सातत्याने वर्षभर चालवणे किती कठीण असते हे चालवल्या वरच कळते.

आज परिस्थिती निवळत असतात वर्षभरापासून चालू असलेला हा अभिव्यक्ति यज्ञ पुढेही अखंड चालू ठेवावा ही सर्व सहभागींना सविनय प्रार्थना.

संस्कार प्रदान करणे हे मातेचे प्रथम कर्तव्य आणि अधिकार देखील. त्याचसाठी आपली संस्कृती पितृ किंवा आचार्य देवतेपूर्वी मातृदेवो भव ! चा जयघोष करते.

तिचे कार्य उदरभरणापासून सुरू होते. संस्काराचे स्तन्य प्रदान करण्यापासून, क्षुधा शांती चे "पान" सिद्ध करीत पूर्णब्रह्माची साधना करणारी ही माता केवळ उदरभरण नव्हे तर मनो-बुद्धी विवर्धनासाठी " ती चं पान " अधिक व्यापक करते ही खूप आनंददायी गोष्ट आहे.

मातेने मातृवत्सलतेने संस्कारित केलेले पदार्थ केवळ अन्न राहात

नाहीत तो प्रसाद होत असतो. असे हे ती चे पान देखील साहित्य शारदेचा प्रसाद ठरावा हीच विश्वमोहिनी शारदेचे चरणी विनम्र प्रार्थना.

# शिदोरी

रेणुका देशपांडे - कुकडे

रस्ता लांबचा आहे,
उन्हाची काहिली दूर करायला
कदाचित मी नसेन..
पल्ला खडतर आहे,
बोचलेला काटा अलगद काढून
देण्या कदाचित मी नसेन..
वाट निसरडी आहे,
गेला तोल सावरण्या आधार
माझा मिळणार नाही..
चुकविण्या पर्जन्यधारा आडोसा
कुणी धरणार नाही..
तुझ्यावरचा वार झेलण्या तेव्हा
माझी ढाल नसेल..
गुडूप किर्र काळ्या राती माझी
जळती मशाल नसेल..
दुर्मुखलेल्या तुला बहुदा,
दिलासा माझा मिळणार नाही..
मळभ खिन्नतेचे बाळा, माझ्या
स्पर्शाने विरणार नाही..

पण तुला एक सांगू? तू पुढेच
जात रहा.
इंच इंच म्हणता म्हणता मैलोन
मैल मागे सरतील..
सौख्य, तृप्तीचे रम्य ताटवे
सभोवतीने तुझ्या बहरतील..
आव्हान पुरं करशीलच रे, तीळा
एवढी शंका नसु दे..
फक्त,
रस्ता लांबचा आहे,
पल्ला खडतर आहे,
वाट निसरडी आहे,
म्हणून माझ्या लाडक्या,
माझी शिदोरी तेवढी सोबत असू
दे,

माझी शिदोरी तेवढी सोबत
असू दे..

# साद

नीता खोत

अंतर्बाह्य गंधीत मनाला साद घातली रे कुणी ||

नदी किनारी एकटी मी तव

वळयांच्या आठवणी ||

तुझ्या स्पर्शाने मोहरून मी रोमारोमांत शहारले ||

गोड तुझ्या मिठीतून वाटे

अंतरंग मम तरारले ||

तुझ्याचसाठी जगले तुझ्याच साठी बंध हे तोडीले ||

तुझ्या विना जगणे माझे कस्पटासम रे जाहले ||

प्रीतीच्या या नात्याला पवित्रतेचा स्पर्श असे ||

सहवासात तुझ्या मज सारे जग  जणू स्वर्ग भासे ||

भेटीसाठी  तव अधीर झाले अश्रू नयनी या दाटले ||

कुणास सांगू भाव माझे रे मनात गुपित हे साठवले ||

कुठल्या आणाभाका  अन् कुठले दावे फसवे असे ||

दूर माझ्यापासूनी तू दूर कुठे तुझी साद असे ||

दूर कुठे तुझी साद असे||



"ती"चं पान
तिच्याकडून मनाळ्यांसाठी

# सावट

मनीषा अतुल

माझ्या मनाच्या भिंतीतून
उगवणाऱ्या सावटावरून

निसटून जात असते मी सारखी
सारखी

आधाराला असतात शेवाळलेल्या
भिंती चहूकडे

त्या धड पडूही देत नाहीत,पुन्हा उभं
व्हावं म्हटलं तर

मी आकाशाकडे लावते नजर मग

एक तिथे काहीच नसतं समोर
निदान

अनंत पोकळी भविष्याशिवायची

भूतकाळाच्या अस्तित्त्वाशिवायची

पण शेवटी ढगांच्या नजरेला नजर
देण्याच्या

असतातच मर्यादा

मान तुकवावीच लागते शेवटी
खाली

आणि अपमानाची कळ निघून
गेल्यावर

परत ताठ करावीच
लागते,आत्मसन्मानाच्या नावाने!

मी नक्की कोण असते?

कोंदटलेल्या निसरड्या वास्तवात
ट्रॅप झालेली?

की दुर्दैवाच्या सेकंदी परीक्षेला
तात्पुरती बसलेली?

की आभासी जगातले ईर्षा
मटेरियल?

की अगदी कुणीच नाही?

कल्पनेत,भासातसुद्धा शिल्लक
नसलेली?

हे कुणीच नसणं, क्षणिक देतं
शांतता

अन परत कुणी असण्यासाठीच्या
यातना



"ती"चं पान
तिच्याकडून। सगळ्यांसाठी

या शां या शां या शां या शां

यातना...बधीर शांतता ......पूर्ण
शांतता...

संपूर्ण शांतता... बधीर यातना...शांत
यातना...

यात शांतता!

# थोडे काही आकळलेले

मंदार मोरोणे

आणि आता जेव्हा दु:ख साकळले आहे,

थांग लागत नाही तरीही बरेच आकळले आहे.

जीवाचा कोंडमारा होतोय, अस्वस्थ आहे भवताल

आणि अडकून पडलोय कुठेतरी.

हीच वेळ आहे शांत होण्याची.

हातपाय झाडून जाळ्यात गुंतत जाण्याऐवजी,

स्वत:तून बाहेर यायचं अलगद

आणि हाताची घडी घालून,

दुरून बघायचं स्वत:कडेच.

थोडं कौतुक करावं आपलं आपण,

चढून गेलो होतो चढाव अगदीच कठीण वाटणारा,

करून गेलो होतो सहज काही दुष्प्राप्य वाटणारे.

इतर अनेक जण हसत असताना

आपणच ठेवला होता आपल्याच पाठीवर हात,

आणि मारले होते मैदान मेहनतीने.

स्वत:तून बाहेर उभे राहून बघताना

दिसेल सारे लख्ख सूर्यप्रकाशासारखे

कालच तर जिंकलो होतो,

आणि परवाच हसलो होतो दिलखुलास

आणि त्या दिवशी नाही का दिली होती टाळी

आपलीच आपण स्वत:ला...!

तेच एकदा पुन्हा करायचे,

पाठीवरचे ओझे काढून ठेवायचे,

जुने झालेले पान हळूच पलटायचे.

पुन्हा एकदा फैलावून हात हवेत,

पायावर घ्यावी गिरकी आणि

केसांतून वाहू द्यावा उनाड वारा.

देऊन टाकू अर्घ्य या नकोशा क्षणांचे,अडकलेले काही होईल मोकळे,

वाहू लागेल अडलेले पाणी हळूहळू.

आपण आपली पावले तयार ठेवूया

मनसोक्त भिजवून घेण्यासाठी

आणि तयार ठेवून मन

सगळा प्रसन्न खळखळाट भरून घेण्यासाठी.

कारण, आता जेव्हा दु:ख साकळले आहे,

थोडे का होईना पण आकळले आहे.

# कृष्ण !

स्नेहा जोशी

जितका त्याचा तिरस्कार करत जावा, तितका तो जास्त उलगडत जातो! आपल्याला कृष्णाच्या लिला दिसतात पण त्यामागचं त्याचं निराकार असणं किती जणांना मान्यंय? एका मनाने प्रेमभाव देताना, दुसर्या मनाने तितक्याचं स्पष्टपणे अनुकुल,प्रतिकुल सांगण्याचं धाडस केवळ कृष्णाठायीचं होतं! नाही तर ऐन रणांगणाच्या आधी कर्णाला जन्मभेद सांगण्याचं आणि त्याचवेळी त्याला भविष्याची जाणीव करुन देणं, कुणाला जमणार होतं? कृष्ण कृष्णचं होता! ज्यांना परिस्थितीनुसार सामोरं गेला, त्यांना तो वेगवेगळा भासला! सुदाम्याला लंगोटीयार, द्रौपदीला तारणहार, रुख्मिणीला सौभाग्य, गोकुळाला कान्हा, यशोदेला ब्रम्हांड,अर्जुनाला गुरुमित्र,कर्णाला समदुःखी तर राधेला तिचा प्रेमी!

एकदा का समोरच्या व्यक्तिचं स्वतंत्र अस्तित्व मान्य केलं ना, कि मान,अपमान,द्वेष,मत्सर,लोभ सारं काही क्षणार्धात गळुन पडतं! अपेक्षाभंगाचे निखारेही शांत होऊन जातात ! विचार,आचाराची प्रगल्भता वाढते आणि सर्वात महत्वाचं म्हणजे त्या व्यक्तिप्रती किंवा त्या व्यक्तिला तुमच्याप्रति आदर वाढतो! नात्यात अजुन काय हवं? कृष्णाने हे मनापासुन जपलं! सोळा हजार बायका करुनही तो नवरा म्हणुन लाभला तो रुख्मिणीलाचं आणि त्याचं वेळी प्रेमी म्हणुन राहिला तो राधेचा ! मीरेच्या वाट्याला तो केवळ भक्तिरुपानेचं आला पण तिलाही अजरामर करुन गेला ! कारण एकचं, कृष्णाठायी प्रेमभाव होता, वासना नाही! आणि म्हणुनचं कृष्ण

कुणासोबतही जोडला जाऊ दे, त्या नात्याचा पवित्रपणा वाढला, हे नक्की!

भावनेनं, प्रेमानं ओथंबलेल्या माणसांचा सहवास कधीचं कोरडा नसतो! अशा माणसांना कधीचं कणखरतेचा तुटवडा भासत नाही! ममतेचा पाझर फोडणारं काळीज वेळप्रसंगी वज्रासारखं ठेवणंही त्यांना सहजशक्य होतं! पण परिस्थितीचे धडे गिरवायला माणुसही तसा एकपाठीचं असावा! कृष्णाठायी ती जादु होती! तुरूंगात जन्म घेऊनही भर पावसातल्या रात्री यमुना पार करून गोकुळ आपलंसं करणारा कृष्ण सुद्धा नियतीपासुन नाही पळु शकला! दैवी गुण अंगी असल्यामुळे असेल कदाचित पण भयाण संहार त्याला पाहावा लागला, महाभारत घडवावं लागलं आणि त्याही स्थितीत तो स्थितप्रज्ञचं राहिला!

प्रेमानं सारं काही जिंकता येतं, वादचं नाही! पण काही लढाया रणांगणात उतरूनचं विजयी करायच्या असतात! ज्याला स्वतःठायी असलेल्या दुर्गुणांवर विजय मिळवता आला, त्याला सगळं जग जिंकता आलं!

शेवटी काय, आपण देव होऊ शकत नाही आणि व्हायला जाऊही नये पण माणुस म्हणुन जन्माला आलोय, तर ते सार्थक करण्याचं भाग्य ज्याला लाभलं, त्याला आपसुकचं देवत्व मिळतं, यात तिळमात्र ही शंका नाही!

कृष्ण होता नाही आलं तरी चालेल पण जन्माला येऊन कृष्णनिती यायलाचं हवी! तितकं निराकार, निःस्वार्थ, निःस्सिम, निर्व्याज, निर्मोही राहायला जमायलाचं हवं! वासनेनं बरबटलेला हव्यास सर्वत्रचं आहे पण कृष्ण होता आलं तर आणि तरचं प्रेम सर्वार्थाने लाभलं, असं समजावं मग आयुष्याचं नंदनवन नक्की !!!

# मोरपीस

कल्याणी देशपांडे

मेघाप्रमाणे सावळ्या शरीरावर सोन्यासारखी कांती, वक्षस्थळावर श्रीवत्साचे चिन्ह, रेशमी पितांबर आणि शेला मुखकमलावर सुंदर हास्य आणि काळे कुरळे केस असं म्हटल्यावर डोळ्यासमोर अतिशय मंगलकारक अशा भगवान श्रीकृष्णाचे रूप उभे ठाकते. चित्त, कर्म आणि वाणीच्याद्वारे पूर्णपणे अनुमानाचा विषय असूच शकत नाही.

हे विश्व ज्याच्या आश्रयाने आहे ज्याच्या सत्तेने चालले आहे, ज्याचे स्वरूप सर्व चराचरात व्यापले आहे त्या राजस सुकुमार अशा श्रीकृष्णाच्या मस्तकावर धारण होण्याचा मान कसा कोण जाणे मला मिळाला? कोणी म्हणे राधेच्या प्रेमाचे ते प्रतिक आहे. जे श्रीकृष्णाने मस्तकावर धारण केले. राधा दामोदराच्या प्रेमाची सतत आठवण असावी म्हणुन मला मस्तकावर मिरवण्याचा मान मिळाला तर!

माझी निर्मिती काम वासनेतून होत नाही, तर मोराच्या अश्रूंना पिल्यावर लांडोर गर्भधारणा करते, त्यामुळेच तर मला प्रभूंनी मस्तकावर धारण केले असावे. काही असो पण त्या काळ्याभोर कुरळ्या केसांचा मऊ मऊ स्पर्श अद्भुत आहे, अवर्णनीय आहे. मला रोजच प्रभूंचे दर्शन होत होते. त्यांच्या मस्तकाचा रोजच होणारा पावनस्पर्श मला अनुग्रहीतच करण्यासाठीच होत आहे.

प्रत्येक मनुष्य अत्यंत उत्सुकतेने आपल्या कृपेची वाट पाहत असतो. प्रारब्धानुसार प्राप्त होईल असे सुख किंवा दुःख भोगतो तसेच त्याचे जे काही फळ असेल ते आपल्याला समर्पित करत असतो. प्रत्येकास

मोक्षाची आस असते पण प्रभू आपण मला मस्तकी धारण केल्याने मला मोक्ष पद प्राप्त झाले असे मला वाटते.

हे सर्वव्यापी अनंता! मी या माझ्या निळ्या निळ्या डोळ्यांनी तुझी अनंत रूपं बघितली, तुझ्या प्रत्येक लीला बघितल्या. तो खोडकर बाळकृष्ण तर सगळ्यांचा जीव की प्राण. रासलीलेत रंगलेला गवळणींना वेड लावणारा तर दुसरीकडे आपल्याच कंस मामाचा उद्धार करणारा अशा एक नाही अनेक लीला सतत माझ्यासमोर पिंगा घालत असतात. दुष्टांचा संहार करून जगाची निर्मिती आपण केली. अशा या अनेक लीलांमध्ये रमणारा मी, वाऱ्यावर डूलणारा, प्रत्येक क्षणांचा साक्षीदार असलेला मी, आपल्या मस्तकावरील मुकुटात शोभून दिसतो.

मी, माझे, तु, तुझे याप्रमाणे भेदबुद्धी तु आपल्या भक्तांच्या चित्तात कधीही असू देत नाही त्यामुळेच मी तुझ्यात समर्पित झालो. माझे डोळे हसरे अथांग असे. अनेक वलयात अंकित असलेले, एखाद्या निळ्याशार डोहासारखे, अनेक गुढ अर्थ प्राप्त होणारे प्रत्येक वलय, आपले जीवन कसे असावे हेच सांगत असावे.

१. पहिल्याच वलयात प्रभू असे सांगतात की, आपले जीवन सफल होण्यासाठी माझ्या नामस्मरणात असावे.

२. परमेश्वर हा सेवेचा आणि भावाचा भुकेला असतो तेव्हा सेवाव्रत अंगीकारल्यास भगवंत आपल्या भक्ताला भेटण्यास नेहमीच उत्सुक असतो.

३. तिसरे वलय हे आत्मसुख हेच सत्य सुख आहे हे सांगून जाते.

४. आत्मचिंतनाने प्राप्त होणारे सुख सात्विक असते तर विषयांपासून प्राप्त

होणारे सुख राजस, मोह आणि आश्रयाने ते गुणातीत असते.

९. अगदी शेवटच्या वलयात सतत आनंदी आणि हसतमुख असावे तसेच मिळालेल्यात समाधान मानून जगावे असे सांगते.

असे अनेक अर्थ माझ्यात लपले आहेत. विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि लय या सगळ्यांना कारण असणाऱ्या श्रीकृष्णाने या लीला केल्या. त्या दुसरा कोणी करू शकत नाही.

पावसाळ्यातील मेघाप्रमाणे श्यामल अंगकांती त्यावर वीजेप्रमाणे झगमगणारे पितांबर, गुंजांची कर्णभूषणे आणि मोरपंखांचा मुकुट धारण करणारे श्रीहरी ज्यांनी मला त्यांच्या मस्तकावर विराजमान होण्याचा मान द्यावा हे माझे अहोभाग्यच! म्हणूनच माझे सारे जीवन त्या राजसास समर्पित करतो. हा कृष्णमय झालेला निळ्या डोळ्यांचा

# प्रेमा स्वरूप आई

प्राजक्ता बर्वे

"ती" चं पान... म्हणता म्हणता या उपक्रमाला एक वर्ष पूर्ण झालं सुध्दा. वार्षिक अंकासाठी काहीतरी विशेष लिहावं असा मानस होताच, पण ते विशेष म्हणजे नक्की काय हे कळत नव्हतं.

मग आठवलं की मार्च महिन्यात महिला दिन असतो.... पण मग हे जाणवलं, की एक कविता आपली करून झालेली आहे....

हा सगळा विचार बाजूला सारून मी झिम्मा चित्रपट पाहायचा ठरवला, विचारांच्या ब्रेक साठी...... आणि खरं तर तो चित्रपट पाहिल्यावर स्पेशली त्यातल्या सोनाली कुलकर्णी आणि सुचित्रा बांदेकर यांनी साकारलेला मायलेकींचा संभाषणातून मी मासिकात काय लिहिणारे हे माझं नक्की झालं.

त्यांचा एक डायलॉग असा होता, जेव्हा आई मुलीला म्हणते,- "तुला माहिती आहे आपल्यात वाद का होतात? कारण आपला स्वभाव एक सारखा आहे" आणि माझ्या समोर उभी ठाकली माझी आई उर्फ ईया उर्फ माझी ईडुटली...

शिक्षणासाठी आता जवळजवळ पाच महिने घरापासून लांब असताना सर्वात जास्त मी तिलाच मिस करतेय, आणि म्हणूनच आज ती चं पान च्या वर्षपूर्ती निमित्त मी माझ्या ईया साठी पहिल्यांदाच असं काहीतरी लिहीतेय..... ईया । hope हे तुला आवडेल.

वेळ दुपारची..... म्हणजे अगदी मध्यान्ह वगैरे नाही.... चक्क जेवणाची. डायनिंग टेबल वर आम्ही जेवायला बसलोय, ईया वाढतेय आणि पहिला घास तोंडात जायच्या आधी मी एक प्रश्न विचारला -

"ए आई, आज संध्याकाळी काय करणार आहेस गं खायला?" माझी आई जरा चढ्या आवाजातच उत्तरली- "प्राजक्ता, अगं आधी समोर वाढलंय ते तरी खा.... पुढचं पुढे बघू."

माझी सकाळ ही "गुड मॉर्निंग" किंवा "आई, झोप नीट लागली की नाही?" या वाक्यांनी कधीच सुरू झाली नाही... माझा प्रश्न असायचा- "आई, खायला काय करणारेस?" एका पॉईंट नंतर ईया त्रासून, कंटाळून म्हणायची... "अगं कंटाळा नाही येत का तुला.... सतत खा खा, जरा एकदा करून बघ दिवसभर, म्हणजे कळेल."

तशी वेळ आली ही माझ्यावर करण्याची, पण तेव्हा तिचीच तब्येत बरी नव्हती..... घरी फार काही कोणाचं खाण्यात लक्ष नव्हतं... त्यामुळे जेमतेम स्वयंपाक मी केला...

लॉकडाऊन मध्ये ऑनलाईन क्लासेस चालू असल्यामुळे मी आपली सतत माझ्या खोलीत असायचे. आमचं घर ड्यूप्लेक्स असल्यामुळे आणि मी जराशी आळशी असल्यामुळे.... जिना कोण उतरून जाईल, म्हणून मी माझ्या खोलीतून ओरडायचे-

"ए आईऽऽऽ लेक्चर संपायला उशीर आहे, चहा आणून देशील का?" किंवा "आईऽऽऽऽ आज मी वरंच जेवीन... दुपारचं लेक्चर आहे." अर्थातच ती माझी आई असल्यामुळे ती माझे हे सगळे लाड पुरवायची.

कट 2 सीन 2

मला घर सोडून आयुष्यात पहिल्यांदा इतके दिवस मुंबईला जावं लागलं शिक्षणासाठी आणि खोटं वाटेल पण पहिल्या पंधरा दिवसातच मला ढसाढसा रडायला येऊ लागलं कारण मला माझ्या आयुष्यातला सगळ्यात मोठं रियलायझेशन झालं होतं.... कळलं होतं मला की मी किती त्रास दिलाय आईला म्हणजे खरं तर हे सगळं मी इतर कोणालाही करायला

गृहीत धरलं मी. ती नेहमी म्हणते की कधीतरी मला माझ्या डोळ्यांनी सांगत नाही म्हणजे अगदी आजीलाही नाही... पण ईयाला खूप बघू देत गं तुला येणारी कामं..... आणि खरं तर हे लिहिण्यामागचं कारणंच हे की ईया मला तुला प्रॉमिस करायचंय तुला कमीत कमी त्रास देईन आणि खरोखर तुला कमीत कमी गृहीत धरेन.

हे म्हणणं म्हणजे मला जरा फिल्मीपणाच वाटतो पण ईया लव यू खूप सारं आणि मला पटकन भेट कारण त्या 8 इंचाच्या स्क्रीनवर तुला पाहून पाहून खरच कंटाळा आलाय गं..

# तिच्या मनातला चाफा

गौतमी करमरकर

वर्षाऋतुतील एक कुंद संध्याकाळ...रस्त्यावरची वर्दळ मंदावलेली,पावसाच्या पायघड्यांनी पाऊलवाट सजलेली होती!! चाफ्याची पिवळा साज ल्यालेली ती टवटवीत फुले तितकीच मुग्ध,अबोल पण तरीही सगळं काही बोलून जाणारी....

पाऊस म्हणजे निसर्गाची एक भावपूर्ण मुद्राच जणू!!! मनाला मृदुमुलायम स्पर्श करीत अलवारपणे रिमझिमत आलेल्या पावसाच्या थेंबांनी तळहातावर क्षणभर विसावा घेतला.

श्रावणाचे नुकतेच आगमन झालेले आणि श्रावण म्हटल्यावर ऊनपावसाचा जणू पाठशिवणीचा खेळ सुरू होतो..बाहेर बरसणा-या त्या श्रावण सरी,चाफ्याच्या फुलांवर गोळा झालेले पावसाचे थेंब,त्या दोघांच्या हातात वाफळणा-या कॉफीचे कप,वेगवेगळ्या विषयांवर रंगात आलेल्या गप्पा..अखंड चालेला संवाद!!! भूतकाळात दोघे रमले होते,कॉफी पित ते स्वप्न रंगवत होते त्यांच्या भविष्याची...

मधूनच मधुर,मंजूळ अशी शीळ घालणारा निळा कस्तूर पक्षी,सुहास्य वदनाने डोलणारी झाडे,पानांची होणारी सळसळ,चाफ्याची ती मनमोहक फुल आणि अवघा आसमंत भारून टाकणारा त्याचा मृद्गंध!! त्यातच भर म्हणून दूरून कोठूनतरी ऐकू येणारे मेघमल्हाराचे सूर... या सगळ्याची साथ त्या दोघांना होतीच पण त्यांना जाणीव होती फक्त आणि फक्त त्या दोघांमधल्या होणा-या संवादाची..प्रत्येक क्षण दोघे जगत होते..

एखाद्या चित्रकाराने आपले कौशल्य पणाला लावून रेखलेली चित्र



"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

असावीत असं वाटत होतं... जणूकाही त्या रेखलेल्या चित्रांत रंग भरण्यासाठी म्हणून चित्रकाराने त्या दोघांसाठीच ते चित्र बाजूला ठेवले होते..त्यात पिवळा जर्द रंगही भरला त्या दोघांनी आनंदाचा ,सुखाचा आणि समाधानाचा...

तशी म्हणा मौनाची भाषा दोघांनाही अवगत होती..चाफाही तिथेच होता तोही मूक होऊन त्यांना न्याहाळत होता...

बरस बरस तू मेघा रिमझिम। आज म्हारे आये प्रितम। असं म्हणत पाऊसही तिला साद देत होता,खुणावत होता..

आता मात्र नको असणारी निरोपाची कातरवेळ जवळ येत चालली होती.चाफ्याच्या झाडांमधून जाणारी ती निस्तब्ध वाट दिसत होती...अचानक त्या दोघांमधला संवाद यामिनीच्या त्या घनगर्द अंधारासारखा लोप पावत होता...कातर होत होता...

तिने गहिवरून त्याला विचारले,"जाण गरजेच आहे का?" तो निरूत्तरीत होता..आता त्या दोघांमधली शांतताच बोलत होती..त्याने चाफ्याची ती कोमल फुल तिच्या ओंजळीत त्यांच्या आठवणीची भेट म्हणून दिली...आणि तो दिसेनासा झाला.

स्वप्नातून ती जागी झाली,बाहेर पाऊस अक्षरश: कोसळत होता पण...त्या चाफ्याच्या फुलावर आता पावसाचे थेंब नव्हे तर नकळत ओघळत होते तिचे अश्रुबिंदू....

# संवाद - सेतू

डॉ. वंदना बोकील - कुलकर्णी

आपल्या सनातन एकटेपणावर मात करण्यासाठी माणूस भोवती गोतावळा जमवतो. कुटुंब तयार करतो.मैत्रीची उबदार घरटी बांधतो.रक्ताने मिळालेली नाती तर असतात पण त्याबरोबर तो आणखी नाती तयार करतो. आपला परिवार विस्तारत राहतो. असं असूनही तो दिवसेंदिवस अधिकधिक एकटा होत चाललाय का? हे एकटेपण आज फार तीव्रतेनं जाणवू लागलंय. लोकांतामधून एकांतात जाणाऱ्या व चिंतनात आणि नामस्मरणात रमणाऱ्या तुकोबांचं किंवा 'एकला चलो रे ' म्हणणाऱ्या रवीन्द्रनाथांचं एकटेपण वेगळं. इथे आज बोलायचंय ते एकमेकांपासून तुटल्यामुळे येणाऱ्या एकटेपणाबद्दल.

अरुण कोलटकरांची एक कविता आठवते.

**"जळत रहा माझ्यासाठी**

**उब राख please मला**

**हे शहर घाबरवतंय**

**नाहीतर या बिल्डिंगा मला फाडून खातील "**

माणसाच्या नात्याचं जोडलेपण नसेल,जवळच्या नात्याची उब नसेल तर शहरं किती हिंस्र बनू शकतात,याचं हे चित्र आहे. शहर म्हणजे रविसरायला लावणारी जागा.

नेमाड्यांच्या एका कवितेत त्यांनी म्हटलंय 'चांगली माणसे जोडण्यासाठी हाताला हजार बोटे असोत' कोण ही चांगली माणसे? माणसातल्या माणूसपणाची ग्वाही मिळेल ,संवाद साधता येईल अशी माणसं म्हणजे चांगली माणसं.काय करतात माणसं हल्ली एकमेकांसोबत? ती एकत्र रहातात,



"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

जेवतात,भेटतात,झोपतातसुद्धा! एकत्र काम करतात,प्रवास करतात,गप्पा करतात,नाटकं-सिनेमा बघतात. पण त्यांचा खराखुरा संवाद होतो का एकमेकांशी? एकमेकांच्या अंतर्मनाचा हुंकार ऐकू येतो का त्यांना? जणू काचेच्या भिंती उभ्या आहेत आपसात. एकमेक दिसतायत. पण ऐकू येत नाहीत. संवाद साधताच येत नाही. या भिंती उभ्या केल्या आहेत, आपसातल्या तीव्र स्पर्धेनं. परस्पर अविश्वासानं. 'मला काय त्याचं' या अलिप्तपणानं. आणि ओलाव्याच्या अभावानं. फार दूर जायला नको. गेल्या काही दिवसातलं हे संभाषण बघा.

"कशी आहेस"

"मजेत. तू?"

"मी पण मजेत "

"काय चालूय?"

"काही नाही विशेष. नेहमीचंचं .रुटीन"

बस्स.पुढे काय ? शांतता.

संवादाची सर्व साधनं बोटांच्या टोकाशी आहेत आता.पण संवादाची रीत ही अशी !हे व्हाटस अप वरचे संभाषित असेल तर त्याला इमोजीची जोड असेल. पण गाभ्यात फरक नाही. उमाळ्याने बोलावं, मन मोकळं करावं, अशा किती वेळा आल्या आणि त्या त्या वेळी कोण होतं सोबत? बरोबर रस्ता चालवा, जोडीने पावले टाकावीत, सुरात सूर मिळवावा, असा कोण आहे हमसफर आपला? प्रामाणिकपणे या प्रश्नाला भिडायचं ठरवलं तर जाणवतात ते सगळे "बिनकामाचे संवाद" !

जरा आसपास पाहू. ज्येष्ठांचे संघ आहेत, भिशा आहेत, किटी पार्ट्या आहेत. ट्रेकिंगचा ग्रुप आहे. रोज धावणाऱ्यांचा आहे. दर शुक्रवारी रात्री भेटणारा एक आहे. रोज ठराविक हॉटेलात ठराविक वेळी भेटणारा दुसरा आहे. व्हॉटस अपवर तर

समाजप्रिय प्राणी आहे - man is a social animal - ही व्याख्या अगदी सार्थ ठरते,असं वाटूही शकतं. 'पण गुंतुनी गुंत्यात या आपण आत आत कुठेतरी फार एकटे होत चाललो आहोत.कधी नव्हती इतकी समुपदेशानाची गरज वाढली आहे,सकारात्मक रहा,असं सतत बजावलं जातंय.

फट् म्हणता दहाबारा वर्षांची पोरं आत्महत्या करतात. घर सोडून जातात.ब्रेकअप झालं तर 'चिल' म्हणतात,चुकून गर्भ राहिला तर चटकन गर्भपात करून मुली मोकळ्या होतात, 'नो बिग डील' म्हणतात आणि चालू पडतात. खरंच इतके व्यक्तिवादी झालोय का आपण ?पण मग आपण पुरेसे व्यक्तिवादी नाही झालो. कारण आपल्या व्यक्तिवादाच्या व्याख्येत इतरांचे व्यक्तिस्वातंत्र्य आपण सोयिस्कर विसरतो.

आपल्या सगळ्या खाजगी गोष्टींचीही आज फार चर्चा होते. संपर्क माध्यमांचा फार संसर्ग होतोय. सध्या तुम्हाला खूप लोक ओळखत असले तर ते 'माणसं जोडली आहेत' असं न ठरता 'तुमचा पी.आर.किती चांगलाय' असं काहीसं उपरोधानं बोललं जातं. तुमचा एखाद्या संस्थेतला प्रवेश,तुमचं पद, तुमची परदेशवारी, तुम्हाला मिळालेला एखादा पुरस्कार, अगदी तुमचा फॅब इंडियामधला कुडता देखील कुठल्या तरी लॉबिंगमुळे असल्याचे बोलले जाते. काही वेळा त्यात तथ्य असेलही,पण नेहमी तसं नसतं. स्पर्धिष्णू होत चाललेल्या या जगात लहान मुलांचं विश्वही आपण निरागस राहू दिलेलं नाही. त्यांनाही आपण स्पर्धा,मत्सर यांचे बाळकडू देतोय.

आनंद वाटला की वाढतो आणि दुःख वाटलं तर ते हलकं होतं, असं शिकवलं गेलं नं आपाल्याला ?आज

परिस्थिती याच्या अगदी उलट आहे.आनंदाची बातमी सांगा ,"हो का", "मजाय","जोरात आहे"...या प्रतिक्रिया!

तुम्ही दुखण्यात नाहीतर आर्थिक अडचणीत असा. लोक लगेच तुमची जीवनशैलीच कशी चुकीची आहे. तुम्ही व्यायामच कसा करायला हवा,तुम्ही भावनेच्या फार बुवा आहारी जाता.. अशी शेरेबाजी करुन तुमच्या दुःखभाराला आणखी हातभार लावतात. मग तुम्ही सावधगिरी बाळगू लागता, न बोलायचं ठरवता...आणखी थोडे एकटे होता.

कोणीही कोणाचं नसतं..हा या काळाचा मूलमंत्र होऊ पाहतोय. तुमच्या ध्यानीमनी नसणारा अर्थ तुमच्या बोलण्यातून काढला जातो,आणि मुख्य म्हणजे तुम्हाला त्याचा पत्ताही नसतो. ना कुणी कुणाला प्रेमाने खडसावत, ना जाब विचारात. ना चूक समजते ना ती सुधारण्याची संधी मिळते. फक्त एक दरवाजा कायमचा बंद होतो. तुम्ही आणखी थोडे एकटे होता.

प्रफुल्ल शिलेदार यांची एक कविता आहे.

**दिवसभर भटकून संध्याकाळी**

**स्वतःला गोळा करुन आल्यावर**

**एकमेकांचा कानोसा घेत**

**आपण एकमेकांना परके झालो आहोत**

**हे न दाखवता**

**एकमेकांच्या आदिम पडझडीची खुशाली विचारत**

**दार गच्च बंद करुन आत शिरायचं**

दार गच्च बंद केली की एकटेपण अटळच.अवकाश-स्पेस हा शब्द फार स्वस्तपणे वापरतोय आपण. कळलाय का या शब्दाचा खरा अर्थ आपल्याला ? जो तो आपापल्या मोबाईलमध्ये नाहीतर लॅपटॉपमध्ये डोकं घालून बसलाय... ही स्पेस

अपेक्षित आहे का आपल्याला? मुलं बाहेरून घरी येतात. बैठकीच्या खोलीत कोणी पाहुणे असतील तर सरळ त्यांच्या अंगावरून आपल्या खोलीत चालती होतात.धाडकन दार बंद करतात.आईबाप एकटे होतात आणि कालांतराने ही मुले !

आई-बाप, बायको-मुलं ही नातीही आता इतकी व्यवहाराच्या मातीत उतरली आहेत, की आपआपली दारं

घट्ट बंद करावीशी वाटतायत. चांगलं कडकडून भांडून, एकामेकांचं पार भुस्कट पाडून पुन्हा जवळ येण्यातली सहजता गमावली की काय आपण?

पूर्वी नव्हता का माणूस एकटा? फार पूर्वी नाही,अगदी दहा-वीस वर्षांपूर्वी? असणारच. मोठ्या कुटुंबातून लहान कुटुंबात,खेड्यातून शहरात असा त्याचा प्रवास झाला तसं हे एकाटेपणही बिनचूक त्याच्यामागोमाग वाढत गेलं. पण मुखवटे घालून वावरण्याच्या जागा आणि वेळा तेव्हा मर्यादित होत्या.बाहेरचं आणि आतलं जग वेगळं होतं. आता सगळीच सरमिसळ झालीय. मुखवटा काढायची संधीच दुर्मिळ होतेय.आणि मुखवट्याच्या आतला माणूस अंतर्यामी आणखीच एकटा होतोय. झगमगणाऱ्या शहरांमधले गजबजलेले रस्ते मग निर्जन वाटू लागतात, ”खूप लोक आहेत” पण आपलं कुणीच नाही.

आरती प्रभूंनी फार पूर्वी म्हणून ठेवलंय

**हृदयाचे बेट**

**कुठे त्याची वाट ?**

**हाताशी लागावा**

**एक तर काठ !**

अशा काठाच्या शोधात तरंगतोय आपण. हा काठ आहे परस्पर संवादाचा आणि त्याचा पाया आहे माणुसकीच्या नात्याच्या पाण्यात!

अधाशी हावरटपणानं, बेमुर्वतखोरीनं आपण जमिनीच्या पोटातल्या पाण्याचा उपसा करतोय. या एकच कृतीशी जोडलेल्या सगळ्या अभद्र युती- सत्तेच्या राजकारणापासून ते आंधळ्या स्वार्थापर्यंत - यांचा परिणाम म्हणून आपल्याही आतला ओलवा कमी होत चाललाय हे कळतंय का आपल्याला?

शहरी माणसाचं पारडं सुविधा, संधी, जीवनशैली, सुबत्ता अशा अनेक बाबतीत अर्धशहरी किंवा ग्रामीण माणसापेक्षा निश्चित जड आहे. तरी तो उठसूठ शहराबाहेर धाव घेतो ते का? तर या सगळ्या भौतिक सुखांच्या पलीकडचं काही त्याला हवंय.हवा आहे संवाद स्वतःशी, भोवतालाशी आणि इतरांशी.

या संवादाचं महत्त्व ज्ञानदेवांपासून सगळे सांगत आलेयत. 'संवादाचा हा सुवाओं' वाहायचा तर बोलणारा आणि ऐकणारा समपातळीत हवेत. आपल्या आतला ओलावा कसोसीने जपत इतरांशी जोडून घेत राहिलं तरच मानवी संस्कृतीचा प्रवाह वाहता रहाणार आहे. अक्षरांच्या जोडणीतून शब्द - वाक्य - असं करता करता अर्थापर्यंत पोहोचता येतं ना... हे जोडलेपणा नसेल, तर सारं सुटंसुटं होत विखरून जाईल. म्हणून संवादाचा सेतू बांधत राहायला हवं.

# स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे

सायली देशपांडे



पद्मविभूषण डॉ. प्रभा अत्रे

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला कानावर बातमी आली की गानयोगिनी डॉ. प्रभाताई अत्रे यांना "पद्मविभूषण" जाहीर... त्यानिमित्ताने लिहिलेली ही शब्दसुमनांजली.

**"जीवन माझे सुरासंगती**
**अर्पियले मी रसिका तुजसी।।**
**जन्मजन्मीचे नाते अपुले**
**जाणून घे तू,प्रिय रसिका रे।।**
**जगणे मरणे तुजसाठी रे**
**मी पण सरले, सरली नाती।।"**

असं म्हणत आपलं गाणं दिमाखात मिरविणाऱ्या त्या गानसरस्वती, ज्यांच्या नावातच कोटी सूर्यांच्या तेजस्वितेची 'प्रभा' आहे अश्या किराणा घराण्याच्या सिध्दकंठ गायिका म्हणजे डॉ.प्रभा अत्रे. नुसतं प्रभा अत्रे म्हंटलं तरी डोळ्यासमोर येते ती प्रसन्न मुद्रेने हसत असलेली निस्पृह तपस्विनी. ज्यांच्या आवाजाने आजही शास्त्रीय संगीतात एक स्थान राखलं आहे ते खानदानी गायकीचं आणि मैफिलीचं. प्रभा अत्रे म्हंटलं की आठवतो तो मारुबिहाग. "जागू मै सारी रैना" हे शब्द नसून विरहिणीच्या मनातले बोलके भाव आहेत असंच कायम वाटतं.

बंदिश कुठलीही असो, स्वरप्रधान गायकी आणि शब्दांना समजून त्या बंदीशींचं जणू शब्दचित्रच डोळ्यासमोर उभं करणं हे म्हणजे प्रभा अत्रेंच्या गायनाचं मर्मस्थान.



"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

बंदीशीत समाविष्ट असणारा अर्थ केवळ स्वरांच्या सामर्थ्याने आणि त्यातला भाव मनात ठसवल्या जाणारा आवाज म्हणजे प्रभा अत्रेंचा. या संगीत सागरातले प्रभा ताईंचे गुरू म्हणजे सुरेशबाबू माने आणि गानहिरा हिराबाई बडोदेकर. गुरूंप्रति असलेली श्रद्धा त्याबरोबरचं असणारं समर्पण आणि विश्वास त्यांना आणि त्यांच्या गायकीला समृद्ध करत गेला.सुरेशबाबू माने गेल्यानंतर जेव्हा लोक त्यांना म्हणायचे की," तुमच्या गायकीवर आमीर खां यांच्या गायकीचा प्रभाव आहे पण मग गुरू म्हणून तुम्ही त्यांचं नाव घेत नाही? तेव्हा त्या म्हणतात,"सुरेशबाबू माने माझे "गुरू" आहेत आणि आमीर खां मला "गुरूंसमान"आहेत. हा विचार फार बोलका ठरतो तो गुरूंप्रति असणाऱ्या निष्ठेचा.

प्रभा अत्रे यांचं गाणं म्हणजे अंगणभर पडलेल्या प्राजक्ताचा सडा. फक्त त्याच्या सुगंधानेच आपण त्या प्राजक्ताच्या झाडापर्यंत जातो आणि गेल्यावर दिसतं ते पसरलेलं प्राजक्तरुपी चांदणं. त्यांनी स्वतः कथ्यक नृत्यशैलीचं औपचारिक शिक्षण घेतलं होतं म्हणूनच एखाद्या कुशल नर्तकीने गाण्यातले भावप्रदर्शन फक्त चेहऱ्यावरील भावाने ते नृत्य बोलकं करावं अगदी तसंच फक्त "सा" जरी लावला तरी ब्रह्मानंदाची अनुभूती देण्याचं सामर्थ्य प्रभा अत्रे यांच्या गाण्यात आहे.एखादी फुलमाळ गुंफत असतांना त्या फुलाला नीट आणि प्रेमाने आंजारून गोंजारून मग त्याला दोऱ्यात गुंफतो तीच सहजता जाणवते ती प्रभा ताईंच्या गाण्यात. एक एक स्वर लगाव म्हणजे प्रेमाने कुरवाळलेला तो स्वर.म्हणूनच संगीत साधनेला त्या देवपूजा म्हणत असाव्या. स्वरप्रधान गायकी, किराणा घराण्यात आपल्या गायकीची "प्रभा" आजतागायत

तशीच कायम तेजोमय ठेवणाऱ्या प्रभा ताईंचा लागणारा प्रत्येक सूर हा सच्च्या साधकाची अनुभूती देतो हेच त्यांच्या गायकीचं सामर्थ्य आणि प्रमाण म्हणता येईल.

त्या आपल्या "सुस्वराली" या पुस्तकात असं लिहितात की, "नादसमुद्राच्या तळाशी शोधते आहे सुरांचे मोती, गाणाऱ्या यात्रिकाच्या हाती कुणी दिल्या या विझलेल्या वाती? गळ्याला डागून दिलाय सुरांचा मोह, आत्म्यापासून हाकेच्याच अंतरावर भीतीचे डोह, उल्कापाताची साक्षात्कारी चांदणी, तळहातावर गोंदवून मी, हलकेच पुन्हा निघून जाते समुद्राच्या तळाशी!"

नाद, स्वर, लय यांचं वेड त्यांना लावलं ते आईने. आईच्या आजारपणामुळे आधी ओळख झाली ती संवादिनीशी आणि तोच संवाद महत्वाचा ठरला तो त्यांना या संगीतविश्वात आणायला. आणि तो प्रवास त्यांना Doctor of Music आणि Trinity Music College, London इथपर्यंत घेऊन गेला.पद्मश्री, पद्मभूषण याबरोबरच अनेक पुरस्कारांनी त्या सन्मानित आहेत. ईश्वराच्या कृपेनी आणि आपल्या सुदैवाने त्यांना आपण आजची तरुण पिढी सवाई गंधर्व या सारख्या मोठ्या मोठ्या संगीत समारोहाच्या माध्यमातून ऐकू शकतेय यापेक्षा वेगळं सुख ते कोणतं?

एखादा कुशल शिल्पकार ज्याप्रमाणे शिल्प घडवतांना आपला जीव ओतून ती मूर्ती साकार करतो तोच प्रत्यय प्रभाताईंचं गायन ऐकतांना येतो म्हणूनच त्यांच्या या ओळी फार बोलक्या ठरतात,

“म्हणे सुरांना रंग नाही, गंध नाही पण मानवी भावनांच्या सूक्ष्म स्पंदनांना जेव्हा त्यांचा स्पर्श होतो तेव्हा निर्गुण- निराकार आणि सगुण- साकार होतो.”

# मानवंदना

रेखा चवरे

साक्षात सरस्वतीची भेट झाल्यानंतरची अनुभूती काय असते... हे सांगणं शब्दातीत आहे. त्या भेटीने अपार आनंदाचा अनुभव येतो, समृद्ध झाल्याची, कृतकृत्य झाल्याची, एवढंच नाही तर पवित्र झाल्याची भावना मनात दाटून येते. ही अनुभूती भरून पावल्याची जाणीव देत मनाला जन्मभर उभारी देत रहाते.

१७ एप्रिल २००४ हा माझ्या आयुष्यातील असाच एक अतिविशेष दिवस! त्यादिवशी स्वर्गीय बाबासाहेब पुरंदरे यांच्या चरित्र प्रकाशन कार्यक्रमात माझी आणि दीदींची भेट झाली. भारदस्त सात्विक तेजस्वी चेहरा, कानात चमचमणारी हिऱ्याची कुंडलं, पिवळे काठ असलेली पांढरीशुभ्र साडी, हातात काळी पर्स अशा स्वरूपात दीदी मला सरस्वतीदेवी सारख्या वाटल्या. साऱ्या बसलेल्या सभागृहाने उठून उभं राहून या गान सरस्वतीला मानवंदना दिली. माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही. दीदींजवळ फोटो आणि स्वाक्षरीसाठी चाहत्यांची गर्दी जमली. त्या गर्दीत मी ही होतेच.दीदींना त्रास होऊ नये म्हणून कार्यकर्त्यांनी गर्दीला बाजूला करण्याचा प्रयत्न केला आणि दीदींनाही प्रेमभराने सूचना दिली "दीदी, तुम्ही स्वाक्षऱ्या देण्यास सुरुवात केली ही गर्दी वाढेल आणि तुम्हाला त्रास होईल."

दीदींच्या भेटीचा हा क्षण लिखित स्वरूपात टिपून घेण्याच्या इच्छेने आयुष्यात त्यांच्या भेटीची तीव्रतेने वाट बघणार माझं मन मुखावाटे बोललं,"माझं स्वप्न होतं आयुष्यात तुम्हाला बघण्याचं दीदी ! ते आज पूर्ण झालं. आयुष्यात या क्षणाची मी वाट बघत होते." आणि काय आश्चर्य !

दीदींनी आपल्याच हा चहातीचं मन जाणलं. माझी तीव्र इच्छा ओळखली. कदाचित त्यांच्याबद्दल माझ्या हृदयात असलेला अपार आदरभाव माझ्या कडून त्यांच्या हृदयात पोहोचला असावा! त्यामुळे कार्यकर्ते सगळ्यांना बाजूला करत असतानाही हात लांब करून दीदींनी माझ्या हातून स्वाक्षरी बुक घेतलं आणि मला स्वाक्षरी दिली.

स्वरसम्राज्ञीची झालेली भेट म्हणजे स्वप्न वाटू नये म्हणून कॅमेरात या अत्युच्च आनंदाच्या क्षणांना चित्रीत केलं.

माझ्यासाठी हा अतिशय मौल्यवान क्षण असणार होता. पुढे आणखी काही क्षण माझ्या भाग्यात आहेत हे तेव्हा मला ठाऊक नव्हतं.

दीदींची भेट झाल्याच्या अतीव आनंदातून माझ्याकडून उस्फूर्तपणे लेखन झालं आणि त्यातून 'हे रत्न भारताचे - लता मंगेशकर ' या पुस्तकाची निर्मिती झाली. पुढे पुस्तकाला बरेच मानाचे पुरस्कारही मिळाले पण पुस्तकाची पहिली प्रत प्रभुकुंजमध्ये प्रत्यक्ष दीदींच्या हाती देण्याचा आनंद काही आगळाच ..अतुलनीय !

पुस्तकाची माहिती प्रकाशक आप्पासाहेब परचुरे यांनी दीदींना दिली.लिखित स्वरूपात त्यांच्या शुभेच्छा पुस्तकासाठी मिळाल्या. पुस्तक प्रकाशकांनाही आवडलं होतं. एक दिवस ते मला म्हणाले "रेखा, तुला मी एक सरप्राईज देतो." दीदींच्या भेटीची वेळ त्यांनी घेतली होती. ठरलेल्या दिवशी मी आणि आप्पासाहेब परचुरे 'प्रभुकुंज' मध्ये गेलो. प्रभुकुंज म्हणजे साक्षात् स्वरसरस्वतीचं मंदिर ! पहिल्या मजल्यावरील त्यांच्या घरावर स्वाक्षरी स्वरूपात दीदींचं नाव. अशा स्वाक्षरीपासून तर त्यांचा आणि माझा ऋणानुबंध दृढ झाला !!

प्रभुकुंज'मध्ये उजवी कडे एक

कॉरिडॉर - तेथे स्वैंपाकघर, भोजनकक्ष आणि पं. हृदयनाथजीं ची म्युझिक रूम. इथेच तर कितीतरी सुरेल गाण्यांचा जन्म झाला!

मुख्य दरवाजाच्या अगदी समोरच्या पॅसेजमधून समोर गेलं की दिवाणखाना त्या पुढे दीदींची खोली. दिवाणखान्यात मीनाताईंशी बोलणं झालं.नंतर दीदींच्या खोलीत जाऊन त्यांना वंदन करून पुस्तक त्यांच्या हाती ठेवलं. मुखपृष्ठ बघताच "अरे वा ! छान आहे. मोहन वाघांचा हा फोटो दिसतोय" असं म्हणत दीदींनी मुखपृष्ठ आणि पुस्तकाचं कौतुक केलं.पुस्तक मी वाचीन आणि कळवीन असं त्यांनी आवर्जून सांगितलं. त्यांची स्वाक्षरी असलेला फोटो मला हवा होता. तो त्यांनी दिला. माझी ही इच्छा पूर्ण झाली.

सुमारे महिन्याभराने फोन रुणझुणला."मी लता. पुस्तक छान झालंय पण तुम्ही माझ्यावर खूप लिहिलंय. धन्यवाद! खरंच ! माझी एवढी योग्यता आहे का? "असं विचारणारा नम्र मधुर स्वर ऐकून मी चकित झाले. दीदींची उंची आभाळाएवढी असली तर त्यांच्यातील विनम्रतेचं हे दर्शन विलोभनीय होतं.

पुढे कार्यक्रमांच्या निमित्ताने त्यांची भेट होत राहिली. प्रत्येक भेटीत त्यांनी ओळखीचं स्मित दिलं. काही वेळा बोलणंही झालं. पण माझं मन भरे ना!विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी लतादीदीं वर कार्यप्रसंगी लिहिलेले लेख मला पुस्तक निर्मितीसाठी खुणावू लागले. त्यातून 'मोगरा फुलला' या पुस्तकाची निर्मिती झाली.सुप्रसिद्ध संगीतकार पद्मभूषण श्रीनिवास खळे यांनी प्रस्तावना देऊन पुस्तकाचं कौतुक केलं.

दरम्यान मंगेशकर कुटुंबीयांशी परिचय वाढत गेला. 'हे रत्न भारताचे - लता मंगेशकर' हे पुस्तक पंडित

हृदयनाथजींना आवडलं. त्यांनी पुस्तकांचं कौतुक केलं. कौतुकाचे शब्द त्यांनी लिखित स्वरूपातही दिले. त्याचा समावेश पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीत केला आहे. दुसऱ्या आवृत्तीचं प्रकाशन पंडित हृदयनाथांच्या हस्ते झालं. पुस्तक वाचनीय आणि संग्रहणीय आहे असं त्यांनी आवर्जून सांगितलं. त्यामुळे मी भरून पावले.

त्यानंतरचा सुवर्णाध्याय म्हणजे *स्वरसाधना* हे संपादित पुस्तक. दीदींनी वेगवेगळी, मासिकं नियतकालिकं यामधून प्रासंगिक लेखन केलं आहे. दीदींच्या लेखणीतून उमटलेला हा अनमोल ठेवा मराठी वाङ्मय समृद्ध करणारा आहे. मराठी भाषा साहित्य आणि संस्कृती या दृष्टीने या लेखनाचं मोल अनन्यसाधारण आहे. दीदींचा परिसस्पर्श लाभलेले हे लेखन अनमोल असा भारतीय सांगीतिक - सांस्कृतिक ठेवा आहेच पण जागतिक दर्जाची संपदा देखील आहे. विखुरलेले हे लेख पुस्तक रुपाने एकत्रित करण्याची अनुमती दीदींनी सहृदयतेने दिली. ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे.

मी या काळात जन्माला आले, दीदींची गाणी ऐकली,दीदींना प्रत्यक्ष बघता , भेटता आलं त्यांच्यावर लिहून त्यांच्या बद्दलची अतीव कृतज्ञता व्यक्त करता आली, हे माझं परमभाग्यच!

दैवताची भक्ती करण्याची संधी भक्ताला कधीही - कितीदाही - कुठेही मिळाली तरी सुखावहच असते. भरून पावल्याची भावना निर्माण , समाधानाची अनुभूती देणारी असते. हाच प्रत्यय मला पुस्तकं साकारतांना आला.

माझ्या चिमुकल्या ज्योतीने लतादीदीच्या महातेजाला मानवंदना देण्याचा हा माझा अल्पसा प्रयत्न..

# पुरुषी मानसिकता बदलायला कोणते युग उजाडेल ?

वर्षा किडे - कुलकर्णी

जागतिकीकरणाचा प्रभाव १९ व्या शतकापासूनच दिसायला लागला होता. सामाजिक सांस्कृतिक,राजकीय भाषिक, शैक्षणिक , भौगोलिक आर्थिक या आणि इतर प्रत्येक क्षेत्रात हळूहळू परिवर्तनं होऊ लागलीत. त्यामुळे सामान्य लोकांचं जीवनही प्रभावित झालं . कुटुंब संस्थेला हादरे बसून संयुक्त कुटुंबाचं विभक्त कुटुंबात रूपांतर झालं. अपत्यांची संख्या ही हळूहळू कमी होत तीन ,दोन , एकावर आली .कुटुंब आणि विवाह संस्था या परस्परपूरक आहेत. मात्र कुटुंब संस्थेपेक्षा विवाह संस्थेत झपाट्याने परिवर्तन होत गेलं. हल्ली तर मुला मुलींचे विवाह ही एक गंभीर समस्या निर्माण झाली आहे. नुकतेच केंद्र सरकारने मुलींच्या विवाहाचं वय १८ वरून २१ केलंय आणि ते अत्यंत योग्य आहे. तरीही या निर्णयावर गदारोळ उठलाच. अनेकांनी विरोध केला.कोणत्याही चांगल्या बदलला प्रथम विरोध होतच असतो . पूर्वीही मुलींचे लग्न वय १० चे १२ करताना तो झाला होताच.. केंद्र सरकारचा निर्णय योग्य आहे कारण आज शहरी मुली २७ ,२८ व्या वर्षी पर्यंत लग्नाचा विचारच करीत नाहीत. हा, या निर्णयाने गामीण , भागात थोडाफार फरक पडू शकतो ,नाही असे नाही .पण शहरी भागात .पदवी, पदव्युत्तर शिक्षण मग जॉब आणि सेटलमेंटची २ ,३ वर्षे मग लग्न असा हिशोब असतो. याच फंड्यानुसार मुलेही तिशीत किंवा नंतर लग्न करीत आहेत.

मुलं मुलींच्या लग्न विषयीच्या संकल्पना पूर्णता बदलल्या आहेत. आधी लग्नच नको, केलं तर मूल नको,

त्याहीपुढे 'डिंक' म्हणजे डबल इनकम नो कीड , 'लिव्ह इन रिलेशनशिप' वरून अविवाहित राहून मूल दत्तक घेऊन किंवा सरोगसी पद्धतीने मूल जन्माला घालून ,शुक्राणू आणि स्त्रीबीज फ्रिज करून आणि आजच्या वैज्ञानिक प्रगतीमुळे उपलब्ध असलेल्या अन्य मार्गाने मूल जन्माला घालून सिंगल पॅरेंटिंग करणं हा पर्याय उपयोगात आणला जात आहे. सुश्मिता सेन ,तुषार कपूर आणि मोना सिंग या नट नट्यांनी असे मार्ग अवलंबिले आहेत .

नट नट्यांचा प्रभाव जनमानसावर जास्त असल्याने त्यांचं अनुकरण केल्याच जातं. आज शहरांमध्ये, मेट्रो सिटीज मधले प्रश्न वेगळे आहेत . प्रचंड महागाई मुळे दोघांनी जॉब करणं अत्यावश्यक झालं आहे.सेकंद काट्यावर नाचत होणारी प्रचंड धावपळ, मनाची होणारी घालमेल, कुतरओढ ,प्रचंड स्पर्धेत टिकून राहण्याची कसरत, करिअरचा प्रश्न , जागेचा प्रश्न, पैशांचा प्रश्न, वेळेचा प्रश्न (कारण आई नोकरी करणारी,)बाळाच्या संगोपनाचा प्रश्न, दोघांचेही आईवडील नातवंडाला सांभाळण्यास उपलब्ध नसणं किंवा इच्छुक नसणं, किंवा प्रकृतीने सक्षम नसणं अशया अनेक प्रश्नांमुळे मेट्रो शहरातील आणि अन्य शहरातील लग्नाळू आणि लग्न झालेली मुलं, मुली मूल नको या निर्णयाप्रत येऊन पोहचली आहेत. त्यांच्या रोजच्या प्रॅक्टिकल समस्या समजून न घेता हल्लीच्या पिढीला बंधन नकोत, जबाबदाऱ्या नकोत असा तडक आरोप केल्या जातो.

आजही लग्न जुळवण्याच्या प्रक्रियेत मुलगा ,मुलगी हा भेद केला जातोय. पुरुषसत्ताक पद्धतीचा पगडा अद्यापही कमी झालेला नाही. परिणामतः पुरुषी मानसिकता बदललेली नाहीये. ती कोणत्या युगात बदलेल हा कळीचा मुद्दा आहे. आजही मुलांनी करिअरसाठी उशिरा लग्न केलं

तरी चालतं पण मुलींनी करिअरसाठी उशिरा लग्न करण्याचा किंवा न करण्याचा निर्णय घेतला की सर्रास मुलींना दोष दिला जातो. मुली शिकल्या ,नोकरी करायला लागल्या म्हणून कुटुंब संस्था मोडकळीस आली असा आरोप केला जातो. म्हणजे आजही मुलींनी चुल मुलंच करत संसार सांभाळावा अशी समाजाची अपेक्षा आहे की काय.? असली तरी ती सपशेल चुकीची आहे.

वेदकालीन स्त्रियांनाही सर्व प्रकारचं शिक्षण घेण्याचं स्वातंत्र्य होतं आणि भावी पती स्वेच्छेने निवडण्याचंही . तेच स्वातंत्र्य आजच्या मुलींनाही हवंय. मध्ययुगीन काळात सततच्या परकीय आक्रमणांमुळे स्त्रीच्या संरक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आणि ती परकीयांच्या हाती लागू नये म्हणून घरात दाबल्या गेली. चूल व मूल हेच तिचं कार्यक्षेत्र झालं. मुली स्त्रिया शत्रूंच्या हाती लागू नये म्हणून बालविवाह, सती,केशवपन अशया वाईट चालीरीती सुरु झाल्या. तेंव्हापासूनच पुरुषसत्ताक पद्धतीचं स्तोम माजलं आणि मुलींनी चूल व मुलंच करावे ही पुरुषी मानसिकता दृढ झाली.

आज २१ व्या शतकातही मुली सर्व क्षेत्रात अग्रेसर असताना मुलींकडून चूल व मूल अशी अपेक्षा करणं चुकीचं आहे. मुलींचे पालक त्यांना मुलांप्रमाणेच भरपूर शिकवून आर्थिकदृष्ट्या सक्षम करून स्वतःच्या पायावर उभं करून जगात ताठ मानेने जगायला शिकवतात .पोटाला चिमटे देऊन ,स्वतःच्या इच्छा आकांक्षाचा त्याग करून मुलींना शिकवलेल्या पालकांना त्यांचा पैसा, त्याग, खाल्लेल्या खस्ता आणि मुलींना त्यांची मेहनत ,कष्ट वाया गेलेले तरी आवडतील काय? मुलांच्या पालकांनी जरा विचार करायला हवा. नाहीतर स्त्री सक्षमीकरण ,स्त्री सबलीकरण हे शब्द

फोल ठरतील.

मुलींच्या शिकण्यामुळे घटस्फोट वाढलेत मुलींच्या शिकण्यामुळे घटस्फोट वाढलेत असाही आरोप सर्रास केल्या जातो. काय तर म्हणे मुली अति शिकल्यामुळे मुलींच्या अपेक्षा  फार वाढल्यात, त्यामुळे लग्न जुळत नाहीत आणि टिकतही नाहीत. हल्लीच्या मुलींना, स्त्रियांना तडजोड करणं जमतच नाही. मग मुलांनीही, पुरुषांनीही करावी की तडजोड? स्त्रियांनीच काय ठेका घेतला आहे का तडजोडीचा? करायची तेंव्हा भरपूर तडजोड केलीय त्यांनी . तोंडातून ब्र ही न काढता असंख्य अन्याय, अत्याचार निमूटपणे सहन केलेत. पुरुषी वर्चस्वात कोंडवाड्यात जनावरांप्रमाणे राहिलीय ती म्हणून आजही तिने तडजोड करत  सर्व सहन करावं काय? संसारासाठी,मुलांसाठी करिअर, मोठी पदे सोडून घरीही बसलीय ती. आज शिक्षणामुळे तिची अस्मिता जागृत झालीय, तिला तिच्या हक्कांची, अधिकारांची जाणीव झालीय. ती पूर्वीसारखा अन्याय सहन करत बसत मुळमुळं रडणारी नाही तर त्याला विरोध करणारी आहे, अन्यायाला वाचा फोडणारी आहे. तिला माणूस म्हणून जगायचं आहे. त्यासाठी  ती आवाज उठवते आहे. यावरून  स्त्रियांची तडजोडीची क्षमता संपलीय म्हणून घटस्फोटाचं प्रमाण वाढलंय हा आरोप चुकीचा आहे. आजच्या काळांत पुरुषांना  तडजोड करण्याचे दिवस आले आहेत, ते त्यांनी लक्षात घेतलं पाहिजे. संसारात पती पत्नी प्रसंगी मुलं, घरचे जेष्ठ सगळ्यांनाच तडजोड करावी लागत असते. तडजोड कुठे करावी लागत नाही? घरी, दारी, शेजारीपाजारी, कार्यालयात, समाजात वावरताना सगळीकडे तडजोड करावीच लागते, जी प्रत्येकजण करत असतो. मग मुली, स्त्रियांकडूनच जास्त अपेक्षा

का?

आज मुलींच्या अपेक्षा वाढल्यात हे मुलांना, पुरुषांना का झोंबावं बरं? पूर्वी मुलांच्याही भरमसाठ अपेक्षा राहत होत्या. मुलगी नोकरीवलीच पाहिजे, सायन्सवाली हवी, गृहकृत्यदक्ष हवी, गोरीच हवी, आणि

बऱ्याच काही ,यादी फार मोठी आहे.चालून दाखव, गाऊन दाखव यासारखे अपमान ती सहन करत असे. आज मुली मुलांच्या बरोबरीने शिकल्यात तर त्यांच्याही मुलांप्रमाणे अपेक्षा असतील तर त्यात मुलांना ,समाजाला वावगं का वाटावं ? अर्थात मुलांच्या काय किंवा मुलींच्या काय अवाजवी अपेक्षा नसाव्यातच .दोन्ही पक्षांनी जुळवूनच घेतलं नाही तर लग्न जुळणार कसं न ? गरज दोन्ही बाजूंची असते ना? हल्ली सकारात्मक बदल हळूहळू होत आहेत . मुलंही तडजोड करत आहेत. वरपक्ष वधूपक्ष साक्षगंध साखरपुड्याचा खर्च ,लग्न खर्च, अर्धा अर्धा वाटून घेत आहेत. वरपक्षाचा बडेजाव ,मोठेपणा हळूहळू कमी होतोय कारण मुलांची लग्न जुळत नाही आहेत , मुली मिळेनाशा झाल्या आहेत त्यामुळे गरज त्यांचीही असल्याने ताठा जरा कमी झालाय, पण हे चित्र फक्त महाराष्ट्रीयन कुटुंबात दिसतंय परंतु अन्य समाजात ,अन्य राज्यात वरपक्षाचा वरचष्मा अधिक आहे , आजही हुंडा, देवाणघेवाण आणि मानपान,सोनं नाणं यावरून लग्न मोडत आहेत, मुली हुंडाबळी, ठरत आहेत. त्यांना जाळलं जातंय ,मारलं जातंय .घरगुती हिंसाचार होत आहेत. हे चित्र अर्थातच भारतीय समाजाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने घातक आणि निराशाजनक आहे. काही समाज पुरुषसत्ताक पद्धतीच्या पगड्यातून बाहेर पडायला तयारच नाहीत.

काही लिव्ह इन रिलेशनशिप

मध्ये, किंवा प्रेमात  ५, ७ वर्षे सोबत राहिलेल्या मुली जेंव्हां लग्नाला तयार होतात तेंव्हा एंगेजमेंट आणि लग्नाच्यावेळी पैसा, कार, बाईक ,सोनं मागणी असे भयानक अनुभव आलेले आहेत आणि लग्न तुटली आहेत. अश्या प्रसंगी मुलानेही घरच्यांनीच साथ दिलीय. लग्नाआधीच चित्र स्पष्ट झाल्याने अर्थातच लग्न मोडल्या गेलीत. मुली प्रसंगी आई वडिलांना विरोध करतात, धैर्याने निर्णय घेतात पण मुले मात्र ऐनवेळी पड खातात. घरच्यांविरुद्ध जात नाहीत ,ना विरोधात अवाक्षरही काढत. ५,७ वर्षे सोबत राहूनही मुलींना मुलांचे, त्यांच्या घरच्यांचे स्वभाव कळत नाहीत याचं आश्चर्यही वाटतं कारण मुलं रंग बदलत असतात. लग्नाआधीच्या आणि लग्नानंतर जुळलेल्या  प्रेम संबंधांमुळे आज अनेक घटस्फोट होत आहेत .काही ठिकाणी तर पहिला प्रेमविवाहही होऊनही पुन्हा विवाहबाह्य संबंधांमुळे एक दोन वर्षातच घटस्फोट झालेले आहेत.

काही मुलींनी प्रेमविवाह करून पती जरी मनाप्रमाणे निवडला असला तरी त्यांचे मुलांच्या कुटुंबियांशी जमत नाही कारण लग्न हे फक्त दोघांचं नसतं तर दोन कुटुंब जोडल्या जातात. मग घरात प्रचंड धुसफूस सुरु असते. आधी प्रेमात आकाशातील तारे तोडून आणणारा प्रेमी नवरा झाल्यावर बदलतो व कुटुंबीयांसमोर बायकोची न कधी बाजू घेत न कधी तिचा मानसन्मान राखत. नेहमी घरच्यांना झुकते माप देत बायकोवर सतत अन्याय करतो. मुलींच्या भाषेत आजही मुलं मम्माज बॉय आहेत. त्यांना बायको आणि आई या दोन पारड्यात समतोल साधता येत नाहीये आणि आमच्याकडून अपेक्षा करतात की आम्ही त्यांच्या कुटुंबात साखरेसारखं विरघळून

जावं.. सासरी गेल्यावर तडजोड करावीच लागणार ही मानसिकता ठेऊनच सासरी पाऊल ठेवावं वगैरे वैगरे ऐकवतात. हल्लीच्या मुली हे सहन करणं शक्यच नाहीत. मुलांच्या अश्या वर्तनामुळे, मित्र मैत्रिणींना आलेल्या अनुभवांमुळे मुलींचे लग्न न करण्याचे मत पक्के होत चालले आहे. 'सुखाचा जीव कशाला दुःखात घाला आणि दोन्ही कुटुंबियांना टेन्शन द्या.एकटा जीव सदाशिव बरा.', अशी मुलींची मानसिकताहोण्याची अन्यही कारणं आहेत.

आज 'वेडिंग वर्सेस मॅरेज' असं लग्नाचं स्वरूप झालेलं आहे. लग्न ही 'इव्हेंट इंडस्ट्री' झालीय. पूर्वी लग्न एक संस्कार असायचा,आज तो फक्त सोहळा झालाय. सोहळ्याचं स्वरूप आल्यानेच त्यातील पावित्र्य जाऊन दिखाऊपणा, भपकेबाजपणा वाढलाय. कपडालत्ता,दागदागिने,मानपान ,भेट वस्तू देणेघेणे, सजावट, फोटो विडिओ, बुफेत अनेक पद्धतींचे असंख्य पदार्थ ठेवणे याला अवास्तव महत्व आलंय. त्यात 'प्रीवेडींग शूट' डेस्टिनेशनवेडींग, मेहंदी, संगीत, रिसेप्शनची भर पडलीय. हौसेच्या नावाखाली वारेमाप पैसा उधळला जातोय . मग एक दोन वर्षात मुलगी घरी वापस आली की तो खर्च केलेला पैसा अक्षरशः वाया जातो. साध्या पद्धतीने किंवा नोंदणी पद्धतीने लग्न करून काही रक्कम मुलामुलींच्या खात्यात टाकली तर त्यांच्याच संसाराला कमी येईल. पण हा विचार करणारे बोटावर मोजण्या इतकेच. एकुलता एक मुलगा ,मुलगी असल्याने एका पक्षाचे मत चालतच नाही. दोन्ही पक्ष समविचाराचे मिळणं अवघडंच असतं.

काही ठिकाणी तर एकुलती एक मुलगी पाहून ,तिच्या वडिलांची श्रीमंती पाहून म्हणजेच पैसा पाहून

लग्न केल्या जातं. यातूनच मग पैशांची अधिकाधिक मागणी सुरु होऊन मुलीवर अत्याचार केले जातात आणि लग्न मोडल्या जातं. आजही अनेक सुशिक्षित घरातून हे दृश्य पाहायला मिळतंय.

काही मुलांना मैत्रीण बोल्ड हवी असते पण बायको म्हणून साधी, सरळ, सालस, घर सांभाळणारी गृहिणी हवी असते. मुलींना ते त्याच्यापेक्षा मोठा हुद्दा, जास्त पगार आणि करिअर यावरून जेंव्हा नकार देतात तेंव्हा त्यांच्यातील पुरुषी मानसिकता ढळढळीतपणे दिसून येते. हल्ली लिव्ह इन रिलेशनशीप, प्रेमविवाह, परिचयोत्तर विवाहाच्या काळांत लग्नाची मुलंमुली साधारणपणे वयाने बरोबरीचीच असतात. एखाद दोन वर्षांचं अंतर असतं. हल्लीच्या तरुण तरुणींना ५ वर्षांचं अंतरही एक पिढीचं अंतर वाटतं. लग्नाळू मुलामुलीत लहान मोठा वयाचा प्रश्नच राहिला नसताना, अनेक मुलं वयाने मोठ्या मुलींशी स्वखुशीने लग्न करत असताना काही स्थळांच्या बाबतीत मुलगी मुलापेक्षा ६ महिन्यांनी तरी लहान असावी अशी इच्छा व्यक्त केली जाते .याला काय म्हणावं ? मुलगा हा मुलीपेक्षा कायम मोठाच असावा हा विचार भारतीय मानसिकतेत डोक्यात पूर्वापार फिट्ट बसलेला आहे जो अजूनही आहेच .

मध्यंतरी ऑनलाईन एक सर्वे पाहण्यात आला. त्यात मुलींना लग्नानंतर मूल नकोय या त्यांच्या निर्णयावर मुलांची मते विचारली होती. अनेकांनी चांगली उत्तरे दिलीत. मातृत्व हा दागिना, कौटुंबिक गरज, बायोलॉजिकल रिझन, असा निर्णय पूर्ण विचारांती आणि परस्पर सहमतीने घ्यावा, स्त्रीचे शरीरं मग तो तिचा अधिकार अशी अनेक सेन्सिबल मतं मुलांनी मांडलीत. पण एका आयआयटीयन मुलाचे विचार ऐकून

मला धक्काच बसला. त्याने लिहिले होते की स्त्रीचं काम फक्त आणि फक्त प्रजोत्पादन करणं एवढच आहे. आजच्या काळातील इतक्या उच्चशिक्षित मुलाचे १८५७ च्या काळातील विचार वाचून प्रचंड संताप आला. त्याच्या या विचारांमुळेच त्याचं लग्न झालं नाहीये असं वरून आपल्या विचारांचं समर्थन तो करत होता. त्याला जर क्रिकेट, फुटबॉलची टीम तयार करायची असेल तर खरंच आजच्या काळातील कोणती मुलगी त्याला होकार देणार ना !

मुलंच नकोत किंवा अनेक मुलं हवीत या दोन्ही टोकाच्या विचारांची मुलेमुली आजन्म अविवाहितचं राहतील यात शंकाच नाही. मी फक्त मुलींचीच बाजू घेतेय असे नाही पण जवळची अनेक उदाहरणं बघितलीत,अनेकींचे अनुभव ऐकलेत, अनेक मुलींशी बोलले त्यातून त्यांचं दु:ख आणि विचार कळले आणि आजचं जे बदलतं चित्र स्पष्ट झालं ते वाचकांसमोर सादर केलं.. मुलींचीही बाजू मांडायलाच हवी नं? पुरुषसत्ताक पद्धतीचा पगडा केंव्हा दूर होणार ? पुरुषी मानसिकता बदलायला कोणते युग उजाडेल ? हे आजच्या मुलींनी मला विचारलेले प्रश्न आहेत जे त्यांच्यावतीने मी येथे मांडले आहेत.

शेवटी लग्न हा पूर्वीही 'जुगार' होता ,आजही आहे. पूर्वीही अनेक प्रकारे फसवणूक व्हायची. खोटी पत्रिका दाखवणं, आजार, व्यसनं, अपंगत्व, नोकरी, व्यवसाय लपविणं, एका मुला मुलीला दाखवून भलत्यालाच लग्नाला उभं करणं अशी फसवणूक पूर्वी व्हायची जी आजही होतेय ,उलट आज जास्त होतेय असं मी म्हणेन कारण पूर्वी स्थळं पंचक्रोशीतले असायचे, माहिती काढल्या जायची .आज ऑनलाईन कारभारात जास्त फसवणुकीचा धोका वाढलाय. शेवटी मनं जुळलीत की पद, पैसा, श्रीमंती, गरिबी, जात, धर्म, प्रथा,

परंपरा, भाषा, प्रदेश काहीही आड येत नाही आणि लग्न  टिकतात. आजही आंतरधर्मीय, आंतरजातीय विवाह होत आहेत.

'वेडिंग वर्सेस मॅरेज ','करिअर वर्सेस मॅरेज' हे द्वंद्व  सोडवण्यात जी जोडपी यशस्वी होतील त्यांची लग्न नक्कीच टिकतील. कारण आज सर्व समाज वेडिंग म्हणजे सोहळा, इव्हेंटच्या, डेस्टिनेशन वेडींगच्या मागे लागलाय. कोरोना काळातही चार चार, पाच पाच दिवस  लग्न  झालेली मी पाहिली आहेत. हे इव्हेंटचं, सेलिब्रेशनचं प्रस्थ जरा कमी व्हायला हवं. तसंच पत्रिका, कुंडली पाहण्याचा अतिरेक करण्यापेक्षा ब्लडग्रुप पाहणं, विवाहपूर्व HIV टेस्ट करण्यावर वरवधुपक्षांनी भर द्यायला हवा.विवाहपूर्व समुपदेशनात मॅरेज म्हणजे लग्न संस्काराचं महत्व, त्याचं पावित्र्य, त्याचा अर्थ, त्याची वैद्यकीय, जैविक, लैंगिक दृष्टिकोनातून असलेली सर्वतोपरी गरज आजच्या अतिव्यवहारी युवा पिढीला समजावून सांगायला हवीय. हे काम जेष्ठ पिढीचं ,समुपदेशकांच आहे, विवाह

जुळवणाऱ्या  संस्थांचं आहे. तसंच युवापिढीनेही आक्रस्ताळेपणा न करता ,एकांगी विचार न करता विवेकाने विचार करावा.मुलांनी आणि समाजाने पुरुषसत्ताक पद्धतीचा पगडा झुगारून पुरुषी मानसिकतेतून बाहेर पडावं.

तरच काही प्रमाणात लग्न समस्या सुटू शकतील.  कारण गरज मुलामुलींची दोन्हींचीही आहे.. आज प्रौढ अविवाहित मुला , मुलींची संख्या झपाट्याने वाढतेय. स्त्रीलिंग गर्भ परीक्षणामुळे  आणि गर्भपातांमुळे मुलींची संख्या आधीच  प्रचंड प्रमाणात कमी झाल्याने राजस्थान, हरियाणा, उत्तरप्रदेश,  बिहार राज्यात मुलांना लग्नाला मुली मिळेनाशा  झाल्याने लग्न झाली नाहीत आणि

बलात्कारासारख्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली. तो एक नवीनच प्रश्न निर्माण झाला .प्रौढ मुला मुलींचं प्रमाण वाढण्याची अशीच गती राहिल्यास येत्या १० वर्षात विवाह संस्थेसोबत कुटुंब संस्थाही संपुष्टात येईल हे जे भाकीत वर्तवण्यात आलेलं आहे ते समाजाच्या दुर्दैवाने खरं होईल. परिणामत: कधीही न सुटणाऱ्या अनेक प्रश्नांची, समस्यांची त्यात अधिकाधिक भर पडत राहील जे समाज स्वाथ्याच्या दृष्टीने अत्यंत हानिकारक ठरेल. तेंव्हा समाजाने म्हणजे आपण सर्वांनीच वेळीच सावध होऊन उपाय योजनांवर लक्ष केंद्रित करून त्यांची तातडीने अमलबजावणी करण्याची निकड निर्माण झालीय.

# निसर्ग एक कलावंत.... !!!

निर्मिती ढेवलसी

**किती लुटावे डोळ्यांनी**

**दिवसाचे निळेपण ।**

**काच रंगेना मनाची**

**उमटेना निळी धून ।।**

निसर्गाची महती वर्णन करावयास कवयित्री इंदिरा संत यांच्या या ओळी पुरेशा आहेत. आईप्रमाणे मायेची ऊब देणारा निसर्ग! रौद्ररूप धारण करणारा निसर्ग! जीवन संगीत सुनावणारा निसर्ग! आयुष्याचे अंतिम सत्य सांगणारा निसर्ग! किती आणि कोणती रूपे वर्णावीत निसर्गाची ?

निसर्ग म्हणजे अनेक चमत्कृतींची मालिकाचं !

निसर्ग म्हणजे या विश्वाच्या अफाट पसाऱ्यामध्ये जे-जे स्वयंनिर्मित आहे, जे मानवाने निर्माण केलेले नाही. उंच उंच बर्फाच्छादित पर्वत, शिखरे, खोल खोल दऱ्या, सपाट मैदाने, वाळवंटे, जंगले, निळे आकाश, चंद्र, सूर्य, तारे, नद्या, समुद्र हे सर्व ज्या विधात्याने निर्माण केले त्याचे सगुण रूप मात्र कोणालाच दिसत नाही .

निसर्ग एक फार मोठा कलाकार आहे. त्याचे अदृश्य हात नेहमी या सृष्टीला नटविण्यात, सजविण्यात गुंतलेले असतात. पावसाळ्यात हिरवीगार, मऊ, मुलायम शाल पांघरलेली धरती आपल्या हिरव्या वैभवाचे प्रदर्शन करण्यासाठी जणू उंच - उंच हिरवे तुरे उभारते तेव्हा हिरव्या रंगाच्या विविध छटा पाहून मन आनंदित व विस्मित होते आंबा, फ़णस, पळस, पिंपळ, नारळी या वृक्षांच्या पानांचे आकार, रंग, यांमध्ये केवढे वैविध्य असते. चाफा, जाई - जुई, मोगरा, कमळ, गुलाब यांसारखी रंगेबिरंगी फुले, पाकळ्यांचे

मनमोहक आकार अनेक रंगछटा व सुगंध हे सर्व त्यांच्यामध्ये कोण भरत असतो ? तेव्हा मनात विचार स्पर्शून जातो की ,

यह कौन चित्रकार है ?

खरं तर चित्रकार सुद्धा आपल्या रंगाच्या छटाने निसर्गाची विविध रूपे रंगवीत असतो. पानांचा हिरवा रंग, रंगेबिरंगी फुलांच्या छटा, त्यात पहाटेचा झुंजू मुंजू आवाज, झुळझुळणार पाणी, सळसळणारा वारा, सूर्योदयाच्या व सूर्यास्ताच्या सुंदर छटा, शुक्राचं सुंदर चांदणं, पौर्णिमेचा सुंदर चंद्र ह्या सगळ्या गोष्टीचं वर्णन चित्रकार आपल्या चित्रात चितारत असतो . पण ही सगळी तर निसर्गाचीच किमया फक्त मनुष्य तो आपल्या कलेतून तिचे सौंदर्य खुलवित असतो.

त्याचप्रमाणे संगीत कला सुद्धा होय , अगदी पहाटेच्या वासुदेवाच्या गाण्यापासून म्हणजे , ' वासुदेव आला हो वासुदेव आला...' ह्या त्याच्या उच्चारणं, सकाळच्या चिमण्या, कोकीळेचा मंजुळ आवाजसुद्धा संगीत कलेत एकरूप होतात. ह्यात हिरव्या निसर्गाची वर्णने, श्रावणातील सुंदर वातावरणाचे गीत, वसंताची पतझड, चैत्राची पालवी, आंब्याचा मोहोर, हे सारं काही निसर्गाचं देणं .

निळया आकाशाच्या पटलावर सप्तरंगी इंद्रधनुष्याचे तोरण क्षणार्धात उभारून सर्वांना मोहित करणारा निसर्ग खरोखरचं एक कलावंत आहे . अमृताच्या चवीची रसाळ फळे , विविध गुणधर्म असणाऱ्या वनस्पती या सर्वांची उदारहस्ते उधळण करणारा निसर्ग महान आहे . ' निसर्ग हा खरचं अद्भुत कलाकार आहे की आपल्या कलाकृतींमध्ये रूप, रंग, रस आणि गंध यांचीही तो निर्मिती करू शकतो.

‘ Change is the law of nature ’

या निमित्ताने आपल्याला निसर्गाची रूपे पहावयास मिळतात . हिवाळ्यातील , पावसाळ्यातील आणि

म्हणून तर म्हणतात -

" Nature is as old as the earth and as new as the moment "

फुलपाखरांचे मनमोहक रंग, रंगेबिरंगी पक्षी, रात्रीच्या वेळी आकाशात दिसणारे चंद्र आणि चांदण्यांचे अलौकिक सौंदर्य, सूर्योदय व सूर्यास्ताच्या वेळी आकाशात झालेली रंगांची बरसात, सोनेरी-रुपेरी किनार प्राप्त झाल्यामुळे मनाला मोहित करणारे काळे-पांढरे ढग देहभान हरपून टाकतात.

बालकवी, रवींद्रनाथ टागोर, जयशंकर प्रसाद यांसारख्या कवींनी निसर्गाचे वेडे वर्णनं केले होते .

**" श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे "**

**किंवा**

**" हिरवे-हिरवे गार गालिचे हरित तृणांच्या मखमालीचे "**

यासारख्या रम्य निसर्गकाव्याची निर्मिती करण्याची प्रेरणासुद्धा या कालावंतानेच दिली आहे. सामान्य माणुस सुद्धा या निसर्गरूपी कलावंताने साकारलेली सुंदर कलाकृतींचे दर्शन घ्यावयास आसुसलेला असतो. निसर्गाची भाषा समजावून घेतली पाहिजे, त्याची भव्यता, त्याचे सौंदर्य, त्याचे औदार्य व त्याच्या ठिकाणी असलेली समानता मानवाने आत्मसात केली पाहिजे. तो मानवाला जगण्याची प्रेरणा देतो, केवढे माधुर्य, मांगल्य, पावित्र्य आणि सधनता आहे निसर्गात ! मानवी जीवन सुखी, समृद्ध बनविण्यात निसर्गाचा मोलाचा वाटा आहे. निसर्गाच्या सानिध्यात जावे, त्याचे वैविध्य, त्याची कलाकुसर पहावी, त्याचे सुमधुर संगीत ऐकावे पण त्याच्या कलाकृती ढवळाढवळ करून मात्र त्याचा समतोल मानवाने बिघडवू नये .

म्हणूनच म्हणावेसे वाटते -

**" हे मानवा नकोस ढळू देऊ दे तुझा तोल**

**निसर्गाचा राखावयाचा आहेच समतोल**

**मानवाचा गेलाच तोल तर -**

**निसर्ग दाखवेल त्याचे खरे मोल !**

म्हणून ,

अरे माणसा तू निसर्गातील प्रत्येक गोष्टीशी संवाद साधून सुंदर बोल , कारण मानवा तुझे जीवन आहे अनमोल , तू निसर्गाशी सतत बोल , सतत बोल , सतत बोल !!!



"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

# कर्तुत्वशालिनी - लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर

सर्वेश फडणवीस



लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर

**यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।**

**यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ।।**

ही मनुस्मृतिची शिकवण आम्हाला परंपरेने मिळालेलं वैभव आहे. याच परंपरेचे पाईक म्हणून कर्तृत्ववान स्त्रियांचा उल्लेख करता येईल अशा काही स्त्रियांचा यानिमित्ताने आपण परिचय करून घेणार आहोंत. या धारेत आजची कर्तृत्वशालिनी स्त्री लेफ्टनंट जनरल डॉ.माधुरी कानिटकर यांच्याबद्दल आपण जाणून घेणार आहोत.

लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर या भारतीय लष्करातील डॉक्टर असून पुणे येथील आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेजच्या पहिल्या महिला अधिष्ठाता आहेत. लेफ्टनंट जनरल या पदापर्यंत पोहचणाऱ्या त्या देशातील तिसऱ्या, तर राज्यातील एकमेव महिला ठरल्या आहेत. इतकेच नव्हे, तर पंतप्रधानांच्या सायन्स टेक्नॉलॉजी सल्लागार समितीत असणाऱ्या एकमेव डॉक्टर म्हणून त्यांची वर्णी लागली आहे. डॉ.माधुरी कानिटकर पुण्याच्या आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थिनी असून त्यांना राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले आहे. २०१७ मध्ये त्या पुण्याच्या आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेजच्या अधिष्ठाता होत्या. तेथे दोन वर्षे काम केल्यानंतर त्यांनी

उधमपूर येथे मेजर जनरल (वैद्यकीय) पदाची जबाबदारी स्वीकारली आहे. लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी राजीव कानिटकर यांची नुकतीच नाशिक येथील आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी ले. ज. डॉ. माधुरी कानिटकर यांची नियुक्ती जाहीर केली आहे.

त्रितारांकित अधिकाऱ्यांचे पद नौदलात व्हाइस ॲडमिरल, स्थलसेनेत लेफ्टनंट जनरल तर हवाई दलात एअर मार्शल या नावाने ओळखले जाते. लेफ्टनंट जनरल पद भूषवण्याचा पहिला मान पुनिता अरोरा यांना आहे. त्यानंतर पद्मावती बंडोपाध्याय या पहिल्या महिला एअर मार्शल ठरल्या, तर आता डॉ.माधुरी कानिटकर या लेफ्टनंट जनरल झाल्या आहेत.

डॉ. माधुरी कानिटकर यांची लेफ्टनंट जनरलपदी निवड गेल्या वर्षीच झाली आहे. नवी दिल्ली येथे त्यांनी एकात्मिक संरक्षण विभागाच्या उपप्रमुख (सीडीएस- वैद्यकीय) म्हणून सूत्रे त्यांनी हाती घेतली आहे. हा विभाग संरक्षण प्रमुख यंत्रणेच्या अंतर्गत आहे. लष्करात या श्रेणीचे पद मिळवणाऱ्या डॉ.माधुरी कानिटकर या तिसऱ्या महिला अधिकारी असून त्या बालरोगतज्ज्ञ आहेत. डॉ.माधुरी कानिटकर यांचे पती राजीव कानिटकर लष्करात लेफ्टनंट जनरल होते. ते नुकतेच निवृत्त झाले. खरंतर पती-पत्नीने लष्करात लेफ्टनंट कर्नलपद भूषवल्याची ही पहिलीच घटना आहे.

डॉ. माधुरी कानिटकर यांनी लष्करात ३७ वर्षे सेवा केली आहे. भारतीय लष्कराच्या तिन्ही सेवांबाबत (हवाई दल, नौदल आणि स्थलसेना) केंद्र सरकारला सल्ला देण्याचे काम त्या करत आहेत.

डॉ. माधुरी कानिटकर यांना १९८२ मध्ये अभ्यास आणि शिक्षणविषयक क्षेत्रातील कामगिरीबद्दल राष्ट्रपतींचे सुवर्ण पदक तसेच कर्तव्याप्रती असलेली निष्ठा आणि बालकांच्या काळजीसाठी दिलेल्या विशेष योगदानासाठी २०१४ साली विशिष्ट सेवा पदक आणि २०१८ साली अति विशिष्ट सेवा पदक देऊन त्यांना गौरविण्यात आले आहे.

डॉ.माधुरी कानिटकर यांच्याबद्दल अधिक जाणून घेतांना एका मुलाखतीत त्यांनी छान सांगितले. त्या म्हणतात,

"भारतीय लष्कराचे कामकाज महिलांच्या दृष्टिकोनातून विचार करता पारदर्शक, न्याय्य असून महिलांना तेथे कर्तृत्व दाखवण्याची संधी निश्चितच मिळते. लष्करी वेशात असतानाही प्रत्येक दिवस मुलाच्या उत्साहात आनंदाने साजरा करा, अशक्य ते साध्य करण्याचे आव्हान तुम्ही स्वत:च स्वत:ला द्या. कधीही हार मानू नका. निम्मे जग तर महिलांचेच आहे, पण सेवेसाठी सगळे जग तुमच्यासाठी खुले आहे. त्यामुळे तुमच्यातील जे उत्तम असेल ते देशासाठी द्या."

मराठी मध्यमवर्गीय कुटुंबातील एक मुलगी घरच्या विरोधाला न जुमानता आपली यशस्वी कारकीर्द घडवते आणि आज ले.ज. या पदावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण करते.

हा प्रवास म्हणावा तसा सोपा नाहीच. त्याग, जिद्द, परिश्रम आणि मेहनत या चतुःसूत्रीच्या आधाराने ले. ज. डॉ.माधुरी कानिटकर हे नाव सुवर्णाक्षरांनी अंकित करून ठेवावे असेच आहे. त्यांच्या भावी वाटचालीस मनापासून शुभेच्छा आहे.

# दैवी स्वरावतार

सुनिल शिनखेडे

बोलके किंवा लिखित शब्द स्वरांपुढे नेहमीच थिटे असतात याची प्रचिती आज प्रकर्षाने येते आहे. निःशब्द व्हावं, मौनात साठवावं असं दुःख लतादीदींच्या वियोगाने झालं आहे. "लता मंगेशकर" या सात स्वरांनी जगावर अधिराज्य गाजवलं. सगळ्या प्रकारच्या रस आणि भावांची निर्मिती गाण्यातून करणारा एकच स्वर होता तो लतादीदींचा. त्यांच्याशी, त्यांच्या गाण्याशी आपलं नातं या स्वरभावनेतूनच उमललं होतं. गाणं न कळणाराही लतादीदींच्या स्वरमोहिनीने थबकत त्या भावस्वरांशी समरस होत असे. गाणं कळणारा चकित होत असे आणि गाणं जगणारा या दैवी स्वरावतारापुढे लीन आणि स्वरदर्शनाने मंत्रमुग्ध !!

लतादीदींसारखे व्यक्तिमत्व म्हणजे एक युग! कोवळ्या वयात कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे त्यांच्या डोळ्यांपुढे अंधार होता तरी गळ्यातला गंधार संघर्षाच्या वाटेवर यशाचे दीप उजळत राहिला. वडील दीनानाथांच्या सुरांचा वारसा आणि वसा या गात्या गळ्याने शेवटच्या श्वासापर्यंत जपला. त्याचे अलौकिकत्व गाण्यात आणि जगण्यात कणभरही कणसूर होऊ दिले नाही. ज्या काळात लतादीदी गात आहेत त्या काळात आपणही जगतो आहोत हा दिलासा कोट्यवधी चाहत्यांच्या मनाला समृद्ध करणारा ठरला.

लतादीदी म्हणजे खऱ्या अर्थाने आनंदघन. हा आनंद त्यांनी कधीही झाकोळू दिला नाही. त्यांच्यात एक निरागस लडिवाळपण होतं. कुतूहल होतं. साधेपण तर इतकं मूर्तिमंत की साधेपणानेही संकोचून जावं.

मराठी असल्याचा त्यांना अभिमान होता. छत्रपती शिवाजी महाराज, स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर ही त्यांची दैवतं. बाळासाहेब ठाकरे, अटलजी यांना त्या मानत. क्रिकेटची त्यांना आवड होती आणि सुनील गावस्कर, सचिन तेंडुलकर यांच्या खेळाच्या त्या प्रशंसक होत्या. भालजी पेंढारकर यांच्यापासून महानोरांपर्यंत, गोनीदांपासून बाबासाहेब पुरंदरेंपर्यंत त्यांचे अभिमानाचे आणि आस्थेचे विषय होते. सीमेवरच्या जवानांबद्दल त्यांच्या मनात कृतिशील आदर आणि अभिमान होता.

ज्ञानोबा माऊलींचे, संत तुकोबांचे अभंग, भा. रा. तांबे यांची भावगीतं, सावरकरांची महन्मंगल स्तोत्रगीतं, महानोर, सुरेश भट, बा. भ. बोरकर यांच्या कविता लतादीदींनी गायिल्यामुळेच मनामनात पोचल्या. हिंदी चित्रपट सृष्टीतली त्यांची कारकीर्द म्हणजे तर स्वतंत्र लेखविषय व्हावा असा सुरेल चंदेरी प्रवास! आकाशवाणीशी लतादीदींचं घट्ट नातं होतं. पुणे आकाशवाणीत त्या येऊन गेल्या तेव्हाच्या आठवणी शब्दचित्ररूपांनी आजही तिथे ताज्या आहेत. आज देशभरातल्या चारशेहून अधिक आकाशवाणी केंद्रांवरून पहाटेपासून रात्रीपर्यंत सगळे ऋतूप्रहर लताचा स्वर अवकाशात रुंजी घालत असतो. पु. ल. देशपांडे एकदा म्हणाले होते, "आकाशात सूर्य आहे, चंद्र आहे आणि लताचा स्वर ! "

लतादीदींना भेटण्याचा योग मला कधी आला नाही; परंतु त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षात माझ्या भावना मी एका कवितेत व्यक्त केल्या होत्या, त्या अशा -

**मंद स्वरांच्या चंद्रज्योतींनी**

**नितळ उजळले अवघे मानस**

**अमृतवर्षावात नाहतो**

**कल्पवृक्ष हा नितांत सालस!**

नकळत आले वयात गाणे

ताल-तोल तू सावरला

सप्तकात ला सा झाल्याने

पंचम फुलला, दाद तुला!

तूच पल्लवित केलीस आशा

उषा तूच, हृदयस्थही तू

तुझ्या स्वरांच्या हिंदोळ्यावर

इथे बहरती सर्व ऋतू !

विश्वाचे या आर्त तुझ्यामधि

आनंदाचा तू अमृतघन

चिरंतनाच्या पालवीसही

तुझ्या स्वरांचे नित संजीवन !

मराठीतले ख्यातनाम समीक्षक आमचे सर डॉ. द. भि. कुलकर्णी एकदा म्हणाले होते की, "एक अलौकिक व्यक्ती जेव्हा आपल्यातून देहरूपाने निघून जाते तेव्हा तिच्याभोवतीचे धुके विरून जाते आणि स्वत्व उरते." तसे लतादीदींचे दैहिक अस्तित्व आता सरले असले तरी त्यांचा दैवी स्वर उरला आहे आणि तो आचंद्रसूर्य पृथ्वीतलावर, अवकाशात रुणझुणत राहणार आहे.

# || भाग्यदा लक्ष्मी बराम्मा ||

वादिराज विनायक लिमये

**नपुंसकमितिज्ञात्वा प्रियायैः प्रेषितं मनः ।**

**तत्तु तत्रैव रमते हताः पाणिनिना वयम् ॥**

मन हे नपुंसक आहे असे व्याकरण सांगते म्हणून ते प्रियेकडे पाठवले पण ते तर तिच्यात रममाण झाले तेव्हा आम्ही पाणिनीकडून जणू फसवलेच गेलो. संस्कृतातील ही उक्ती मन आणि स्त्री हिचे नाते मोजक्याच शब्दात सांगून जाते. प्रत्येक पुरूषाच्या जीवनात स्त्रीचे असे एक अढळ स्थान असते. त्याची सुरूवात अर्थातच आईपासून होते. पतनात् त्रायते सा पत्नी । अशी जिची व्याख्या जिथे होते ती संकटातून तारणारी पत्नी पुरूषाच्या जीवनात आईचेच स्थान घेते असे म्हणले तर वावगे ठरणार नाही. पत्नीचे, स्त्रीचे संतांच्या जीवनातील स्थान हा तर कित्येक शोध निबंधांचा विषय होऊ शकतो. गृहस्थाश्रमातील पुरूषास संन्यास घ्यायचा झाल्यास त्याला त्याच्या पत्नीची अनुमती घ्यावी लागते. तसेच ब्रह्मचर्यातून संन्यास घ्यायचे झाल्यास त्या मुलास आईची अनुमती घ्यावी लागते व संन्यासानंतरही देव-गुरूंनंतर केवळ आईस नमस्कार करण्याचा अधिकार त्यास असतो नव्हे तर ते त्याचे कर्तव्यच असते.

ह्या स्थानाचा विचार करत असताना अनेक संतांची चरित्रे आठवली. त्यांच्या साधक अवस्थेत त्यांना पूरक ठरलेल्या अनेक घटकांपैकी एक घटका हा निश्चितच त्यांच्या जीवनातील स्त्री आहे. बहुतांश संतांच्या जीवनास कलाटणी देणारी अशी ही स्त्री आई जगज्जननीचेच स्वरूप! अशाच एका संतांचे चरित्र व

त्यांच्या एका सुप्रसिद्ध अभंगाचे थोडक्यात चिंतन त्यांच्या एका सुप्रसिद्ध अभंगाचे थोडक्यात चिंतन करण्यासाठी केलेला हा लेखन प्रपंच!

श्रीमन्मध्वाचार्यांनी रचलेल्या कर्नाटक भक्ती संगीताच्या पायावर दासपरंपरेने कळस चढवला. ही दासपरंपरा महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायासारखीच! दास परंपरेतील दासश्रेष्ठ, एकप्रकारे हरिदासांच्या चळवळीतील प्रमुख दास म्हणजे संत श्रीपुरंदरदास. संत पुरंदरदासांचे जीवन पालटले ते एका छोट्याशा प्रसंगातून आणि भगवंताने त्यासाठी माध्यम बनवले ते त्यांच्या पत्नीसच.

दासांचे पूर्वाश्रमीचे नाव श्रीनिवास नायक होते. त्यांचे घराणे नवकोट नारायणाचे होते. पिढीजात सावकारी होती. कशालाही कमी नव्हती. पैसा म्हणजेच सर्वकाही आणि त्यासाठीच जगायचे एवढा एकच विचार श्रीनिवास नायक करत असत. त्यामुळे सहाजिकच वृत्ती कंजूष आणि क्रूर अशी होती. त्यांची पत्नी सरस्वतीबाई या मात्र अतिशय शांत आणि प्रेमळ स्वभावाच्या होत्या.

श्रीनिवास नायकांना त्यांचे जीवनातील खरे कार्य समजण्यासाठी भगवंताने एके दिवशी एका ब्राह्मणाचे रूप घेतले आणि श्रीनिवास नायकांकडे येत म्हणाला,

“मला माझ्या मुलाचे उपनयन करायचे आहे, तेव्हा आपण मला थोड्या पैशाची मदत करा.”

नायक म्हणाले, “तारण आणले आहे का? तरच पैसे मिळतील.” त्या ब्राह्मणाची दया येऊन पैसे देण्याची वृत्ती श्रीनिवास नायकांची नव्हती. पण तीच वृत्ती पालटवण्यासाठी या विश्वाचा नायक साक्षात श्रीनिवास त्याच्यापुढे आला होता. त्या ब्राह्मणाने रोज येऊन पैसे मागावेत आणि

श्रीनिवास नायकांनी त्यास नकार द्यावा असे अनेक दिवस चालले. शेवटी त्या ब्राह्मणापासून सुटका मिळवण्यासाठी श्रीनिवास नायकांनी त्याला एक फुटका रूपया दिला ज्याला काहीही किंमत नव्हती. तो ब्राह्मण निघून गेला. नंतर त्या ब्राह्मणाने श्रीनिवास नायकांची पत्नी सरस्वतीबाई ह्यांना गाठले. त्या अतिशय दयाळू होत्या. त्याने त्या बाईंना आपल्याला मदत करायला सांगितली. पण त्यांना आपल्या पतीचा स्वभाव माहिती होता. त्यामुळे, "ह्यांच्या परवानगी शिवाय मी तुम्हाला कुठलीच वस्तू देऊ शकत नाही पण ही माझ्या आईवडीलांनी दिलेली नथ आहे ती घ्या." असे म्हणून सरस्वतीबाईंनी त्या ब्राह्मणाला नथ दिली.

तो ब्राह्मण लगेचच श्रीनिवास नायकांकडे आला. त्याला पाहूनच नायक खवळले. पण तो ब्राह्मण म्हणाला, "मी इथे भीक मागायला आलेलो नाही, तारण ठेवायला आणले आहे. मला पैसे द्या."

नायक शांत झाले व म्हणाले, "दाखवा काय आणले आहे तारण म्हणून?" त्याने ती नथ काढून नायकांना दाखवली. ती पाहिल्या बरोबरच नायकांनी ती नथ आपल्या बायकोची आहे हे ओळखले आणि त्या ब्राह्मणाला, "ही तुला कुठे मिळाली?" असे विचारले. त्यावर त्याने, "मला ही बक्षीस म्हणून मिळाली आहे." असे सांगितले. श्रीनिवास नायकांनी त्याला दुसऱ्या दिवशी येऊन पैसे घेण्यास सांगितले.

ब्राह्मण गेल्यावर ती नथ नायकांनी एका पेटीत कड्या कुलपांनी बंद करून ठेवली आणि घरी गेले.

घरी गेल्यावर आपल्या पत्नीच्या नाकात नथ न दिसल्याने नायकांनी



"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

विचारले की, “नथ कुठे आहे?” पत्नीने काहीतरी उत्तर देत कशीतरी वेळ मारून नेली पण नायक आपल्या पत्नीच्या उत्तराने समाधानी नव्हते व ते चिडले होते. त्यांनी नथ आणून देण्यास सांगितले.

सरस्वतीबाईंना खूप अपराधी वाटू लागले. “नथ दिली नाही तर आपली काही खैर नाही. संपत्तीच्या बाबतीत आपला पती इतका कठोर आहे की तो आता आपल्याला शिक्षा करणार. त्यात जीवही जाईल. इतका लोभ माझ्या पतीला झाला आहे. मग त्यापेक्षा आपणच आता विष घेऊन मरावे” असे नायकांच्या पत्नीने मनोमन ठरवले. सरस्वतीबाईंनी एका भाड्यांत विष घेतले आणि भगवंताचे नामस्मरण करत प्राशन करणार इतक्यातच त्या भांड्यात नथ येऊन पडली. सरस्वतीबाईंनी मनोमन भगवंताचे आभार मानले आणि ती नथ धुवून नायकांना आणून दिली. ती नथ पाहून नायक चक्रावले आणि लागलीच सावकारीच्या दफ्तरावर आले. त्यांनी ती कड्या कुलपांमध्ये बंद केलेली पेटी उघडली आणि बघतो तर त्यातील नथ गायब! हा एक दणका नायकांसाठी पुरेसा होता. ते घरी आले. त्यांनी पत्नीला सर्व प्रकार सांगितला.

तो ब्राह्मण म्हणजे दुसरा तिसरा कुणी नसून साक्षात श्रीहरीच होता हे नायकांच्या लक्षात आले. घरावर, सावकरीवर तुळशीपत्र ठेवले आणि हरिकिर्तन करू लागले. “तू नसतीस तर माझा उद्धार कधी झाला नसताच. तुझ्यामुळेच मला माझ्या जीवनाचे खरे कार्य कळले” असे म्हणत नायकांचे पुरंदरदासदास होण्यास कारणीभूत ठरलेल्या सरस्वतीबाईंचे पुरंदरदासांनी एका अभंगात आभार देखील मानले.

भगवंताप्रत जाण्यासाठी आड येणारा मोठा अडथळा म्हणजे त्याची

माया! ही माया विविध रूपांनी साधकासमोर येत असते अन् त्यास भगवंतापासून लांब नेत असते. पण त्या मायेच्या विविध रूपांपैकी एक म्हणजे स्वयं त्याचीच रमणी असलेली रमा अर्थात आई महालक्ष्मी!

लक्ष्मीचे पूजन करायचे ते नारायणसाठीच. तिला विनवावे, तिची प्रार्थना करावी ती त्याच्यासाठीच तसे केले की नारायणामागून तिला यावेच लागते. अशाच आई महालक्ष्मीची विनवणी दास करतात ते एका अभंगातून, भाग्यदा लक्ष्मी बारम्मा!

**भाग्यदा लक्ष्मी बारम्मा ।**

**नम्ममा नी सौभाग्यदा लक्ष्मी बारम्मा ॥**

बारो म्हणजे ये ना, अम्मा म्हणजे आई. ये गं आई अशी विनवणी दास करत आहे. सौभाग्य प्रदान करणारी अशी तू ये आणि आमच्यावर कृपा कर.

**हेज्जेय मेलोंद्हेज्जेय निक्कुत**

**। गेज्जेय कालिन नादव तोरूत ॥**

हेज्ज म्हणजे पाऊल. मेले किंवा मेलोंद्हेज्जेय म्हणजे पाऊलावर पाऊल टाकत. आई, तुझा तर भगवंतापासून, त्या श्रीहरीपासून कधीही वियोग होत नाही. त्यामुळे जिथे जिथे श्रीहरीचे पाऊल तिथे तिथे तुझे पाऊल! नवाविधाभक्तीत पादसेवन भक्ती कोणाकडून शिकावी तर आई महालक्ष्मीकडून! ती भगवंताच्या आधीन आहे. तू तुझ्या पावलातील पैंजणांचा आवाज करत ये! त्याने काय होईल? भगवंतापासून दूर नेणारीही तूच आणि त्याच्या जवळ नेणारीही तूच आहेस, तेव्हा तुझ्या पैंजणांच्या आवाजाने आम्हाला जाग आली की कळेल की तुझे पाऊल त्या श्रीहरीच्या पाऊलावर आहे तो आधी येतो मग तू येतेस. हे ज्ञान होईल. त्यासाठी तू पाऊलावर पाऊल टाकत, पायातील पैंजणांचा आवाज करत ये.

**सज्जन साधु पूजेय वेळगे ।**

**मज्जिगेयोळगिन बेण्णेयंते ॥**

तू आल्याची खूण सज्जनांमध्ये, साधूंमध्ये दिसते. ते जेव्हा तुझी पूजा करतात, तेव्हा "मज्जिगेयोळगिन बेण्णेयंते" म्हणजे ताक घुसळल्यावर जसे त्यातून लोणी वर येते तसेच तुझ्या येण्याने साधू सज्जनांच्या अंतरंगात मंथन चालते आणि त्यातून भक्तीरूपी लोणी बाहेर येते आणि त्या शुद्धभक्तीमुळेच ते भगवंताला जाणतात. अशी कृपा तू करावीस म्हणून हे भाग्यप्रदान करणाऱ्या आई तू ये.

**कनक वृष्टिय करेयुत बारे ।**

**मन कामनेय सिद्धिय तोरे ॥**

म्हणजे सोन्याची वृष्टी करत ये. हे पद पाहता असं वाटू शकतं की, अमाप संपत्तीवर तुळशीपत्र ठेवलेले दास पुन्हा लक्ष्मीला सुवर्णाची वृष्टी का करायला सांगत आहेत? येथे दासांचा भाव, तू कृपेची वृष्टी करत ये, तुझी कृपा हे माझ्यासाठी सोनं आहे असा आहे. तू सर्वांच्या मनोकामना सिद्धीस ने. ज्यांना प्रपंचात तू हवी आहेस त्यांच्याही आणि परमार्थात तू हवी आहेस त्यांच्याही! पुढे म्हणतात,

**दिनकर कोटि तेजदि होळेयुव ।**

**जनकरायन कुमारि बेगा ॥**

तिचे वर्णन दास येथे करतात, तू कशी आहेस? तर कोटी सूर्यांच्या प्रकाशाचे जसे तेज झळाळते, "होळेयुव" म्हणजे दैदीप्यमान. त्या तेजाने दैदीप्यमान असे तुझे रूप आहे. अशा जनक रायाच्या हे कुमारी म्हणजेच सीते तू ये.

**अत्तितगलदे भक्तर मनेयोळु ।**

**नित्य महोत्सव नित्य सुमंगल ॥**

"अत्तितगलदे" म्हणजे सैरावरा न पळता. इकडे-तिकडे न जाता. चंचलता हा लक्ष्मीचा गुण आहे. एकाजागी ती स्थिर नसते. म्हणून दास तिला विनवणी करतात की,



"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

इकडे तिकडे जाऊ नकोस, एकाजागी स्थिर राहा. “भक्तर” म्हणजे भक्तांच्या, “मनेयोळु” म्हणजे घरामध्ये. भक्तांच्या घरांमध्ये तू स्थिर राहा. कारण तू जेव्हा स्थिर राहतेस तेव्हा त्या घरांमध्ये नित्य महोत्सव नित्य सुमंगल ॥ सदैव महोत्सव चालतात, तेथे नित्य,सदैव सुमंगलच घडते.

**सत्यव तोरूत साधु सज्जनर ।**

**चित्तदि होळेयुव पुत्थळि गोंबे ॥**

साधू-सज्जनांना सत्य दाखवणारी अशी तू सोने जसे चकाकते त्या तेजाने दैदिप्यमान होऊन मोहक अशा बाहुलीच्या रूपामध्ये त्यांच्यात स्थित असतेस. यापुढे दास म्हणतात,

**संख्येयिल्लद भाग्यव कोट्टु ।**

**कंकण कैय तिरूवुत बारे ॥**

हे आई तू अगणित असे भाग्य प्रदान करणारी आहेस. तुझे भाग्य हे

असंख्य आहे. संख्येत मोजता न येण्यासारखे. असे अगणित, असंख्य, अमेय भाग्य प्रदान करणारी तू आहेस. वास्तविक पाहता, व्यवहारातील लक्ष्मी आणि मोजणे यांचा खूप जवळचा संबंध आहे. लक्ष्मीला मोजलेच जाते, तिला संख्येत तोललेच जाते. पण दास म्हणतात, तू खरी तशी नाहीस. तू त्या अनंताची पत्नी आहेस. तुलाही अंत नाही. तुझंच रूप असलेल्या मायेत आम्ही गाढ निद्रेत आहोत, आम्हाला भगवंताचे स्मरण नाही, अशा निद्रेतून तुझ्या कंकणांच्या आवाजामुळे आम्हाला जाग येईल. म्हणजेच आमची मायेतून सुटका होईल आणि भगवंत सापडेल.

**कुंकुमांकिते पंकज लोचने ।**

**वेंकटरमणन बिंकद राणि ॥**

कुंकुम तुझ्यावर शोभून दिसत आहे. तू पंकज लोचन आहेस. पंकज म्हणजे कमळ. भगवंताच्या हातातील पद्म, कमळाची उपमा ही मोक्षाशी केलेली आहे. आणि ही आई



"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

महालक्ष्मी जी नित्य त्या भगवान नारायणाच्या सान्निध्यात असते ती पंकज लोचन आहे म्हणजे केवळ तिच्या कृपादृष्टीने, कृपाकटाक्षाने आपल्याला तो मोक्षाचा मार्ग सापडतो, तो भगवंत सापडतो.वेंकट रमणाची पत्नी म्हणजेच भगवान नारायणांची राणी. बिंकद म्हणजे यायला नाटकं, नखरे करणे. त्यामुळे तुला सारखे बोलावावे लागते. तुला सारखे आळवावे लागते. अशी तू आहेस.

**सक्करे तुप्पद कालुवे हारिसि ।**

**शुक्रवारद पूजेय वेळेगे ॥**

शुक्रवारी तुझ्या पुजेच्यावेळी साखर तुप यांनी युक्त पंचामृताची एकप्रकारे नदी वाहत असते. पण दासांनी येथे तुप आणि साखर याचाच प्रामुख्याने उल्लेख केला आहे. येथे तुप आणि साखर प्रतिकात्मक आहे. तुप म्हणजेच विवेक आणि साखर मधुर, शुद्ध, सत्त्व म्हणजेच भक्ती. ही विवेक आणि भक्तीची नदी एकप्रकारे तुझ्या आश्रयी वाहत असते.

**अक्करेयुळ्ळ अळगिरिरंगन ।**

**चोक्क पुरंदर विठ्ठलन राणि ॥**

अळगिरीरंगन म्हणजे श्रीरंगमचे रंगनाथस्वामी! चोक्क पुरंदर विठ्ठलन राणी। "चोक्क" म्हणजे शुद्ध, निष्कलंक, रंगनाथ म्हणजे नारायणच! तो प्रेमाने भरलेला आहे. ज्याच्याकडून आपल्याला प्रेम, प्रेम आणि प्रेम इतकंच मिळेल असा प्रेमानेयुक्त अळगिरीचा रंगनाथ आहे. या पुरंदराला, भगवंताचा विसर पडला असता जिने मायेचा डाग पुसून मला निष्कलंक, शुद्ध केले आणि भगवंताच्या प्रेमाचा अनुभव दिला अशी त्याची राणी महालक्ष्मी मी तुला बोलवत आहे! त्या परब्रह्म नारायणाचे प्रेम आम्हाला लाभावे म्हणूनच आम्ही तुझ्याचरणी राहावं म्हणजे तेथून

वाहणाऱ्या भक्ती, विवेकाचा स्पर्श आम्हाला होईल व भगवंत भेटेल.

**॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥**

# पञ्चकन्या !

डॉ. प्रज्ञा देशपांडे

**अहिल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी तथा ।**

**पञ्चकं ना स्मरेन्नित्यं महापातकनाशनम् ।।**

हा श्लोक अतिशय प्रसिद्ध आहे.

या श्लोकाचे अनेक पाठभेद प्रचलित आहे. "पञ्चकन्याः स्मरेन्नित्यं महापातकनाशनम् ।" असाही श्लोकार्ध प्रसिद्ध आहे. या श्लोकात पाच स्त्रियांची नामे आहेत म्हणून पाचकन्या असा शब्द श्लोकात असावा असा समज होतो. पण संस्कृतमध्ये "कन्या" कोणाला म्हणावे यावर विचार केला आहे. जी दशवर्षिया कुवारी असते ती कन्या.

(कन् दीप्तौ + अघ्न्यादित्वात् यक् इत्युणादौ ४ । १११ । कन्यायाः कनीन् चेति निर्देशात् पाणिनिमतानुसारेण न ङीष् अतष्टाप् ।) कुमारी । इत्यमरः ॥ २ । ६ । ८ । सा तु दशमवर्षीया । इति स्मृतिः ॥ (यथा महाभारते वनपर्ब्बणि । "यस्मात् कामयते सर्व्वान् कमेर्धातोश्च भाविनि ! । तस्मात् कन्येह सुश्रोणि ! स्वतन्त्रा बरवर्णिनि !" ॥)

वरील श्लोकात उल्लेखलेल्या सर्व महिला विवाहिता असून त्या कन्या नक्कीच नाहीत.

श्लोकात "पंचकं" असा शब्द जास्त अर्थवाही आहे. पंचक म्हणजे पाचांचा समुदाय. श्लोकात ज्या पाचांचा उल्लेख आहेत, त्यात विविध कुलातील महिला आहेत.

जसे

**अहल्या:** ही मेनका-भद्राश्व राजा यांची कन्या व ऋषिपत्नी होती.

**द्रौपदी** : याज्ञसेनी ही द्रुपदराजाला यज्ञातून लाभलेली कन्या होती.

**सीता** : ही जनकराजाने सांभाळलेली भूमिकन्या होती.

**तारा** : ही वानरकुलातील होती. मंदोदरी= ही ऋषी काश्यप यांचा पुत्र मयासुर व अप्सरा हेमा यांची कन्या होती.

या श्लोकात जो "ना" शब्द दिसत आहे तो नृ (मानव) या मूळ शब्दाचे प्रथमेचे एकवचन आहे. "पञ्चकं ना स्मरेत् नित्यम्" या वाक्याचा अर्थ असा की, "या पाचांच्या समूहाला मानवाने नेहमी स्मरावे".

मनात एखादी विकृती येणे वा समाजमान्य वागणुकीनुसार चुकीचे वर्तन घडणे , एखाद्या व्यक्तीकडून घडू शकते. ही मानवी प्रकृती आहे. मानवी मन , बुद्धी व वर्तन कधी कधी समीक्षेबाहेर असू शकते. अशा वेळी त्या व्यक्तीला

(१) परत चुकीच्या मार्गावर न ढकलता , किंवा

(२) चुकीचे समर्थन करायला भाग न पाडता, किंवा

(३) चुकीचे गौरवीकरण न करता, किंवा

(४) चुकीमुळे आयुष्यातून न उठवता

सामान्य व्यक्ती म्हणून जगण्यास बळ देणे ; ही खरी संस्कृती .

वरील सर्व स्त्रियांचे उदाहरणं आपल्याला हाच दाखला देतात. वरील महिला मोहाने, अज्ञानाने, अगतिकतेने, सूडभावनेने वा समाजबंधनाने पतित झाल्या. तरीही त्यांच्या स्पष्ट, दंभहीन व निखळ वागणुकीमुळे समाजाला त्या वंदनीय झाल्या.

हा श्लोक केवळ मानवी भावभावनांचे व्यवस्थापन कसे करावे ? यासाठी आहे कां ? नाही. हा श्लोक दुसराही महत्त्वाचा संदेश देतो.

माती हा अत्यंत महत्त्वाचा पण नेहमीच दुर्लक्षित राहिलेला स्त्रोत आहे. या घटकाकडे जगभरातील लोकांचे लक्ष वेधणे तसेच मातीच्या संवर्धनाची असलेली गरज याबाबत जनजागृती करणेसाठी 5 डिसेंबर हा 'जागतिक

मृदा दिन' म्हणून साजरा करण्यात येतो.

हा श्लोक जमिनीचे संवर्धन व व्यवस्थापन नि उत्पादकता कशी

वाढवावी ? या विषयीचाही आहे.

**अहल्या** : म्हणजे ज्या जमिनीवर कधीच "हल" (नांगर) चालवला नाही. म्हणजे जंगलातील , न कसलेली जमीन.

**द्रौपदी** : दुबार पेरणी करण्याजोगी सुपिक जमीन.

**सीता** : पांढरी माती असलेली भूमी.

पांढरी माती काही जुन्या लोकांच्या मतानुसार ही पूर्णपणे नैसर्गिक माती आहे. यात कुठल्याही घटकाच मिश्रण नाही. किंवा कुठलेही घटक एकत्र करून ही माती बनवली गेलेली नाही. ही माती बहुधा राजस्थान, हरीयाणा, पंजाब या भागात आढळते. पूर्वी वाडे, गढी बांधण्यासाठी वापरली जायची .

**तारा** : म्हणजे पानथळ जमीन जिच्यात आकाशातील तारामंडळ प्रतिबिंबित होते.

भूगर्भातील पाण्याचे पुनर्भरण करण्याचे काम या पाणथळ जमीनी करतात. पाणथळ जागी वाढणाऱ्या वनस्पती या प्रदूषित पाणी आणि इतर हानीकारक घटकांना गाळण्याचे काम करून पाणी शुद्धा करतात. अलिकडच्या काळात असेही आढळून आले आहे की पाणथळ प्रदेशात वाढणाऱ्या काही वनस्पतींच्या मुळांपासून थेट वीजनिर्मितीही करता येते. भातखाचरे आणि मत्स्यबीज उत्पादनासाठी बनवलेली तळी हे देखील पाणथळ प्रदेशातच समाविष्ट होत असल्याने त्यातून जगभरातील लोकांना त्यांचे दररोजचे अन्न खायला मिळते.

**मंदोदरी** : नांगर न चालवताही , न कसताही भरपूर उत्पादन देणारी मऊ , भुसभुशीत व सुपिक जमीन.

आरोग्यदायक माती हा आरोग्यदायक अन्न निर्मितीचा पाया आहे. विविध पिके आणि शेती यांचा पाया माती आहे. अन्नधान्याच्या 90 टक्के गरजा मातीद्वारेपूर्ण होतात.

जंगले वाढविण्यासाठी मातीचीच आवश्यकता असते. पृथ्वीचा एक चतुर्थांश भाग विविध जीवांनी व्यापला असून ही जैव विविधता टिकवून ठेवण्यात मातीचा मोलाचा वाटा आहे.

मातीमध्ये पाणी अडविण्याची, साठविण्याची आणि शुद्ध करण्याची क्षमता आहे. माती अमूल्य आहे. अन्न, वस्त्र व निवारा या आपल्या मूलभूत गरजा मातीशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. आधुनिक युगात मातीविना शेती यासारख्या संकल्पना उदयास आल्या असल्या तरी जगातील महाकाय लोकसंख्येचे पोट भरण्याचे सामर्थ्य यामध्ये नाही. या सर्व बाबींचा सूक्ष्म विचार करून सहज व्यवहारात त्याचा उपयोग करून घेण्याची हातोटी हीच आपल्या भारतीय संस्कृतीची महती आहे.

वरील श्लोक म्हणूनच प्रत्येकाने मनन व चिंतन करून आचरणात आणावा , हेच संस्कृतिरक्षण होय.

# रिप व्हॅन विंकल ( झोपी गेलेला जागा झाला)

डॉ. सुरुची डबीर

वॉशिंग्टन इरविंगच्या लघुकथेतील पात्र 'रिप व्हॅन विंकल' जे वीस वर्षे झोपून जागे झाले ते इतके प्रसिद्ध झाले की, न्यूयॉर्क मधील इरव्हिंगटन येथे रिपचा कांस्य पुतळा बसवला गेला. रिचर्ड मास्लोकी यांनी डिझाईन केलेल्या या पुतळ्याचे २००२ साली अनावरण झाले.

'रिप व्हॅन विंकल' ही कथा इरविंगने जर्मन लोककथेतून घेतली आहे. जेव्हा मी ही कथा पहिल्यांदा वाचली तेव्हा पॅकमॅन या कार्टूनची आठवण झाली. लेखकाने ही कथा बिर्मिंगहम इंग्लंड येथील निवासस्थानी लिहिली. ती कथा त्याच्या आळशी साळ्याला बघून त्याला सुचली.

ही कथा आजही लोकप्रिय असण्याचे काय कारण आहे? आजही अमेरिकेन लोकांना ती आपली का वाटते? याचा विचार केला तर लक्षात येईल की, साहित्य आणि परिस्थिती यांचा दुहेरी संबंध असतो. साहित्यावर किंवा साहित्यिकावर तत्कालीन काळाचा प्रभाव पडत असतो. एकीकडे इरविंगवर समकालीन विचारांचा प्रभाव पडत होता, तो डोळसपणे त्याच्याकडे बघत होता तसेच दुसरीकडे त्याच्या साहित्यकृतीचा परिणाम तत्कालीन साहित्यावर आणि इतर लेखकांवर पडत होता.

रिप व्हॅन विंकल च्या लोकप्रियतेचे कारण हे ही आहे की लेखकाने ज्या जगाची निर्मिती केली त्या जगात सहभागी होण्यासाठी वाचकाची मानसिकता फारच महत्वाची आहे. वाचक तेव्हाच सहभागी होऊ शकतात जेव्हा कथेतील जग त्याच्या परिचयाचे आहे.तो कथेत रममाण झाला की

लेखक काय सांगायचा प्रयत्न करतोय याचा अंदाज बांधणे त्याला सोपे जाते. वाचकांनी ही कथा अक्षरशः डोक्यावर घेतली आणि या कथेची अनेकदा पारायणे झालीत. प्रत्येक वाचनात नवा अर्थ समोर येतो,नवे तत्व,प्रतिकात्मकता अधिक आकलनीय होऊन मनात खोलवर रुजते.

रिप व्हॅन विंकल ची कथा थोडक्यात बघू. रिप व्हॅन विंकल हा अतिशय चांगल्या स्वभावाचा गृहस्थ आहे. जो सतत दुसऱ्यांना कुठलीही अपेक्षा न ठेवता मदत करत असतो. त्याची पत्नी डॅम व्हॅन विंकल हिला रिप चा हाच स्वभाव आवडत नसतो. रिपअसे काम करतो की ज्याने काहीच आर्थिक लाभ होत नाही. रिप आपल्या मुलांसोबत पतंग उडवणे,खेळणे,गोष्टी सांगणे यात रमतो. एक दिवस तो कजाग बायकोच्या कटकटीला कंटाळून खानावळीत जातो.तिथे तो एका शाळा मास्तर डेरिकशी नियमित गप्पा मारत असतो. नंतर काही दिवसांनी त्या शाळा मास्तराला जाणवतं की केवळ गप्पा मारून काहीही फायदा होत नाही. डेरिक पुढे जाऊन कबूल करतो की,पैसा न मिळवता काही करणे म्हणजे निव्वळ वेळेचा अपव्यय. म्हणून तो अमेरिकेन कॉंग्रेस चे कार्य करण्याचे ठरवतो. ज्याने उत्पादनावर भर देता येईल. एक दिवस रिप कॅटस्किल पर्वतरांगांवर आपली बंदूक आणि कुत्रा wolf ला घेऊन जातो,तेव्हा एक खुजा माणूस त्याला गुहेत घेऊन जातो. जेथे आणखी खूप सारी खुजी माणसे कसले तरी पेय प्राशन करत असतात. रिप पण तेच पेय प्राशन करतो आणि त्याला खूप झोप येते. जेव्हा त्याला जाग येते तेव्हा त्याला खूपच विचित्र अनुभव येतो. सगळे खुजे गायब झालेले असतात.कुत्रा दिसत नाही,बंदूक जंगून गेलेली असते. त्याची दाढी पायापर्यंत लांब आणि पांढरी शुभ्र झाली असते. तो म्हणजे जणू जमिनीचाच एक भाग झाला होता. तो

गावाकडे परत जातो तेव्हा त्याला कुणीच ओळखत नाही. काही लोक रिप ची जमिनीवर लोळणारी दाढी बघून म्हणतात की, हा कुणीतरी हेर असावा. कारण आता इलेक्शन जवळ आले आहे. लोकशाही तर आली पण गावाची निष्पापता लयाला गेली.

रिप व्हॅन विंकल च्या कथेतून इरविंगने अन्योक्ती साधली आहे. प्रहसनाच्या मार्फत सामाजिक स्थिती दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. या कथेतील ऐतिहासिक पार्श्वभूमी फारच महत्वाची आहे. कथेचा पहिला भाग म्हणजे १६७९ च्या दरम्यानचा आहे. जेव्हा अमेरिकेवर इंग्लंडचा ताबा होता. आणि दुसरा भाग २० वर्षानंतरचा १८८९ सालचा. म्हणजे क्रांतिकारी युद्ध होऊन जॉर्ज वॉशिंग्टन अमेरिकेचे अध्यक्ष होते.

रिप व्हॅन विंकल हा अमेरिकेन क्रांतीच्या संघर्षाचे प्रतीक आहे. वीस वर्षानंतर येणारा रिप हा जुन्या गोष्टींना जोडून नव्या जगात असल्याची भावना निर्माण करण्यास सक्षम आहे. आता अमेरिकन्स रिप सारखे निष्पाप नाहीत.ते आता केवळ पैशाला महत्व देतात. जे काम पैसे मिळवून देईल तेच करायचे हा व्यापारी दृष्टिकोन आता आला आहे. ते रिप सारखे नाहीत जे श्रम केवळ आनंदासाठी करतील फायद्यासाठी नाही.

रिपची कजाग बायको म्हणजे प्रतिकरूपाने इंग्लंडची महाराणी आहे.जिच्या विळख्यात रिप म्हणजे अमेरिकेन वसाहत अडकली आहे. वीस वर्षानंतर जेव्हा त्याला कळतं की,कजाग पत्नी आता मरण पावली तेव्हा तो सुटकेचा श्वास घेतो.अशाप्रकारे प्रतिकात्मकता या कथेला अजरामर करते.वीस वर्षांची प्रदीर्घ झोप नायकाला येण्याचे कारण काय?

लेखकाला यातून काही सुचवायचे आहे का? यावर विचार केल्यास लक्षात येतं की हा प्रदीर्घ

काळ झोपणे म्हणजेच राजकीय घडमोडीमध्ये अजिबात रस न घेता निष्पापत्व टिकवून ठेवणे. या प्रतिकांमधून जो अर्थ ध्वनित होतो तो उत्तम रीतीने प्रकट झाला आहे. अशीच अन्योक्ती कीचकवध (१९०७) या नाटकात खाडिलकरांनी साधली आहे. कीचकवध हे नाटक पौराणिक असले तरी समकालीन कर्झनशाहीच्या संदर्भात आवाज उठवला आहे. आपल्या नाटकातून राजकीय परिस्थितीवर भाष्य करून देशभक्तीची प्रेरणा देण्यास खाडिलकर समर्थ ठरले आहेत.

जसे विंकलच्या कथेत इर्विंगने राजकीय परिस्थितीवर भाष्य करत हुकुमशाही आणि भौतिक वादाला विरोध केला आहे तसेच डॉ.प्रल्हाद नरहर जोशी मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास आणि खाडिलकरांनी आपल्या नाटकातून राजकीय परिस्थितीवर मात करून, देशभक्तीची प्रेरणा समर्थपणे दिली आहे. कर्झनचाही शेवट कीचकासारखाच झाला हे विशेष!

लेखक हा अतिशय विचित्र प्राणी आहे. तो ज्याक्षणी लिहायला सुरवात करतो, ते क्षण त्याचे प्रत्यक्षातले



न्यूयॉर्क मधील इरव्हिंगटन येथील रिपचा कांस्य

असतात पण त्याच्याच लिहिण्यातून तो विभक्त व्हायला सुरवात होते. तो मानसन्माना पलीकडे जातो. तो फक्त वाचला जातो. त्याचे पुनर्वाचन म्हणजे त्याला दिलेली अभिवंदना. त्याच्या उपक्रमाचे नवे नवे अर्थ लावले जातात. मर्ढेकरांच्या शब्दात सांगायचे झाल्यास त्याला शास्त्रकाव्याची कसोटी लावली जाते. अशया प्रकारच्या चिकित्सेतून वाङ्मयीन संस्कृती आणि लेखका विषयी आदर भाव व्यक्त केल्या जातो.

# सुवर्णकाळातील अलौकिक रत्न - सचिन देव बर्मन

अर्चना साने

हिंदी चित्रपट सृष्टीचा सुवर्णकाळ ज्याने डोळसपणे अनुभवला, ऐकला त्याने खऱ्या अर्थाने सिनेसंगीताला जाणून घेतलं असं म्हटलं तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही. कारण एखादा कालखंडच असा असतो की त्या काळात अनेक दिग्गज जन्माला येतात. नियती काहीतरी भव्यदिव्य घडवण्याच्या तयारीत असते. हिंदी चित्रपट सृष्टीत ४० ते ६० हा काळ सर्वार्थाने अशा दिग्गज मंडळींचा होता. पडद्यावरचे कलाकार, निर्माते, दिग्दर्शक, कथा, पटकथा, संवाद लेखक आणि गीतकार, संगीतकार, गायक सगळेच प्रतिभेचं लेणं घेऊन चित्रपट सृष्टीत अवतरले होते. त्यांच्यामुळे चित्रपटसृष्टी झळाळून निघाली आणि आपण रसिक म्हणून समृद्ध झालो.

त्याकाळातल्या शेकडो रत्नांपैकी कोण एकाला निवडणं तसं अवघडच पण एक प्रतिभासंपन्न, रसिकप्रिय आणि प्रयोगशील संगीतकारानं एक मोठा काळ चित्रपटसृष्टीत व्यतीत केला. उत्तमोत्तम संगीत रचना केल्या अशा सचिन देव बर्मन म्हणजेच सचिनदा यांच्या सांगीतिक कारकीर्दीचा घेतलेला हा आढावा. सुन मेरे बंधू रे सारखी भटीयाली बाऊल धुन, बंगाली संगीत, रवींद्र संगीत, शास्त्रीय संगीतावर आधारित गाण्यांपासून ते पाश्चिमात्य बीट्स आणि रिदम पर्यंतची विविधता ज्यांच्या गाण्यात आढळते ते सचिनदा पूर्वेकडचे. खरंतर त्रिपुराच्या राज घराण्यातलेच. अवलिया कोमिला हे ते संस्थान जे आता बांगलादेशात आहे. सचिनदांच्या वडलांना शास्त्रीय संगीताची उत्तम जाणं होती.ते अतिशय उत्कृष्ट सतार वाजवत. राज



"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

घराण्यातले असल्यामुळे राज गायक, वादकांचं गाणं संगीताने छोट्या सचिनवर अभिजात संगीताचा संस्कार झाला. तो अधिक समृध्द झाला, उस्ताद बादल खाँ, भीष्मचंद्र चट्टोपाध्याय यांच्याकडून संगीत शिकतांना. या सोबतच डोंगर दऱ्यांमधलं, निसर्गातलं संगीतसुद्धा त्याला साद घालतंच होतं. या पार्श्वभूमीवर दैवी प्रतिभा लाभलेला कलावंत स्वस्थ बसेल तरंच नवल. " फैली हुई है सपनो की बाँहे, आजा चल दे कही दूर" (हाऊस नंबर ४४) या साहीरच्या शब्दाप्रमाणे आकाशाला कवेत घेण्याचं सांगीतिक सामर्थ्य सचिनदांकडे होतं. कोमिला इथे बी.ए. पर्यंतचं शिक्षण झालं पण मन मात्र संगीतात रमत होतं. हळू हळू बंगाली चित्रपटांसाठी त्यांनी संगीत द्यायला सुरवात केली आणि नंतर मायानगरीत अर्थात मुंबईत ते आले. पहिले दोन चित्रपट विशेष गाजले नाहीत म्हणून पुन्हा कोलकत्याला परतण्याचा विचार सुरु असतांनाच अभिनेता अशोक कुमार (दादा मुनी) यांनी फिल्मस्तानच्या दो भाईच्या संगीताचा आग्रह धरला. मेरा सुंदर सपना बीत गया असे शब्द असलेल्या या गाण्याने सचिनदांच्या स्वप्नांना वाट मोकळी करून दिली आणि सोबतच गीता दत्त या गायिकेचा उदय झाला. " अपने पे भरोसा है तो दाव लगा ले " म्हणत त्यांनी सिनेसंगीतात अशी काही झेप घेतली की ते खऱ्या अर्थाने दादा संगीतकार ठरले. दो भाई हा १९४७ चा सिनेमा तर त्यानंतर अतिशय गाजलेला सिनेमा म्हणजे बाजी. सुनो गजर क्या गाये हे वेगळ्या धाटणीचं आकर्षक कोरस असलेलं गाणं त्यावर गीता बालीची दिल खेचक अदाकारी आणि साहीरचे वास्तववादी शब्द सगळंच जमुन आलं. वर उल्लेख केलेल्या तदबीर से बिगडी हुई तकदीर बना ले अपने पे भरोसा है तो दाव लगा ले या गाण्याची पण एक वेगळीच गंमत आहे.

खरंतर गजल स्वरूपातले साहीरचे हे शब्द पण चित्रपटाच्या मागणी साठी त्याला पाश्चिमात्य ढंगात सचिनदांनी

बांधलं म्हणून साहीर नाराज झाले होते पण संगीतात शब्द हरवले तर नाहीतच उलट ते अधिक उठावदार झाले.

त्यामुळे साहिरची नाराजी काही अंशी दूर झाली हे मात्र नक्की. तर या बाजीपासून सचिनदांनी बाजी मारली ती सिनेसंगीताच्या दुनियेत. या चित्रपटापासून नवकेतनशी सूर जुळले ते खासच. नवकेतनच्या जवळपास १२ चित्रपटांसाठी सचिनदांनी संगीत दिलंय. त्यातून देवानंद हा अजूनच खास, लाडका नायक त्यामुळे त्याच्या इतरही चित्रपटांसाठी ते संगीत देतंच राहिले.

एखाद्या कलाकाराच्या जडणघडणीपासून ते यशाच्या शिखरापर्यंत पोहचण्यात अनेकांचा हातभार कळतनकळत लागत असतो. सचिनदांच्या आयुष्याला आणि कारकिर्दीला नकळत फुलवणाऱ्या काही खास व्यक्तींमध्ये देवानंद यांचं नाव प्रामुख्याने घेतलं जातं. त्यांना गाण्याचं, संगीताचं तर ज्ञान होतंच पण त्यापेक्षाही दादांचा मूड आज कसा आहे आणि आपली भूमिका नेमकी कशी हवी याची उत्तम जाणं त्यांना होती. हा असा एखाद्या कलाकाराचा मूड लक्षात घेऊन जेव्हा वागलं जातं तेव्हा अर्धी लढाई तिथेच जिंकलेली असते. देवानंद यांनी दादांच्या संगीता इतकंच त्यांच्या वागण्यावर, त्यांच्यात दडलेल्या एका निरागस कलाकारावर प्रेम केलं, समजून घेतलं. याचाच परिणाम म्हणून की काय सचिनदा त्यांच्या अगदी शेवटच्या काळातसुद्धा देवानंदच्या चित्रपटाला संगीत द्यायला तयार झाले. तर पुन्हा नवकेतनकडे वळत असतांना विजय आनंद यांच्या दिग्दर्शकीय कौशल्याला खरंच दाद द्यावी लागेल. ५० - ६० च्या दशकात तंत्रज्ञान आजच्या इतकं प्रगत नव्हतं पण अफाट कल्पकता प्रत्यक्षात उतरवण्याची जिद्द त्यांच्यात होती. तेरे घर के सामने या चित्रपटाचं शीर्षक गीत आठवा. नायक नायिकेला प्रेमाची कबुली देतांना त्याच्या समोरचं आव्हान काय आहे आणि ते कसं पूर्ण

करणार आहे याचं आश्वासन देतोय तर नायिका त्याला त्यातले खाच खळगे आठवून देते आहे. इथे नायक देवानंद त्याला नायिका नूतन त्याच्या ग्लासात दिसते आहे. खट्याळपणे त्याला चिडावणारी आणि हा जबाबदारीनं आव्हान स्वीकारणारा आणि हा जबाबदारीनं आव्हान स्वीकारणारा दादांचं माधुर्यपूर्ण संगीत. इथे ठळकपणे जाणवतं ते त्यांचं संवादी संगीत अशी संवादी पद्धतीची गाणी सचिनदांनी चित्रपट संगीतात आणून एक वेगळेपण दाखवून दिलं. 'आखो में क्या जी-रूपहला बादल' , 'हाल कैसा है जनाब का-क्या खयाल है आपका' , 'छोड दो आचल जमाना क्या कहेगा' यासारखी गाणी, गाण्याची लय न बिघडवता किती गोडवा आणतात हे सर्वज्ञ आहेच. 'छोड दो आंचल' चाच किस्सा घ्या....

या गाण्यातला आशाताईंचा जीवघेणा 'आह्' ऐकून रसिक 'आहा' म्हंटल्यावाचून राहत नाहीत. पण हा 'आह्' ध्वनीमुद्रणाच्या वेळी आशाताईंना सचिनदांना हवा तसा जमत नव्हता.काही रिहर्सलनंतर छोटीशी विश्रांती घेण्यासाठी सगळेच पांगले होते. आशाताई विचार करत उभ्या होत्या आणि दादांनी मागून येऊन त्यांना हलकेच टपली मारली. त्याक्षणी दचकून आशाताईंनी 'आह' उच्चारलं आणि तोच ....अगदी तसाच मग गाण्यात हवाय असं दादांनी सांगितलं.गाण्याने काय इतिहास घडवला हे आपण जाणतोच.थोडक्यात काय तर गायक /वादकांकडून नेमकं काय हवं य, ते कसं घ्यायचं त्याची जाणं संगीतकाराकडे असावी लागते. त्याचप्रमाणे कोणत्या गाण्यासाठी कोणता गायक किंवा गायिका निवडायची याचाही दादांच्या मनात ठाम निश्चय असायचा.

एकट्या देवानंदसाठी हेमंत कुमार (ये रात ये चांदनी फिर कहा, है अपना दिल तो आवारा) मो. रफी

(खोया खोया चांद, ऐसे तो ना देखो, देखो रूठा ना करो), किशोर कुमार (अरे यार मेरी तुम भी हो गजब, ओ निगाहे मस्ताना, ये दिल ना होता बेचारा) अशी कितीतरी उदाहरणं देता येतील. गाण्याचे शब्द चित्रपटातलं दृश्य, प्रसंग आणि त्या अनुषंगाने येणारं संगीत या बाबी खूप महत्वाच्या ठरतात. पर्यायाने गायकाची निवडसुद्धा.

जातिवंत कलावंत कोषात राहूच शकत नाही. तो आपल्या अवतीभवतीच्या गोष्टी नोंदवून काही ना काही टिपत असतो. स्वतःला अधिकाधिक घडवत असतो. दादांनी सगळ्याच गोष्टींची सांगड तेवढीच उत्कृष्ट पद्धतीने घातली. नुसत्या स्वररचना करणं आणि चित्रपटात कुठेतरी बसवणं हे त्यांच्या स्वभावातंच बसत नव्हतं. गाईड हा सर्वार्थानं माईल स्टोन ठरलेला सिनेमा आठवला की याची प्रचिती येते. शास्त्रोक्त संगीतावर आधारित 'पिया तो से नैना लागे रे मो से छल किये जाय' या आर्त सुरांनी मनाची घालमेल दाखवणारं 'दिन ढल जाये ' आणि कथेचा गाभा सांगणारं त्यांनी स्वतःच गायलेलं 'वहा कौन है तेरा मुसाफिर जायेगा कहा' ही गाणी कोण विसरू शकेल. गीतकार शैलेन्द्र यांनी अवघ्या ६ -७ मिनटात चित्रपटाची कथा या गाण्यातून दाखवली आहे.

सचिन देव बर्मन यांच्या गाण्यांनी अमरत्व प्राप्त केलं ते या आणि अशाच अनेक कारणांमुळे. गाण्याचं चहूबाजूंनी विचार करणारा दादा माणूस म्हणूनच त्यांना म्हटलं जायचं. हीच गाणी दिग्दर्शकीय पातळीवर सुद्धा उत्कृष्ट हाताळली जाणं यावर त्या गाण्याचं भवितव्य ठरतं. दादांना सुदैवाने काही जबरदस्त दिग्दर्शक लाभले.

बीमल रोय हिंदी चित्रपट सृष्टीतला बाप माणूस..


दिग्दर्शनातले बारकावे आजही शिकावे इतके महत्त्वाचे. नंदिनी, सुजाता, देवदास ही नुसती नावं उच्चारली तरी दर्दी रसिकाला अख्खा चित्रपट त्यातल्या गाण्यांसहित आठवतो. मोरा गोरा अंग लै ले, ओ पंछी प्यारे, जलते है जिसके लिये, काली घटा छाये, जिसे तु कबूल करले या गाण्यांचा टवटवीतपणा, त्यातल्या संगीतासकट पिक्चारायझेशन मुळेही अधिक जाणवतो.

त्याचप्रमाणे गुरुदत्त या मनस्वीपण अतिशय प्रतिभावान दिग्दर्शकाच्या बाबतीतही हेच दिसून येतं. ये रात ये चांदनी, जाने क्या तुने कही, वक्तने किया ही गाणी दादांची अमरत्व प्राप्त झालेली आहेत यात शंका नाही पण त्याचा दृश्यात्मक परिणाम रसिकांच्या मनावरही खूप खोलवर झाला आहे. या सगळ्या गाण्यांमध्ये गीतकारांची भूमिकासुद्धा तोडीस तोड होती हे मान्य करायलाच हवं.

रसिकहो! सुरवातीलाच म्हटल्याप्रमाणे एखादा कालखंड प्रतिभावंतांना घेऊन येतो आणि चिरकाळ स्मरणात रहातो. तसाच हा हिंदी चित्रपटसृष्टीचा सुवर्णकाळ त्याला एकाच रत्नाबद्दल, सचिन देव बर्मन यांच्या बद्दल घेतलेला त्यांच्या सांगीतिक कारकिर्दीबद्दल हा थोडासाच आढावा होता कारण त्यांच्या अफाट कामाबद्दल लिहू तेवढं कमीच असेल. या प्रतिभासंपन्न कलावंतालाशतशः नमन !

**“जहा भी ले जाये राहे, हम संग है”**

**दादांचं संगीत हे असं आहे !!!**



सचिन देव बर्मन

# महाबळेश्वर येथील ‘माल्कम पेठ’

अनुराग वैद्य

महाराष्ट्रामध्ये थंड हवेची ठिकाणे म्हटले की आपल्या डोळ्यासमोर पाहिले नाव येते ते लोणावळा, खंडाळा, माथेरान आणि महाबळेश्वर या ठिकाणांचे. या सर्व ठिकाणांची प्रत्येकाची आपआपली वैशिष्ट्ये आहेत. असेच महाराष्ट्रातील 'महाबळेश्वर' ठिकाण हे फारच प्रसिद्ध आहे ते म्हणजे तेथील 'स्ट्रॉबेरी' या फळाच्या उत्पन्नासाठी. प्राचीन काळापासून 'महाबळेश्वर' याचे उल्लेख आपल्याला मिळतात. इंग्रजांच्या काळात थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध झालेल्या 'महाबळेश्वर' येथे जिथे मुख्य बाजार भरतो त्या जागेला एक वैशिष्ट्यपूर्ण नाव आहे ते म्हणजे 'माल्कम पेठ'. आता हा प्रश्न तर नक्की तुम्हाला पडणार कि याला 'माल्कम पेठ' असे नाव का पडले. चला तर मग जाणून घेऊया या 'माल्कम पेठ' नावाच्या मागे काय आहे.

इ. स. १८१८ साली मराठ्यांची सत्ता संपल्यावर संपूर्ण भारतामध्ये इंग्रजांची सत्ता चालू झाली. जेव्हा इंग्रज हे आपल्या राजसत्तेचे व्यवस्थित पाय रोवत होते तेव्हा इंग्रज भारताच्या विविध ठिकाणी असलेल्या ऐतिहासिक गोष्टींचा मागोवा देखील घेत होते तसेच नोंदी करून करून ठेवत होते. तेव्हा इ.स. १८२४ साली 'जनरल लॉडविक' हा जेव्हा साताऱ्याच्या रेसिडेंट या पोस्टवर होता तेव्हा 'जनरल लॉडविक' याने पहिल्यांदा 'महाबळेश्वर' येथे भेट दिली. 'महाबळेश्वर' येथील हवा फार उत्तम आहे आणि 'महाबळेश्वर' हे स्थळ अत्यंत उत्तम आहे असे 'जनरल लॉडविक' याने पत्र लिहून मुंबई येथील 'गव्हर्नर' याला देखील 'महाबळेश्वर' याठिकाणाबद्दल कळविले.

प्राचीन काळापासून 'महाबळेश्वर' याचे उल्लेख

आपल्याला मिळतात. इंग्रजांच्या काळात थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध झालेल्या 'महाबळेश्वर' येथे जिथे मुख्य बाजार भरतो त्या जागेला एक वैशिष्ट्यपूर्ण नाव आहे ते म्हणजे 'माल्कम पेठ'. आता हा प्रश्न तर नक्की तुम्हाला पडणार कि याला 'माल्कम पेठ' असे नाव का पडले. चला



'महाबळेश्वर' येथील 'सर जॉन माल्कम' यांच्या नावाचा 'माल्कम पॉइंट.

तर मग जाणून घेऊया या 'माल्कम पेठ' नावाच्या मागे काय आहे.

पुढे जेव्हा 'कर्नल ब्रिग्ज' हा जेव्हा सातारा येथील रेसिडेंट झाला तेव्हा त्याने इ.स. १८२६ साली 'महाबळेश्वर' येथे येऊन एक सुंदर बंगला बांधला. तसेच 'कर्नल ब्रिग्ज' याने साताऱ्याचे तत्कालीन 'छत्रपती प्रतापसिंह महाराज' यांच्याकडे पाठपुरावा करून 'सातारा' ते 'महाबळेश्वर' गाडी रस्ता बनवून घेतला. काही काळ गेल्यावर त्याकाळातील मुंबईचे तत्कालीन गव्हर्नर 'सर जॉन माल्कम' हे देखील थंड हवेचे ठिकाण म्हणून 'महाबळेश्वर' येथे थंड हवा खाण्यासाठी आणि मुक्कामासाठी आले. संपूर्ण परिसर पाहिल्यावर 'सर जॉन माल्कम' यांनी सर्वप्रथम इथे आजारी ब्रिटीश सैनिकांसाठी याठिकाणी एक हॉस्पिटल बांधले. यानंतर 'महाबळेश्वर' येथे विविध ब्रिटीश अधिकाऱ्यांनी इथे भेटी दिल्या.

पुढे जेव्हा 'कर्नल रॉबर्टसन' जेव्हा साताऱ्याचा रेसिडेंट झाला तेव्हा त्याने 'महाबळेश्वर' इथे भेट दिल्यावर स्वतःसाठी एक बंगला बांधून घेतला. इ.स. १८२८ साली पुन्हा जेव्हा नोव्हेंबरमध्ये 'सर जॉन माल्कम' हे महाबळेश्वर इथे आले तेव्हा ते येताना आपल्यासोबत एक 'डॉ. विल्यम' नावाच्या डॉक्टरला घेऊन आले आणि त्याच्याकडून 'महाबळेश्वर' येथील हवा कशी आहे याबाबत चिकित्सा करून घेतली. याच्यानंतर 'सर जॉन माल्कम'

यांनी महाबळेश्वर येथे सरकारी बंगले देखील 'सर जॉन माल्कम' याने बांधण्यासाठी जागा निवडल्या आणि तत्कालीन सातारा येथील 'छत्रपती

येथे एक स्वतःचा खाजगी बंगला देखील बांधून घेतला त्याला नाव दिले 'माउंट शारलॉट'

तसेच या बंगल्याचा अजून एक उल्लेख मिळतो तो म्हणजे 'माउंट माल्कम'. याच ब्रिटीश गव्हर्नर 'सर जॉन माल्कम' याच्या सांगण्यानुसार सातारा येथील तत्कालीन 'छत्रपती प्रतापसिंह महाराज' यांनी 'नहर' येथे एक गाव वसविले या गावाला 'सर जॉन माल्कम' याचे नाव दिले आणि गावाचे नाव 'माल्कम पेठ' असे ठेवले. सध्या हेच 'माल्कम पेठ' हे 'महाबळेश्वर' येथील मुख्य बाजारपेठ आहे.

सातारा येथून महाबळेश्वर येथे जाण्यासाठी एक जुना रस्ता होता तो रस्ता



GENERAL JOHN BRIGGS.
(Resident at Satara, A.D. 1823-1826.)

'कर्नल जॉनब्रिग्ज' हा जेव्हा सातारा



SIR JOHN MALCOLM.
(Governor of Bombay, A.D. 1827-1830.)

'सर जॉन माल्कम'

प्रतापसिंह महाराज' यांच्याकडून रडतोंडी घाटाने महाबळेश्वर घाटमाथ्याखाली 'पार' घाटापर्यंत चांगला बांधून घेतला. तसेच 'नहार' म्हणजेच 'माल्कम पेठ' याठिकाणी पाण्याचा तोटा होता म्हणून 'वेण्णा तलाव' देखील बांधून घेतला. पुढे इ. स. १६ मे १८२९ रोजी 'ईस्ट इंडिया कंपनी' आणि 'छत्रपती प्रतापसिंह महाराज' यांच्यामध्ये तह होऊन 'माल्कम पेठ' आणि आजूबाजूची १५ मैल परिघाची जागा 'छत्रपती प्रतापसिंह महाराज'



"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

यांनी 'ईस्ट इंडिया कंपनी' यांना दिली.

याच 'माल्कम पेठे' मध्ये 'सर जॉन माल्कम' यांच्या स्मरणार्थ एक दगडी स्तंभ 'महाबळेश्वर' मधील 'नहार' उर्फ 'माल्कम पेठ' येथे उभारला गेला. मध्यंतरी हा स्तंभ वीज पडल्याने उध्वस्त झाला होता नंतर तत्कालीन नगराध्यक्षा 'श्रीमती इराणी' यांनी हे 'सर जॉन माल्कम' यांचे स्मारक पुन्हा उभारले. या 'सर जॉन माल्कम' याला पर्शियन आणि हिंदी उत्तम येत होती.

अशी ही 'माल्कम पेठ' आपल्याला एक महत्वाचा इतिहास नक्की सांगते. आजही 'सर जॉन माल्कम' यांनी वसवलेले 'माल्कम पेठ' हे गाव 'महाबळेश्वर' येथील अत्यंत महत्वाचे ठिकाण आणि बाजारपेठ म्हणून फार महत्वाचे आहे.

संदर्भग्रंथ:-

१) Maharashtra State Gazetteers Satara District Vol-xix:- Government Printing, Bombay, 1885.

२) Mahabaleshwar:- D. B. Parasnis, Lakshmi Art Printing Works, Bombay, 1916.

३) महाबळेश्वर क्षेत्र आणि सॅनिटोरियम यांचे वर्णन:- दत्तात्रय कमलाकर दीक्षित, ज्ञानप्रकाश छापखाना, १९०२.

कसे जाल:-

पुणे - वाई - पाचगणी - महाबळेश्वर.

**छायाचित्रे © महाराष्ट्राची शोधयात्रा**

# धुरांच्या रेषा

जयश्री ढाणी

जन्मभर तळतळून आठवणींच्या मागे पळत राहिली ती.

**"झुकूझुकू झुकूझुकू अगीनगाडी**

**धुरांच्या रेषा हवेत झाडी**

**पळती झाडे पाहू या**

**मामाच्या गावाला जाऊ या...."**

खरेतर हे गाणे गुणगुणत जो तो मोठा होतो. वर्तमानाशी नाळ जुळवत सुखनैव जगायला लागतो परंतु तिचे तसे झाले नाही. ती कायम त्या गाण्याच्या वर्तुळातच वावरत राहिली. ऊ ssss हू, तळ्यात-मळ्यात देखील नाही. फक्त आत, आठवणींच्या आतच आत. वयात आली, लग्न झाले, मुले झालीत; देहावर वयस्क खुणा झळकू लागल्यात तरी मन, मेंदू, वाचा हरघडी जुन्या मऊसर स्मरणरंजनात रंगलेले.

तिचे दोन मजली किरायाचे घर. तिथे मागच्या अंगणात खेळणाऱ्या ती व तिच्या दोन मैत्रिणी, खजिस्ता आणि सुमती. येता-जाता वाटेत लागणाऱ्या प्रत्येक देवळासमोर नतमस्तक होऊन हात जोडणारे सालस वडील. संध्याकाळी भाजीची पिशवी घेऊन मंडईत जाणारी ठेंगणी आई. जत्रेत फुललेले रस्ते, गावाला बिलगलेली कमळाच्या फुलांची नदी. कसे विसरू शकणार होती ती हे सगळे? विसर पडलाही असता पण त्या तोलामोलाचे कुणी संवेदनशील सहचर लाभलेच नाही. मग अखंड जाळ निर्माण करणाऱ्या वर्तमानात जगायचे कसे? हाच तो एकमेव उपाय, स्मृतींच्या आवर्तनात रमायचा. स्मृतिउत्सव घडवायचा !

खरेतर ज्याच्या त्याच्या स्मृती त्या त्या व्यक्तींशीच निगडित असतात. इतरांना त्याचे सोयरसुतुक नसते. पण तिला कोण सांगणार हे? आणि सांगितल्या नंतरही ऐकण्याची मनस्थिती नसतेच तिची. सारखी आपली टकळी सुरू, " आमच्यावेळी..

आमच्यावेळी..."

"एssss गप्प बैस गं आजी, आता चाललोय ना बघायला तुझे गाव, सारखे काय तेच ते वर्णन करून सांगते आहेस" कारमध्ये मागे टेकता टेकता तिची सोळा वर्षाची नात चिडचिडून ओरडली तेव्हा तिला एकदम बावचळल्यासारखे झाले. गाडी चालवणारा ड्रायव्हरसुद्धा आपल्या या अपमानावर हसला की काय अशी शंका येऊन ती पुढच्या आरशात दिसणारा ड्रायव्हरचा चेहरा हळू निरखू लागली.

सत्तरीची ती, आज पन्नास वर्षांनी तिच्या जन्मगावी मुली नातींसह निघाली होती. "एकदा तिथे जाऊ गं, एकदा तिथे जाऊ गं.." असे उभा जन्म घोकली ती पण संसाराच्या व्यापात तिकडे जायला वेळच मिळाला नाही. तिच्या लग्नानंतर आईवडील एका दुर्घटनेत मृत्युमुखी पडल्याने व सख्खे कुणीच भावंडं नसल्याने माहेर कायमचेच तुटलेले. गावही सुटून गेलेले. तिच्या जीवाची त्या गावी जायला तडफड तडफड व्हायची पण नेणार कोण? विकट हसणारे, छळणारे नातलग, अकारण घुमेपणा घेतलेला नवरा पाहिला की तिला अधिकच कोंडल्यासारखे होई.

आज कित्येक वर्षांनी तिची ती सुप्त इच्छा पूर्ण होऊ पहात होती. तिच्या तिन्ही मुलींनी तिच्या सत्तरीनिमित्त तिला तिच्या गावी न्यायचे ठरविले. आतापर्यंत आईने भूतकाळाची जी वर्णने केली तो काळ तसाच्या तसाच तिथे सापडतो की नाही हे बघायची मुलींनाही उत्सुकता होती.

गावात गाडी शिरली तसे तिने डावीकडच्या बसस्टँडकडे पाहिले. तिथे देवीचे सुंदर मंदिर होते. नवरात्रात छान यात्रा भरायची. एरव्ही सुनसान असलेला हा परिसर तेव्हा गर्दीने नटून जायचा. अबबssss केव्हढा मोठा कळस आणि काय चकचक भव्यदिव्य देवळाची वास्तू उभी होती आता तिथे. त्या जरतारी दर्शनाने ती दडपल्यासारखीच झाली.

"हॅट गं असे नव्हतेच मंदिर, हे दुसरे असावे", पुन्हा तिचा घोषा सुरू झाला. मधली मुलगी तीव्रपणे उद्गारली, "काळ बदलला ना गं.." ती वरमून निमूट बसली खरी पण कोणालाच कसे आपल्या आठवणींशी लागेबांधे नाही हा प्रश्न तिला खात राहिला.

रस्ते, गल्ली, रहदारीत ओळखीच्या खुणा धुंडाळण्यासाठी ती गाडीच्या खिडकीतून अंग बाहेर काढत होती आणि कानाला हेडफोन लावून मोबाईलमध्ये डोळे मिटून तल्लीन असणारी नात तिला अंगाअंगाशी येऊ नको म्हणून दूर लोटत होती. शेवटी ती खेकसलीच नातीवर, "काय ते कानात खुपसून बसते चोविसही तास, गाव बघ ना माझे."

"काय बघायचे? " नातीने दुप्पट वेगाने प्रश्न फेकला. नंतर स्वतःच्या आईकडे वळून म्हणाली, "मम्मा मी आधीच सांगते ते लोणचे पराठे खाणार नाही मी, एखाद्या पिझ्झा शॉपजवळ गाडी थांबव.."

येऊन जाऊन खायच्याच गोष्टी. शहरात एव्हढे खायला मिळते तरी तृप्ती नाही, तिच्या मनात आले.

आला, आला, आला तिच्या घराचा मार्ग आला. देवनगर. ती रोमांचित झाली. हळवी झाली. ज्या परिसरात ती लहानाची मोठी झाली, खेळली, बागडली तो तिच्या जिवापास असणारा भाग, घर तिला आत्ता दिसणार होते. पन्नास वर्षांनी. तिचे डोळे भरून आले. कित्ती विनवायची ती नवऱ्याला, "अहो चला ना एकदा बघून येऊ माझे घर."

"तुझे घर कसले? तुझे वडील आजन्म किरायाच्याच घरात राहिले, आपण तिथे जाऊन उतरायचे कुठे? त्यांचे स्वतःचे असते तर वेगळी गोष्ट." कधी नवरा तिला या शब्दात समजवायचा, कधी तिच्या त्राग्याने कंटाळून ओरडायचा तर कधी तिची भुणभुण टाळायला बाहेर निघून जायचा.

काय चुकायचे तिचे? त्याला सारे भोग देऊन झाल्यावरच उरलेल्या काही

एकदोन क्षणात ती अशी मागणी करायची कारण निकडच होती तिची तशी पण तिच्या अंगावर सगळ्या प्रकारच्या रांगोळ्या काढणाऱ्या तिच्या नवऱ्याला कधीच तिच्या मनाचा हळुवार कप्पा जतन करणे जमले नाही. साहचर्यासाठी त्याची आवश्यकताही वाटली नाही. जोडीदाराच्या निर्मम वागण्याने ती तुटत तुटत गेली. अधिकच एककल्ली झाली. आठवणींच्या कोशात दडून बसली.

तिने सांगितल्या ठिकाणी ड्रायव्हरने बरोबर गाडी उभी केली. ती खाली उतरली आणि आजूबाजूच्या गर्दीतले प्रचंड लोंढे पाहून हरवल्यासारखीच झाली. "नाही गं हा नाही रस्ता तो..." ती पुटपुटत होती. तेव्हढ्यात तिच्या नजरेला "देवनगर, विद्याविहार वसाहत" चा बोर्ड दिसला. याच फलकाच्या मागे घर होते तिचे. कुठे गेले घर? तिथे "स्टेट बँक ऑफ इंडिया" अशी पाटी झळकत होती. मोठ्ठी सहामजली इमारत दिमाखात उभी होती.

"अग आमची गच्ची, तिथून मी खाली या कचराकुंडीत कचरा फेकायचे...., कुठे गेले सर्व?" तिला जोरात विचारावेसे वाटले. जिथे तिचे बालपण तिने गोठून ठेवले होते ते हे घर नाहीच असे ती वारंवार म्हणत होती. पण नाही कसे? कचराकुंडी जुने स्वरूप बदलले तरी होती की तिथे? इतका बदल? का आणि कुणी केला? तिला आसपासच्या लोकांना जाब विचारावासा वाटला. या जागेवर या घरावर तिचा हक्क होता. तिने इथे सुखाचे श्वास घेतले होते. तिला न विचारता त्या घराची विक्रीही झाली होती. संपूर्ण कायापालटही करण्यात आला होता.

ती भांबावल्यासारखी बघू लागली. ओळखीच्या खुणा शोधू लागली. खजिस्ता, सुमती कोणीच कशा दिसत नाहीये. शेजारपाजार, जवळची दुकाने, घरे सगळेच बदलून गेले होते. ती ज्या ओढीने जुन्या क्षणांना उराउरी गच्च धरायला आली होती ते क्षण आधीची कसलीही ओळख दाखवेना. ती पुन्हा,

पुन्हा भिरभिर भिरभिर त्या गगनचुंबी इमारतीकडे बघू लागली.

कुठल्यातरी फटीतून, कोपऱ्यातून एखादी जुनी काळीजतिरिप येते का म्हणून निरखू लागली पण एक ना दोन. जुने काहीच आढळेना. बाजूबाजूच्या रहिवास्यांना विचारले, तेही भलतेच नवीन, बोलले सहृदयतेने तिच्या भावना जाणून, घर

तिचेच असल्याची पुष्टीही झाली परंतु सर्वच ओळखखुणा जणू ती तिथे कधी राहिलीच नसल्यासारखी मिटलेल्या. पुसलेल्या.

ती अचंबित झाली. इतका बदल? गावात, गल्लीत, दुकानांत, घरांत? लोकांच्या चेहऱ्यातही? स्मृतीतही? ती तर खिजगणतीतही नव्हती तिथे कुणाच्या. ती ज्यांना ओळखायची तेही गाव सोडून दूरदूर निघून गेलेले. असे कसे कुणी आपले गाव सोडू शकते? मी सोडले कारण माझा नाईलाज होता, माझे एका अत्यंत कठोर कुटुंबात लग्न झाले होते..तिचे मन प्रश्नोत्तरात हेलकावू लागले. आपली आठवण विसरून गेलेल्या आपल्या घराला, गावाला स्मृतिभ्रंशांच्या आजारातून काढण्याची तिची केविलवाणी धडपड पाहून तिच्यावर चिडचिड करणाऱ्या नातीही स्तब्ध होऊन तिला धरून उभ्या राहिल्या. ज्या घराच्या, गावाच्या आठवणी माखून आईने आपले पूर्ण बाल्य, युवावस्था वश करून ठेवली, आपल्याला वर्तमानकाळातील कुठल्याही नातलगांच्या जवळपास फटकू दिले नाही ते घर दिसतच नाही म्हंटल्यावर तिथे येण्याच्या अर्थशून्य परिणामांनी मुलीही हतबल झाल्यात.

"अगं हेच ते तुझे घर ..." बळ नसल्यासारख्या त्या तिला समजवू लागल्या पण येतांनाचा सर्व उत्साह मावळला होता. नव्हे कधी ना कधी या वास्तूला भेट देऊ म्हणून तगवून ठेवलेला जीव पार उसवून उसवून गेला होता. हाती शून्य आणि डोळ्यात अनेक प्रश्न उमटले होते. या घराच्या आठवणीत ती कधी नणंदाभावजयात रमली नव्हती. सासरचे लोकं

आपल्याला सतत क्षतीच पोहचवतात म्हणून मुलींनाही तिने आठवणींच्या पंखात घट्ट झाकून ठेवले होते. आज संधी मिळताच त्या आठवणींना कवटाळायला ती इथे आली तर या गावाला स्मृतिभ्रंशच झाल्यासारखा दिसत होता.

काय करावे? काय करावे? तिला कळेना. अंधार भरून आला होता. "सकाळी जाऊन संध्याकाळी परत येतो आम्ही" असे नवऱ्याला सांगितले होते. जुने काही सापडल्याशिवाय परत कसे फिरणार? तिथेच रेंगाळणारे मन बळेच गोळा करून ती गाडीत बसली खरी पण नजर या त्या ठिपक्यावरून शोध घेत केविलवाणी उडत होती.

हसूच आले तिला मलूलपणे. लग्न झाल्यापासून स्मृतिरंगात वावरली होती ती. माहेरच्या तलम आठवणींचे स्मरण तिला वास्तवात जगण्याचे बळ द्यायचे. म्हणून तिचा तिनेच केलेला 'स्मृतिउत्सव' हा शब्दप्रयोग! खराच ठरला की मग तो शब्द, तिचे एक मन तीक्ष्णपणे ठासून म्हणाले. उत्सव म्हणजे अत्तरबित्तर लिंपून निव्वळ मिरवणे, समारंभात सजणे, भरजरी वस्त्र परिधान करणे एव्हढेच असते का गं? उत्सवाच्या मागे केव्हढी तयारी, केव्हढी पडझड, केव्हढे कष्ट, केव्हढी तगमग असते.

"स्मृतिउत्सव नाहीच हा, हा आहे स्पष्ट स्मृतिभ्रंश...." ती शून्यात नजर लावून हातवारे करीत बडबडू लागली. स्वतःच स्वतःशी संवाद साधायची तिला ही विचित्र जीवघेणी सवय जडलेली.

"मम्मा, आजीचे सोडियम कमी झाले का?" नात काळजीने स्वतःच्या आईला हळूच बोट रुतवत विचारती झाली. मुलीही तिचा मानसिक धक्का उमगून तिला खोलवर न्याहाळू लागल्यात.

हृदयाला पीळ पाडत गाव मागे मागे सुटत होते.

पळती झाडे झुलत होती.

धुरांच्या रेषा हलत होत्या.....

# गुंतता हृदय हे!

स्वर्णिमा प्रकाश

पौगंडावस्था संपवून अगदीच तारुण्यात पदार्पण केलं होतं तिनी. माझ्याही आयुष्यात सुख, ऐश्वर्य, सगळं सगळं होतं. जणू पायाशी लोटांगणच घातलं होतं त्यांनी! एका प्रथितयश कवीला जे जे मिळावं ते ते सगळं मिळालं होतं मला. आणि तेही तिशीत!

२० काव्यसंग्रह, १५ कादंबऱ्या, ४०-५० सिनेमांच्या पटकथा इत्यादी माझं साहित्य लोकांच्या पसंतीला आलं होतं. नवीन लिखाणही जोडीला सुरूच होतं.

आज ३०-४० वर्षांनी तो सगळा प्रवास अनुभवल्यानंतरही त्याकडे मागे वळून पाहताना आश्चर्य वाटत होतं. आपल्याला करायचं काय होतं, आपण केलं काय..., कॉलेज मध्ये असताना सहज लिहिलेल्या कविता मित्रांना ऐकवल्या काय, त्याचं नंतर पुस्तकात रूपांतर होणं, लोकांना कविता आवडणं..सगळं सगळं अनपेक्षित! खरंतर १०-६ नौकरी करून उदरनिर्वाह करायचा असं मी ठरवलं होतं, पण नशिबात काहीतरी वेगळंच लिहिलं होतं माझ्या!

आपल्या आयुष्यात कधी कुठली घटना कोणतं वळण घेवून येईल काही सांगता येत नाही!

“ओ अण्णा झोपा की आता! ११:३० झालेत रात्रीचे, किती वेळ जगणार अजून?” नंदू एकदम खेकसलाच माझ्यावर! नंदू म्हणजे माझा सोबती आणि घरकाम करणारा गडी. झालं, दिवे बंद झाले, आणि खोलीचं दार ओढून नंदू निघून गेला. मीही मग जरा झोपण्याचा प्रयत्न केला. म्हटलं पडून रहावं, झोप लागेल तेव्हा लागेल. असाच पडून असतांना अचानक मला घुंगरांचा आवाज ऐकू आला. मी ताडकन उठलो, खोलीतील लाईट लावला, पण तिथे कुणीच नव्हते. मी पलंगाशेजारी ठेवलेल्या पेल्यातलं

पाणी प्यायलो  आणि लाईट बंद करून परत पडून राहिलो.

मनात काहीतरी सलत होतं, वेगळीच हुरहूर जाणवत होती. आयुष्यात आपल्या हातून काही गोष्टी चुकतात, काही निसटून जातात,  त्या निसटून गेल्यानंतर आपल्या हातात काहीही राहात नाही, पण तरीही त्या अविरत आपल्या स्मरणात राहतात!

“ती”ही अगदी तशीच आजही माझ्या स्मरणात होती; आहे.

“तू आत्ता जो घुंगरांचा आवाज ऐकलास तो तिच्याच तर घुंगरांचा आवाज नव्हता नं?” अचानक माझ्या मनानं मला प्रश्न विचारला. प्रश्न ऐकून मी जरा थबकलोच! नाही नाही. तिचा कसा, ती इथे कुठे येईल, आणि ते ही इतक्या वर्षांनी! छे! शक्यच नाही! मी मनाची समजूत घातली. पण दुसऱ्याच क्षणी दुसरं मन म्हणालं, “ तिला तिची चूक सुधारायची असेल तर?” “तर काय? आता ते शक्य नाही. आता ती वेळ निघून गेली आहे. त्यावेळी  तरुण होतो,  सुखी संसाराची स्वप्न बघणं तेव्हा योग्य होतं पण आता म्हातारपणी..! काहीतरीच काय!” मी माझ्या मनाला म्हणालो.

अजूनही स्पष्ट आठवतो मला तो दिवस. एकवेळेस मी स्वतःला विसरेन,  पण तिला...तिला विसरणं शक्यच नाही!

त्यावर्षी मी लिहिलेल्या ३ पटकथांना पुरस्कार मिळाला होता, माझाही विशेष सन्मान करण्यात आला होता. यशाच्या आणि सुखाच्या धुंदीत मदांध झालो होतो मी.

पैसा, अडका,  श्रीमंती नुसतीच येत नाही,  जोडीला व्यसन आणि वासना यांचं गूढ वलयही घेवून येते. माझ्याही घरी येतांना हे वलय तिने सोबत आणलं होतं.  मग काय, पुरवायचो सगळ्या हौशी स्वतःच्या!

त्याही दिवशी मी नेहमीप्रमाणे तिथे गेलो.  “ती ”ही नेहेमीप्रमाणे नटून थटून बसली होती.  मी आत

गेलो. मी आत येताच तिने दार लावून घेतलं. आज खूपच सुंदर दिसत होती ती. म्हंटलं आज हिला सगळं खरंखरं सांगून टाकावं. आणि मी हळूच दबकत दबकत तिला म्हणालो, “मम प्रिती आहे तुजवर जडली राणी!”

या वाक्यानंतर काही काळ नुसतीच शांतता...आणि ती अचानक मोठ्याने हसायला लागली!

मी काहीतरी मनातलं बोलतोय आणि ही त्यावर हसते आहे हे काही मला पटलं नाही. मी दाराची कडी काढली आणि निघून गेलो. आणि ठरवले की यानंतर परत कधीही इथे यायचं नाही. तसंही तो परिसर, तिथलं वातावरण मला फार काही पटत नव्हतंच! पण तिच्यासाठी म्हणून मी यायचो, आता ते ही नाही.

“ती ”चं असं अचानक आयुष्यात येणं आणि अचानक नसणं दोन्हीचा खूप परिणाम झाला. हळूहळू ऐश्वर्य संपत गेलं आणि सोबत आणलेलं वलय फक्त राहिलं!

तसं तिचंही काही चुकलं नव्हतंच म्हणा! तिच्या दृष्टीने ते स्वाभाविकच होतं. पण मी गेलो नाही म्हणून तिनेही विचारपूस करू नये हा कुठला नियम? जे माझ्या मनात होतं, जे माझ्या ओठात होतं, ते तिच्याही मनात होतं, तिच्याही डोळ्यात स्पष्ट दिसत होतं. फरक फक्त एवढाच होता की मी बोलून मोकळा झालो, आणि तिने गप्प राहणं पसंत केलं.

सकाळ झाली, दुसरा दिवस उजाडला, सूर्यनारायणाला नमस्कार करून मी सकाळच्या कामांना लागलो. काल रात्री जाणवत असलेली अस्वस्थता जरा लिहून काढावी म्हणून मी बसलो. कुणीतरी बाहेर आल्यासारखं वाटलं, नंदूला विचारणार तितक्यात “तोच” घुंगरांचा आवाज कानी पडला...

आणि क्षणाचाही विलंब न करता अश्रूंनी सगळ्या साठलेल्या भावनांना वाट मोकळी करून दिली...!

# कळावे लोभ असावा...!

भार्गवी बाबरेकर

ती नुसतीच शांत बसली होती. पुस्तक लिहून झालं होतं पण शेवटचं पान मात्र काही केल्या पुर्ण होत नव्हतं. पुस्तकाचा शेवट काय करावा हे सुचतच नव्हतं तिला. असंख्य विचार डोक्यात येत होते. शब्दांना योग्य वाट मिळत नव्हती. तिला लिहायचं तर खूप होतं पण नेमकं काय लिहावं तेच कळत नव्हतं. शेवटी हातातला पेन तिने खाली ठेवला आणि उदास मनाने हातावर हात ठेवून, त्यावर डोकं टेकवून ती डोळे मिटून बसली. विचार करून - करून तिचं डोकं पार थकून गेलं होतं. तिला झोप लागणार तेवढ्यात कुणीतरी येण्याची चाहूल लागली. ती थोडी सावध झाली. हातात कॉफीचे दोन कप घेवून शशांक मागून आला.

" काय गं शुभ्रा काय झालं? अशी का बसली आहेस?"
"काही नाही रे, काहीच सुचत नाहीये. पूर्ण पुस्तक लिहून झालं. फक्त शेवटचं पान उरलंय तिथेच अडली आहे मी!"

" हा हा..! खुद्द शुभ्रा the great writer यांना काय लिहावं हे कळत नाहीये! ऐकून कमालच वाटली बघ मला.."

" शशांक ,एक तर तू हसू नकोस आणि लिहिणं जर इतकंच सोप्पं वाटतं असेल ना तुला , तर लिहून दाखव मला काही तरी..."

"अगं हो हो..किती चिडतेस chill कर जरा. बरं मी नाही करत तुला आता डिस्टर्ब पण जरा महत्त्वाचं सांगायला आलो होतो मी तुला."

" महत्त्वाचं? काय?"

" राणे वकिलांचा फोन आला होता. पुढल्या महिन्याची पंधरा तारीख मिळाली आहे आपल्याला."

"बापरे..म्हणजे लवकरच आपण वेगळे होऊ ना कायद्याने! आईला यातलं काहीच माहीत नाहीये

अजूनही. हे सगळं तिला समजल्यावर कशी react होतेय देव जाणे!"

" काळजी नको करूस , होईल सगळं ठीक. बरं तुला काही मदत करू शकतो का मी?...म्हणजे मान्य आहे की मला काही लिहिता येत नाही पण तरी म्हटलं विचारून बघावं...काही सुचवता आलं तर उत्तमच. "

" हो ना आपण कॉलेजमध्ये होतो तेव्हा कविता लिहत असताना मी कुठे तरी अडले की तू मला नेहमीच काही ना काही सुचवायचास. किती छान होते ना ते दिवस...!"

" हम्मम...नंतर आपण मोठे झालो आणि इगोला कवटाळून बसलो. तो पूर्वीचा भाबडेपणा किती मागे राहिला ना गं ...."

" खरंय रे! पूर्वी आपण भांडलो की आपल्यातला कुणीही एक माफी मागून घ्यायचो. पण नंतर मात्र तूच का? आणि मी का नाही ? याच गुंत्यात आपण अडकून पडलो. आणि आता हे आपल्या स्वभावाचा, आपल्या आयुष्याचा एक भाग झालंय."

शशांक काहीही न बोलता तिथून उठून गेला. शशांकच्या हातची स्ट्रॉंग कॉफी शुभ्राने घेतली. थोडा वेळ तिने विचार केला. काही तरी लिहिलं आणि नंतर निघून गेली...त्यांच्या कोर्टातल्या पेशीच्या आदल्या दिवशी शुभ्राच्या पुस्तकाचं प्रकाशन होतं. त्या प्रकाशनानंतर ती तिच्या आईला सगळं सांगणार असं तिचं ठरलं होतं.

प्रकाशनाचा दिवस आला. शुभ्रा आणि शशांक गाडीत बसले आणि निघाले. शशांक काहीच बोलत नव्हता. शांतच होता.

" काय रे ..काय झालं? आज काहीच बोलत नाहीयेस तू! काही झालंय का?"

"शुभ्रा मी काय म्हणतोय , आपण एकदा विचार करावा असं वाटतंय मला..हा निर्णय आपलं आयुष्य पूर्णपणे बदलणारा ठरणार आहे. तुला काय वाटतं...?"

शुभ्रा काहीच बोलली नाही.

शुभ्रा आणि शशांक प्रकाशनस्थळी पोहोचले. प्रकाशन झालं. पुस्तकाबद्दल



"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

सांगायला शुभ्राने माईक हातात घेतला आणि ती बोलू लागली..

" आपण लिहितो म्हणजे काय? तर व्यक्त होतो.. मला जास्त बोलण्याची सवय नाही पण मी माझ्या लिखाणातून व्यक्त होते. आपण जी प्रत्येक कृती करतो त्या कृती मागे काही तरी प्रेरणा असते. जिच्यामुळे प्रेरित होऊन आपण ठराविक कार्य करत असतो. मग ती प्रेरणा काहीही असू शकते. अगदी एखादी व्यक्ती सुद्धा! मी कॉलेज मध्ये असल्या पासून लिहिते आहे. तेव्हा पासून माझी प्रेरणा सतत माझ्या सोबत होती...आहे. शशांक! ती प्रेरणा तू आहेस...! त्या दिवशी ते शेवटचं पान मी पूर्ण करू शकत नव्हते पण तुझ्यामुळे पुन्हा एकदा मी व्यक्त होऊ शकले. आज तेच पान तुझ्यासाठी इथे मी वाचणार आहे.."

शुभ्रा ते शेवटचं पान वाचू लागली. प्रत्येक ओळ शशांकला अधिकच जाणवू लागली. शेवटच्या ओळीवर येवून शुभ्रा थांबली...

"कळावे लोभ असावा..." अशी ती ओळ होती. वाचन संपवून शुभ्राने शशांक कडे बघितलं. शशांकने शुभ्राला लिहिलेलं पहिलं प्रेमपत्र त्याला आठवलं. त्या प्रेमपत्रात शशांकने शेवटी ' कळावे लोभ असावा...' असं लिहिलं होतं. ते सारं-सारं त्याला आठवलं आणि त्या दोघांनी क्षणार्धात पुन्हा एकदा एकमेकांचा स्वीकार केला आणि खऱ्या अर्थाने त्या दोघांचं शेवटचं पान त्या दिवशी पुर्ण झालं...!

# सहवास

दिशा टिकेकर

माधवराव व सुजाता ताई यांचा सुखाचा असा संसार सुरू होता. गडगंज संपत्ती, घरी नौकर चाकर. श्रीमंती अशी अफाट की सात पिढया काही न करता अगदी आरामात राहतील. पण तरीही माधवराव व सुजाता ताई यांच्या मनात एक खंत नेहमीच घर करून असे. त्यांना एकही अपत्य नव्हते. मूल व्हावे म्हणून सुजाता ताईंनी सगळे प्रयत्न केले. प्रगत विज्ञानापासून तर देवपूजा, उपासतापास पर्यंत सगळं. पण मूल काही पदरी पडत नव्हते. त्यामुळे सगळ्या सुखसोयी असून देखील कुठेतरी जीवनात कमतरता भासत होती. पण देवापुढे कुणाचे काय चालतय.

तो दिवस माधवराव व सुजाता ताई यांच्या आयुष्यातील अतीशय सुखद दिवस ठरला. त्या दिवशी सकाळ पासूनच सुजाता ताईंना बरे वाटतं नव्हते. खाणं ही नकोस झालं होत. माधवरावांना आता काळजी वाटायला लागली. "काय बरे झाले असेल हिला अचानक" सुजाता ताईंनाही काही कळत नव्हते. "सुजाता, चल बरं आपण डॉक्टरांकडे जावू या" माधवराव जरा काळजीनेच सुजाता ताईंना म्हणाले.

दोघेही डॉक्टरांकडे गेले. डॉक्टरांनी सुजाता ताईंना तपासले. व नंतर माधवरावांना म्हणाल्या "साहेब, गोड बातमी आहे ताईंकडे" आधीतर माधवरावांना विश्वासच बसला नाही आणि नंतर त्यांच्या आनंदाचा काही ठावठिकाणाच नव्हता.

ही गोड बातमी घेऊन माधवराव व सुजाता ताई घरी आले. सगळ्यांना ती गोड बातमी सांगितली. देवापुढे साखर ठेवली व डोके टेकवून आशिर्वाद घेतला. दोघांचाही आनंद उफाळून आला होता. या आनंदात ते दोघेही अगदी रमून गेले होते.

"सुजाता, मुलगी झाली तर काय नाव ठेवायचे?" माधवराव अगदी प्रेमाने सुजाता ताईंना विचारतात. सुजाता ताई जरा लाजतच म्हणाल्या, "मुलगी झाली तर तिचे नाव सारा ठेवायचे आणि मुलगा झाला तर सुजय."

बघता बघता सुजाता ताईंचे नऊ महिने पूर्ण झाले. त्यांना दवाखाण्यात नेण्याची वेळ आली. चांगल्या प्रसिद्ध डॉक्टरांच्या निगराणी खाली सुजाता ताई होत्या.

माधवरावांचा जीव काळजीने चलबिचल व्हायला लागला. घरची मंडळी धीर देत होती. तिकडे सुजाता ताई वेदनेने कळवळत होत्या. आणि काहीच क्षणात सुजाता ताईंनी एका गोंडस बाळाला जन्म दिला.

"डॉक्टर, काय झाले?" माधवरावांचा आवाज जरा चिंताजनकच होता. "अभिनंदन! माधवराव तुमच्या घरी कन्यारत्नानी जन्म घेतला आहे." हे ऐकताच माधवरावांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वहायला लागले. "मी सुजाताला भेटू शकतो का?" माधवराव डॉक्टरांना म्हणाले "हो, भेटा तुम्ही ताईंना."

दोघेही आपल्या छोट्या बाळाला जवळ घेत प्रेमाच्या गप्पांमध्ये रंगून गेले. बाळाचं धुमधडाक्यात बारसं झालं. सारा नाव ठेवण्यात येत. तिचं संगोपन अगदी लाडात होत होतं. तिचा प्रत्येक शब्द सगळे अलगदपणे झेलायचे.

बघता बघता सारा आता मोठी झाली. अती लाडावलेली मुलगी म्हणून तिची ओळख व्हायला लागली. उद्धटपणे बोलणे, मोठ्यांचा आदर न करणे, आई-वडीलांचा मान न ठेवणे. या वळणावर सारा जात होती.

माधवराव व सुजाता ताई यांना आता खूप काळजी वाटायला लागली. आपल्या अती लाडामुळे सारा अशी वागते. ही चूक त्या दोघांना कळत होती. पण आता काहीच पर्याय नव्हता.

त्या रात्री दोन वाजेपर्यंत माधवरावांच्या फार्महाऊसवर पार्टी करून सारा आपल्या लाल रंगाच्या



"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

कारने स्वत:च्याच धुंदीत गाडी चालवत होती. सारा शुद्धीत नसल्याने तिचा पूर्णपणे कार वरील ताबा सुटला आणि एका घराच्या भिंतीला तिची गाडी आदळली.

इकडे माधवराव आणि सुजाता ताई काळजी करू लागले. साराचा फोनही लागत नव्हता. बघता बघता सकाळ झाली. दिपीका सकाळची शुद्ध हवा घेण्यासाठी अंगणात आली. “ही लाल गाडी कुणाची" ती गाडी जवळ गेली. तर तिला सारा गाडीत दिसली. ती बेशुद्ध अवस्थेत होती. दिपीकानी लगेच आईला हाक मारली. आणि साराला आत नेले. “कोण बरं ही" असे आईने दिपीकाला विचारले. “मला पण नाही माहीत गं आई.” दिपीकानी साराचा फोन चेक केला. तर तिला सुजाता ताईंचा नंबर “मम्मा” या नावानी सेव केलेला दिसला.

दिपीकानी लगेच त्या नंबर वर फोन केला व सुजाता ताईंना सगळे सांगितले.

इकडे सारा पण आता शुद्धीवर आली होती. “मी कुठे आहे? आणि आपण कोण?” असा प्रश्न साराने विचारला. दिपीकाच्या आईने सगळे काही साराला सांगितले. साराला थोडी इजा झाल्याने तिला बेडवरून उठताही येत नव्हते. दिपीका पूर्णपणे तिची काळजी घेत होती. तिला हवं नको ते सगळं बघत होती. सारा दिपीकाला नुसती एकटक बघत राहायची.

माधवराव व सुजाता ताई दोघेही दिपीकाकडे आले. आपली मुलगी सुखरूप आहे हे बघून दोघांनाही खूप आनंद झाला. दिपीका आणि आई यांचे आभार मानून साराला घेऊन दोघेही घराकडे निघाले.

इकडे घरी आल्यावर साराला चुकल्या चुकल्या सारखे वाटायला लागले. काहीतरी मिसिंग आहे असे वाटायचे. सारा आता खूप शांत झाली होती. सगळ्यांशी ती नीट बोलायला आणि वागायला लागली. पण कुठेतरी अपूर्ण वाटतं होते तिला.

“सारा कशी आहेस तू?” असा आवाज साराच्या कानावर आला. सारा बघते तर काय पुढे दिपीका उभी होती. तिला बघून साराला खूप आनंद झाला. साराने लगेच दिपीकाला घट्ट अशी मिठी मारली.  काय मिसिंग होतं ते आता साराला कळलं होतं.

काहीच वेळेचा सहवास पण साराला खूप काही शिकवून गेला होता. ती आज पूर्णपणे बदलली होती.

# अधुरी एक कहाणी

अपूर्वा भालेराव

अनुजा... ए अनुजा... अगं उठ... शाळेची वेळ झाली... आज कसा गं इतका उशिरा पर्यंत झोपली आहेस...? उठा चला..." आई अनुजाला झोपेतून उठवत म्हणाली.

"आई... बरं झालं उठवलंस. अगं काल रात्री उशीरापर्यंत टेस्टची उजळणीकरत बसले. उशीर झाला गं झोपायला. आवरून आलेच मी." अनुजा खडबडून जागी होत आईला उतरली.

"हो ये. ब्रेकफास्ट तयार आहे. तो खाऊन घे. मी सोडून देते तुला शाळेत." आई अनुजाच्या रूम मधून बाहेर जाताना बोलत गेली.

अनुजा... एक शालीन आणि अभ्यासात अतिशय हुशार असलेली गुणी मुलगी.

एका उच्चभ्रू घराण्यात अनुजाचा जन्म झाला. तिच्या आई बाबांना लग्नानंतर तब्बल सात वर्षांनी झालेली अनुजा इतकी श्रीमंती असताना देखील, स्वतःचं काहीतरी अस्तित्व असावं, या संस्कारांनी तिची देखभाल होत ती त्या घरात वाढत होती.

अगदी लहानपणापासूनच निरागस, शालीन, समंजस असलेली आणि मोठं होऊन नाव कमवायचं ही धडपड करणारी अनुजा, सगळ्यांना पसंत पडत असे.

'श्रीमंत गरीब भेदभाव' या गोष्टीपासून ती वंचित होती.

ती आणि तिचे मित्र मैत्रिण यांचा शाळा संपल्यावर रोज अंगणात गोतावळा जमायचा.

अनुजा खेळताना देखील कुणाशी भांडत नसे. अनुजा चा हा स्वभाव 'स्वानंद' ला फार आवडायचा.

स्वानंद, एक साधारण मुलगा.

मध्यम वर्गीय घराण्यात जन्माला आलेला स्वानंद, तसा अनुजापेक्षा

चार वर्षांनी वयाने लहान होता.

भारतीय परंपरा, त्या परंपरेचं जतन करणे, भारतीय संस्कृती, या सगळ्यांची अनुजा मध्ये संस्काररुपी ओढ होती. आणि यातच शिक्षण करावं अशी मनिषा अनुजाची होती.

दिवस सरले, महिने ओसरले.

तसतसे लहानपणीचे मित्र हळूहळू मोठे आणि वाढत्या अभ्यासाच्या व्यापामुळे दुरावत गेले.

स्वानंद ला अनुजाचा स्वभाव खूप आवडायचा. अर्थात अनुजा स्वानंद ला लहानपणापासून आवडायची.

तिचा आदर करायचा नेहमी.

अनुजा दहावीत असल्याने त्या अभ्यासामुळे बाहेर खेळायला फार कमी पडत असे.

भविष्य उन्मुख असल्यामुळे अनुजा ला दहावीत 96% मिळाले.

अतिशय आनंदी झालेल्या अनुजाने, पुढील शिक्षणासाठी भारतात राहून, भारतीय लोकांची सेवा करावी या उद्देशाने मुंबईत एका उच्च विद्यापीठात 'कला' या क्षेत्रात प्रवेश घेतला.

भविष्यात एक उत्तम शिक्षिका होऊन, तरुण पिढीला घडवावं, त्यांना भारतीय संस्कृतीचा आदर शिकवावा, या हेतूने अनुजा च्या पुढील शिक्षणाचा आलेख कायम उंचावत गेला.

इकडे स्वानंद ने, अनुजा च्या स्वप्नांचा आदर करीत, आपणही आयुष्यात काहीतरी उपयुक्त करावं, या जिद्दीने ऑर्डिनरी मुलापासून extra ऑर्डिनरी मुलांपर्यंत चा प्रवास गाठला आणि स्वानंद ला देखील दहावीत 88% टक्के प्राप्त झाले.

मुंबईत अनुजा छान रुळली होती आणि आता जबाबदार नागरिक झाली होती. उच्च शिक्षण आणि सोबत चालू असलेल्या आवडत्या क्षेत्रात मिळालेल्या नोकरी मुळे गेल्या सहा वर्षांपासून ती गावी परतली नव्हती.

तिचे आई वडील तिच्या भेटीला मुंबईला येत जात असत.

स्वानंदने दहावीत चांगली कामगिरी करत, आपण सुद्धा मुंबईत पुढले शिक्षण घ्यावे या उद्देशाने, एकामहाविद्यालयात प्रवेश घेतला.

पुढील शिक्षण सुरू असताना एक दिवस स्वानंद च्या वर्ग शिक्षिका स्वास्थ्य प्रकृती बिघडल्याने वर्गावर हजर राहू शकल्या नाही.

आणि त्यांचा वर्ग engage करायला, एक सुंदर आणि चेहऱ्यावरून शांत असलेल्या मॅडम ने त्या वर्गात प्रवेश केला.

स्वानंद बघतो न बघतो, त्याला समोर शिक्षिकेच्या जागी, त्याची बाल मैत्रीण  अनुजा दिसली! स्वानंद ला ते बघून आश्चर्याचा पण आनंदी झटकाच लागला.

अख्खा तास, तो अनुजा कडे चोरून बघत राहिला.

सहा वर्षांनी दिसली ती आणि आपल्याला विसरली तर नसेल ना, या शंकेने त्याने ओळख काढायची दूर च ठेवली.

तास संपला आणि शंकेचं निरसन करण्यास अनुजा च्या मागे धावत निघालेल्या संदीप ने स्वानंद ला मुद्दाम हाक मारली.

मन मारून वर्गात परत आला स्वानंद आणि हे बघून संदीप जोर जोरात हसायला लागला आणि म्हणाला "स्वानंद, या कॉलेज च्या मुली, माझ्या मागे कशा लागतात माहितीये ना तुला...! मी इथल्या ट्रस्टी चा मुलगा आहे. माझ्याकडे काय नाहिये... बघ तू, कसं या सुंदरीला मी माझ्या प्रेमाच्या जाळ्यात ओढतो ते...!

मी कधीचा बघतोय, तू हिच्याकडे चोरून बघत होतास.

स्वप्नात वावरू नकोस. माझीच होणार ती " असं बोलत संदीप पैशांच्या ऐटीत वर्गाच्या बाहेर निघून गेला. संदीपचा हेतू एव्हाना स्वानंद च्या लक्षात आला होता.

कॉलेज च्या जेमतेम द्वितीय वर्षाला असलेल्या संदीप चा हेतू प्रत्येक मुलीसाठी असाच असे आणि हे

स्वानंद ला अजिबात आवडत नसे.

कॉलेज सुटलं आणि स्वानंद अतिशय आनंदी झाला. अखेर अनुजा आज स्वानंद समोर आलीच.

कधी एकदा अनुजाशी बोलतो आणि मी तुझा बालपणीचा मित्र स्वानंद, असे सांगतो. दुसऱ्या दिवशीही वर्ग शिक्षिका गैरहजर असल्यामुळे अनुजा वर्ग गुंतवला.

स्वानंद एकटक अनुजाकडे भान हरपुन बघत बसला. अनुजा चे लक्ष स्वानंद कडे गेले  आणि अनुजा ने तिच्या भुवया उंचावत इशाऱ्यानी "काय?" असा प्रश्न केला.

भानावर येत स्वानंद ने स्मित हास्य देत, त्याची मान सरळ खाली घातली.

काही दिवस असे सरत गेले.  sआणि स्वानंद अनुजाच्या शांत स्वभावाच्या, तिच्या सुरेख रुपाच्या, तिच्या आत्म विश्वासाच्या प्रेमात आकंठ बुडालेला होता.

संदीप अनुजाला कसं प्रपोज करायचं या गोष्टींमागे लागला होता आणि संदीपचा अनुजा प्रति असलेला हेतू तिला कधी जाऊन सांगतो, ह्याचा विचार करत होता.

अनुजावर असलेलं प्रचंड प्रेम आणि तिच्याबद्दल वाटत असलेली काळजी त्याला शांत बसू देत नव्हती. तिच्या डोळ्यात कधीच पाणी येऊ देणार नाही, असा प्रणच जणूकाही त्याच्या मनात होता.

संदीपने, गुलाबाची फुलं घेऊन अख्ख्या कॉलेज समोर अनुजाला प्रपोज करून मी तिला सगळ्यांसमोर आपल्या गाडीत बसवून दूर घेऊन जाईल, असा प्लॅन स्वानंदला सांगितला.

हा सगळा प्रकार बघून अनुजाला संदीपच्या हेतूचा इशारा द्यावा असा विचार करत त्याने शिक्षकांच्या खोलीत जाऊन अनुजाला हा सर्व प्रकार सांगितला आणि आज वर्गात येऊ नकोस असं सावध ही केलं. स्वानंद वर का विश्वास ठेवावा असा विचार करत असताना संदीप गुलाबाची फुलं घेऊन बाहेर ग्राउंड मध्ये उभा आहे, असे तिला

दिसले आणि हे ऐकून ती सावध झाली.

तिला हा प्रकार माहित नसता, तर सर्व कॉलेज समोर बदनामी झाली असती, ह्या विचाराने सुन्न झालेल्या अनुजा ला स्वानंदने दाखवलेल्या काळजीचं कौतुक आणि आदर वाटत होता. स्वानंद प्रति आभार व्यक्त करावे असे तिला वाटले आणि इथून स्वानंद आणि अनुजाचे, छान संबंध निर्माण झाले आणि त्यातच स्वानंदने त्यांची जुनी ओळख आहे, याची नव्याने ओळख करून दिली.

स्वानंद लहानपणी अतिशय ऑर्डिनरी मुलगा होता पण अनुजासाठी त्याने जिद्दीने अभ्यास करून चांगल करियर घडवावं, या साठीचा खटाटोप अनुजाच्या लक्षात हळूहळू यायला लागला होता.

अनुजाने कॉलेज मध्ये घडलेल्या प्रकाराबद्दल तिच्या आई वडिलांना सांगितले होते आणि त्यांनाही स्वानंदचा अभिमान वाटत होता. स्वानंद अनुजा च्या स्वप्नांना खंबीर पणे समर्थन द्यायचा.

तिने घडावं, तिचं नाव कमवावं, तिच्या पालकांनाच नाही तर जगाला तिचा खूप अभिमान वाटावा अशी कामगिरी करावी, अशी आणि यांसारख्या गोष्टींचा स्वानंद आदर करत असे. आपण घडतोय याचा कित्ती आनंद घरच्यांना आणि स्वानंदला होतोय या सुखद भावनेने अनुजासुद्धा तन्मय होऊन जाई.

काही वर्ष सरली आणि पदव्युत्तर शिक्षण सुरू असताना स्वानंदला त्याच्याही स्वप्नांची स्वप्नपूर्ती होईल, अशी नोकरी मिळाली आणि स्वतःच्या पायांवर उभं राहून एक दिवस अनुजा ला लग्नाची मागणी घालू, या विचारांनी तो भविष्य रंगवायला लागला.

असंच एकदा कॉलेज ची सहल काढण्याचे ठरले. काही विद्यार्थी आणि शिक्षक वर्ग, सहलीला जाण्यास उत्सुक होते.

संदीपसुद्धा त्या सहलीत येणार होता. संदीप ची वाईट नजर आपल्यावर आहे या गोष्टीची खबरदारी घेत अनुजा संदीप जिथे जाईल तिथे

जाण्याचे टाळत राहिली. त्याच्याकडे दुर्लक्ष करायला लागली.

संदीपला लक्षात आलं की अनुजा त्याच्याकडे दुर्लक्ष करतेय, हे बघून त्याने मनात एक योजना आखली.वाटेत सगळे मजा मस्ती करत होते. निसर्गाचा आनंद घेत ठिकाण आलं, आणि बस थांबली.

संदीपने अनुजा ची बॅग लपविली. बस रिकामी झाली आणि समोर जाऊन अनुजा च्या लक्षात आले की तिने बॅग घेतली नव्हती. ती बस कडे परत जायला निघाली आणि बॅग शोधली पण ती मिळत नव्हती. आपली बॅग हरवली आहे हे ती सांगायला जाणार तितक्यात संदीप बसच्या दारात आला आणि तिची छेड काढू लागला.

इकडे स्वानंद अनुजा दिसत नाहिये म्हणुन तिचा शोध घेऊ लागला आणि तसाच तो बसकडे धावत आला. स्वानंदने तो प्रकार बघितला आणि धावत जाऊन संदीपला मारलं.

अनुजा आतून खूप घाबरली होती. जर वेळेवर स्वानंद तिथे पोचला नसता, तर काय झालं असतं या विचारांनी अनुजा ने स्वानंद ला घट्ट मिठी मारली.

स्वानंद ने संदीपला बजावत सावध केले आणि पुढे जर का असा प्रकार करायच मनात जरी आणलास तर जीव घेईन मी तुझा., अशी धमकी देऊन त्याला तिच्यापासून दूर राहण्यास सांगितले.

बस पासून लांब ते सहलीत मिसळले. आता अनुजा च्या मनात स्वानंद प्रति प्रेम आणि विश्वास निर्माण झाला होता. अनुजा आता कौतुकाने स्वानंदकडे एकटक बघत होती आणि हे लक्षात येताच, स्वानंद ने इशाऱ्याने "काय?" असा प्रश्न अनुजाला केला. अनुजाने स्मित हास्य देत मान खाली घातली.

सहल आटोपून सगळे आपल्या घरी परतले. अनुजा एव्हाना स्वानंद चा विचार करू लागली होती. आज सहलीत झालेला प्रकार आठवून तिच्या अंगावर शहारे आले आणि

स्वानंद नसता तर काय झाले असते या विचाराने तिचा थरकाप उडाला.

तिने स्वानंद ला मारलेली मिठी आठवली आणि 'आपण प्रेमात पडलोय की काय?' असा प्रश्न तिच्या मनाने तिला केला. आणि तिला कधी झोप लागली हे कळल देखील नाही.

दुसऱ्या दिवशी कॉलेज मध्ये स्वानंद आणि अनुजा अमोरासमोर आले असताना, तिचे डोळे मात्र स्वानंद प्रति असलेल्या प्रेमाची ग्वाही देत होते. स्वानंद ला ती नजर खूप स्पष्ट दिसत होती. आणि मग त्यांच्या मैत्रीचे हळूहळू प्रेमात रूपांतर झाले. ते कॉलेज आणि नोकरी सांभाळून एकमेकांना वेळ देऊ लागले. बालपणीचे मित्र काही वर्षांनी एकमेकांच्या अतूट नात्यात गुंतले होते. दोघांनाही हे प्रेम हवेहवेसे वाटत होते.

स्वानंदने पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आणि आता अनुजाला लग्नासाठी विचारणा करण्याची वेळ आली होती. सगळे गोडीगुलाबीने सुरू असताना एका romantic ride वर जाऊन आपण अनुजा ला लग्नाची मागणी घालावी, अशी कल्पना स्वानंद च्या मनात आली.

दोघेही long drive ला बाइक वर गेले. धुंद एकांत, जुळलेली मने, सगळं कसं परफेक्ट होतं. इच्छिलेल्या ठिकाणी जाऊन आपल्या मनातील भावना स्वानंदने अनुजा समोर ठेवल्या आणि अनुजाने हसत त्या भावनांना दुजोरा दिला. अनुजाने स्वानंद ला घट्ट मिठी मारली.

दोघांचही एकमेकांवर जिवापाड प्रेम होतं.

परततांना मागे बसलेल्या अनुजा चा हात धरून, स्वानंद म्हणाला "मी तुझं आयुष्य खूप सुखी करेन, याची शप्पथ देतो. तू माझ्या सोबत कायम राहो, खूप सुखाचा संसार करू आपण…" हे बोलत असताना अनुजाने "होय रे. मला माहितीये तुझं माझ्यावर कित्ती प्रेम आहे ते " असं म्हणत तिने हळूच मान स्वानंद च्या पाठीवर टेकवली.

थोड्या दूरवर जात नाही तर एका भरधाव कार ने जोरात स्वानंद च्या बाइक ला मागून येऊन टक्कर दिली. यात अनुजा रस्त्याच्या कडेला फेकल्या गेली आणि स्वानंद फरफटत समोर पडला. क्षणार्धात तिथे गर्दी जमली आणि ambulance बोलावण्यात आली. स्वानंद शुद्धीवर आला आणि त्याने लगेच अनुजा चा शोध घेतला. स्वानंद ला अनुजा रक्ताच्या थारोळ्यात दिसली आणि तो हादरून गेला. दोघांनाही अँबुलन्सने दवाखान्यात दाखल केलं आणि योग्य ते उपचार सुरू झाले. स्वानंद शुद्धीत होता पण अनुजा अजूनही शुद्धीत यायची होती. दोघांच्याही पालकांना फोन करून ताबडतोब दवाखान्यात यायला सांगितलं. अनुजाच्या आईने तिची स्थिती बघून टाहो फोडला. घडलेला प्रकार सगळ्यांसाठीच धक्कादायक आणि अकल्पनीय होता. स्वानंदने हात जोडून अनुजा च्या आई वडिलांची माफी मागितली आणि म्हणाला की ती बरी होईपर्यंत मी हरणार नाही. अनुजाने स्वानंद बद्दल घरी सर्व सांगितलं होतं, हे स्वानंदला तिच्या आई वडिलांशी भेटून कळून गेलं.

आता फक्त वाट बघणे सुरू होतं ते अनुजाचं शुद्धीत येणे.

तब्बल तीन दिवसांनी अनुजा शुद्धीवर आली आणि "मी कुठे आहे? या प्रश्नाने सगळ्यांना तिने अनुत्तरीतच ठेवले.

तिची तपासणी केल्यावर डॉक्टर म्हणाले की अनुजाला विस्मरण झाले आहे. तिच्या डोक्याला जबर मार लागल्यामुळे तिला काही आठवत नाहिये.

हे ऐकून स्वानंद कोपऱ्यात जाऊन ओक्साबोक्शी रडायला लागला, खूप प्रेम होते त्याचे अनुजा वर.

अथक प्रयत्न करून अनुजाने तिच्या पालकांना ओळखले पण स्वानंद तिचा विद्यार्थी होता हेच तिच्या लक्षात राहिले. स्वानंदने सगळी कहाणी अनुजाला सांगितली पण अनुजाला पुढे घडलेल्या गोष्टी आठवत नव्हत्या. काही वर्षांच्या गोष्टी

तिच्या डोक्यातून निघून गेल्या होत्या.

स्वानंद हार मानत नव्हता. तो रोज तिला घडलेला प्रकार सांगायचा. स्वानंद अथक प्रयत्न करत होता. अनुजा ला थोडक्यात जरी काही आठवले, तरी त्यात धन्यता मानेन, या विचारांनी तो त्याचा प्रवास करून तिच्यापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करायचा.

"अनुजा, तू दहावीत असताना तुला 96% मिळाले होते आणि तेव्हा मी सहावीत होतो. तुझ्यासारखं अभ्यास करून मी ही मोठ्ठं व्हावं, हे स्वप्न डोळ्यात साठवून मी सुद्धा माझ्यातला ऑर्डिनरी मुलगा काढून टाकला आणि खूप अभ्यास केला. आठव गं आपण घालवलेला वेळ "

अगदी सुरूवातीचा काळ ते 'माझ्याशी लग्न करशील का?' इथवर. तिला जिंकून, तिच्यावर प्रेम करून तिला मिळवता आले तर...? हे स्वप्न त्याने परत पाहायला सुरुवात केली पण सरत्या दिवसाला हातात काहीच लागत नसे.

वर्ष निघून गेली...

आणि आता अनुजाचं लग्न लाऊन देऊन तिच पुढील आयुष्य समाधानात जावं, असा विचार करून तिच्या वडिलांनी अनुजा साठी मुलं पाहण्यास सुरुवात केली.

इकडे स्वानंद च्या पालकांनी हार मानत त्याच्यासाठी मुली पाहण्यास सुरुवात केली.

आणि कमालीचे प्रयत्न करून स्वानंद थकला होता पण हरला नव्हता. आई वडिलांच्या इच्छेला मान देऊन त्याने त्याच्यासाठी बघितलेल्या मुलीला अखेर होकार दिला.

आणि अनुजाने सुद्धा एक मुलगा आई वडिलांच्या पसंतीने पसंत केला.

स्वानंदचं लग्न 'आरती' सोबत ठरलं

आणि अनुजाचं 'मल्हार' सोबत.

स्वानंदने त्याची कहाणी आरतीला आधीच सांगून टाकली. आरतीला वाईट वाटले पण तिने ठरवले की स्वानंदला आनंदी ठेवायचं. त्याला खूप प्रेम द्यायचं.

स्वानंदला चांगल्या नोकरीची ऑफर आली आणि पुढील दोन वर्ष त्याला परदेशात जावे लागणार होते म्हणुन , लग्न लवकर करून घेऊ असे घरी मोठ्यांनी ठरवले.

स्वानंदला अनुजाला लग्नात बोलावण्याची ईच्छा होती. कारण दोन वर्षांनी जेव्हा तो परत येईल तेव्हा त्यांची भेट होईल की नाही, या विचाराने ,लग्नाची पत्रिका घेऊन तो अनुजा लाख आमंत्रण देण्यास तिच्या घरी आला आणि म्हणाला "अनुजा मॅडम, तुम्ही माझ्या लग्नात याव अशी ईच्छा आहे."

होकारार्थी मानेने अनुजाने, पत्रिकेवरून हात फिरवला.

आरतीने स्वानंदबद्दल सगळे माहीत असूनही त्याला जिंकण्याची कसर सोडली नव्हती. इकडे स्वानंद अनुजाला काही आठवेल या आशेने शेवटी हरून गेला.

आरती आणि स्वानंद एकमेकांसोबत खुश होते. स्वानंद च्या लग्नाला अनुजा आणि मल्हार दोघेही निघाले.

मल्हारला अनुजाच्या आई वडिलांनी घडलेला सगळा प्रकार सांगितला होता. त्यामुळे मल्हार विशेष काळजी घ्यायचा.

मुहूर्तावर अनुजा आणि मल्हार दोघेही आत आले.

"स्वानंद आणि आरती, किती खुश दिसतात आहेत ना?"

असा खुळा प्रश्न तिने मल्हारला केला. मल्हारने अनुजाच्या प्रश्नाचा होकार दिला आणि दोघेही त्यांच अभिनंदन करायला स्टेज वर चढले.

अनुजाने नव दाम्पत्याला शुभेच्छा दिल्या आणि तिथून ती परत येऊ लागली. अनुजाच्या डोळ्यात अश्रूंचा अथांग सागर जमा झाला होता... मल्हारला हे दिसताच त्याने अनुजाचा हात धरला आणि तिला म्हणाला अनुजा, अजूनही वेळ गेलेली नाही, लगेच जाऊन सांग स्वानंदला तुला



"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

पण अनुजाने परत वळून बघितल नाही आणि स्वानंदला आनंदी बघून ती तिथून निघून गेली.... अगदी कायमची...!!!

# लग्न जुळतांना...

तृष्णा आंबेकर

शिलेदार वाड्यात बरेच दिवसांनी सगळ्यांची पार्टी होती, वाड्यातल्या शरयू आणि अवनिश या दोघांचंही लग्न जमलं तेव्हा त्याचा आनंद साजरा करण्याचं एक निमित्त.. तसंही वाड्यात असे गेट-टूगेदर होणं यासाठी काही कारणांची कधी गरजच पडली नाही, कधी वाड्यातल्या तरुण मंडळींची पिझ्झा पार्टी असायची तर कधी मोठ्यांची झुनका-भाकर पार्टी,उन्हाळ्यात कच्चा-चिवडा-आईस्क्रीम पार्टी तर हिवाळ्यात चुलीवरच्या जेवणाचा बेत, शिवाय तिथे राहाणाऱ्या प्रत्येकाचे बर्थ डे,ॲनिव्हर्सरी , कुणाला मिळालेलं प्रमोशन सगळं काही सगळे मिळून साजरं करायचे,.. शिलेदार वाड्यात राहाणारी ती १० बिऱ्हाडं वेगवेगळी नसून ,१०बिऱ्हाडांचं मिळून एक मोठ्ठं कुटुंबच होतं त्यांचं,,

या वाड्यात होणारी ही पहिलीच दोन लग्न असल्याने सगळेच खूप आनंदात होते .. जणू संपूर्ण वाड्याला आनंद आणि उत्साहाचं भरतंच आलं होतं..

शरयू आणि अवनिश दोघंही लग्न जमल्यामुळे खूप खूश होते. अवनिशचं लव्ह मॅरेज असल्यामुळे त्याचा प्रश्नच नव्हता.

पण, शरयूच्या मनात आता नवनवीन प्रश्नांनी डोकावायला सुरुवात केली होती, दुपारची जेवणं झाल्यावर शरयू जरा वेळ लोटली, आणि अवघ्या पाच मिनिटांत असंख्य विचारांनी तिच्या मनाला घेरून टाकलं होतं, सगळ्यात आधी तर या वाड्याला आणि वाड्यातल्या तिच्या सुंदर कुटुंबाला सोडून जाण्याच्या कल्पनेनेच तिला भरून आलं होतं. तसंच आता लग्नानंतर परगावी जायचं,सगळेच नवीन असणार.

त्यात अजून एक गोष्ट म्हणजे त्यांनी सांगितलं की ते लोक फार धार्मिक आहेत, रोजची उपासना

सोवळ्यात स्वयंपाक,नैवेद्य ,यात मला तसा फारसा रस नाही, आपल्या वाड्यात मला कधी ते करावंच लागलं नाही आणि आताच्या काळात माझ्या बरोबरीच्या मुली उत्साहाने अशा गोष्टीत सहभागी होताना दिसतही नाही,त्याचं फार दडपण आलंय, लग्नानंतर मला झेपलं नाही तर नाही जमत सांगून मोकळी होणार मी,असं तिनं मनाशी ठरवून घेतलं.

दुसरा प्रश्न म्हणजे एका व्यावसायिकाच्या घरात जन्मलेल्या मुलीनं पुढील आयुष्य नोकरी करणाऱ्या व्यक्तीसोबत राहाणं यात खूप मोठी तफावत होती. हे तर जाऊ दे.

पुढचा मुद्दा जास्त महत्त्वाचा तो म्हणजे, नोकरी करणाऱ्या कुटुंबात आत्ता संमती दर्शवली असली तरी मला प्रत्यक्ष व्यवसाय करायची वेळ आल्यावर किती सपोर्ट केला जाईल याबाबत ती साशंक होती कारण मुळात तिचा पिंड हा व्यवसायिकाचाच होता.. मग घरच्यांनी सपोर्ट केला नाही तर मी काय करू, माझ्यासाठी सगळं काही बंद होईल ..

असे एक ना अनेक, नवनवीन प्रश्न तिला विचार करायला भाग पाडायचे.

पण त्यावर काहीच उपाय नव्हता, कारण आता हे प्रश्न घरच्यांसमोर ठेवले तर ते फारच चिडतील. याचं कारण म्हणजे या आधी बऱ्याच मुलांना तिने नाकारलं होतं,बराच विचार केल्यावर हा मुलगा तिला पटला म्हणून तिनं होकार दर्शविला, पण तरी सुद्धा मुलीचं मन हो ते..! ते ही नव्या पिढीतल्या..! एखादी गोष्ट मनासारखी झाली म्हणून तितक्यावर समाधान थोडीच होतंय आणि त्यांच्या दृष्टीने त्यात काही चूकीचंही नसतं.

पण आत्ता या क्षणी या सगळ्या प्रश्नांची उत्तर तिला स्वत:ची स्वत:च शोधायची होती..

विचार करता करता संध्याकाळ कशी झाली तिला कळलंच नाही.. संध्याकाळी वाड्यावरच्या चौकात सगळे एकत्र येणार होते, ती भानावर

आली आणि सगळे विचार बाजूला सारून तयारीला लागली.

थोड्याच वेळात एक एक करत सगळे जमले, वाड्यातल्या सगळ्या जणी चौकाच्या अलीकडे एक जागा होती तिथेच घोळका करून बसल्या, मग तिथे खऱ्या अर्थाने गप्पांना, चर्चांना सुरुवात झाली. आता लग्नाची तयारी कशी करायची, काय काय करायचं. विघ्ने काकू म्हणाल्या,अगं सुचित्रा खूप तयारी करावी लागते बरं, कपडा, दागिने,अहेर, रुखवत, विहीणीची पंगत आणि आजकाल तर खूप नवनवीन पध्दती आल्यात. मुलींना प्रत्येक कार्यक्रमाचे वेगवेगळे कपडे, त्यावर साजेसे दागिने वगैरे खूप काही. या वाड्यात सगळ्यांची एकमेव आवडती वहिनी होती 'रूचिरा' ती म्हणाली, "काळजी नका करू काकू मला या नवीन प्रकारांची पूर्ण कल्पना आहे त्यामूळे मी आणि शरयू मिळून ही बाजू सांभाळून घेऊ.

शरयू विघ्ने काकूंना म्हणाली "काकू तुमच्या वेळी नव्हतं ना हो असलं काही, मग आतासारखी मजा येत नसणार त्यावेळच्या लग्नात ?"

विघ्ने काकू म्हणाल्या "आमच्या वेळी लग्नं साधेपणाने होत असली तरीही त्यात वेगळी मजा असायची, तुम्हा मुलींना नाही कळणार.

शरयू लहानपणापासून स्वतःच्या आजीपेक्षा माईंजवळ जास्त राहिलेली,वाड्यात माईच सगळ्यात मोठ्या त्यामूळे सगळ्यांनाच त्यांच्यविषयी फार प्रेम होतं , आणि शरयूला तर विशेष,त्यांनीही तिला खूप जीव लावलेला ,ती माईंना म्हणाली" "माई एक विचारू का हो? "

"अगं त्यात काय , विचार होऽ अगदी मोकळेपणाने तुला जे विचारायचंय ते विचार" माई म्हणाल्या.

शरयूने विचारलं "माई ,तुमची काय स्वप्न होती हो जोडीदाराविषयीची?"

ते ऐकून माई खूप हसल्या आणि म्हणाल्या

"अगं बाळा, आमच्या वेळी अशी काही

स्वप्न पाहाता येतच नव्हती, त्याला कुणी विचारत देखील नव्हतं. घरच्यांना योग्य वाटेल तोच आपला जोडीदार, पण खरं सांगू माझंही स्वप्नं होतं, वाटायचं एखादा उंच, देखणा रूबाबदार असा कुण्या शाळा/महाविद्यालयाचा प्राध्यापक,. ज्याला शिक्षणाविषयी विशेष प्रेम आहे असा माझा जोडीदार असावा.कारण मला शिकण्याची फार आवड होती,माझी शिक्षणाची आवड तो खूप प्रेमाने जोपासेल, असं मला वाटायचं.

पण मला मात्र मिळाले सडपातळ बांध्याचे छोटे पोस्टमास्तर, अतिशय शिस्तबद्ध, आणि स्वभावाने कडक..,हे जरी झालं तरी, आमच्या सासूबाईंनी मला शिक्षणासाठी नेहमीच प्रोत्साहन दिलं. त्यासाठी सुरवातीची काही वर्षे मला त्यांची खूप मनधरणी करावी लागली, त्या स्वत: शिक्षिका असल्याने मला शिक्षणाची मनापासून आवड आहे का हे पाहण्यासाठी त्यांनी अनेक प्रकारे माझी परीक्षा घेतली आणि मगच शिक्षणाची परवानगी दिली, घरातली सगळी मुख्य कामं आणि अंथरूणावर असलेल्या आजेसासुबाईंची सुश्रुषा, मुख्य म्हणजे आजे सासूबाईंना सोवळ्यात केलेला स्वयंपाकच लागायचा, आणि देवाला नैवेद्य दाखवल्याशिवाय त्या जेवत नसे,त्यामुळे सवय नसताना, आवडत नसतानाही मी ते सगळं करावं लागत होतं आणि मी ते करायची कारण मला शिकायचं होतं, आणि हे सगळं केल्यावरच मला घराबाहेर जाता येत असे,पण माझ्या आजे सासुबाईंना मी शिकत होती ते पटलं नाही, त्यामुळे ऐन परीक्षांच्या दिवसांत त्या "माझा जीव कसा कसा होतोय" म्हणून मला रात्रभर जवळ बसवून ठेवायच्या.

त्या करत असलेलं हे सगळं नाटक आहे हे मला त्या आमच्या भांडिवालीला सांगत असताना ऐकलं तेव्हाच कळलं होतं, पण करणार काय

स्वभाव असतो एकेकाचा म्हणून दुर्लक्ष करायला शिकले.

मात्र माझ्या सासुबाईंनी माझ्या मुलांचं योग्य पध्दतीने संगोपन, त्यांच्यावरचे संस्कार, त्यांचं शिक्षण,सवयी , शिस्त शिवाय एक आजी म्हणून त्यांचं कोडकौतुक आणि लाड यात त्यांनी कसलीही कसर सोडली नाही, हे विशेष उल्लेखनीय आहे. ”माईंचं बोलणं ऐकल्यावर शरयू म्हणाली "बापरे ,माई कमाल आहे हं तुमची, तुमच्या जागी मी असते तर सगळं सोडून निघून आले असते."

"अगं आत्ताच्या सारखं त्यावेळी चालत नव्हतं,तो काळ फार वेगळा होता.."माई म्हणाल्या.

नंतर सुचित्रा सांगत होती

"तुझं नोकरी करण्याचं स्वप्न पूर्ण होईल हा मी तुला शब्द देतो" हे पहिल्यांदाच कॉफी हाऊसमधे झालेल्या भेटीत शरयूच्या बाबांनी मला दिलेले शब्द आजही तिथेच थांबले आहेत असंच मला वाटतं..

लग्न करून घरी आल्यावर नोकरी करण्याविषयी विचारले तेव्हा सासुबाई म्हणायच्या "घरातली कामाची ओझी आम्ही वाहायची आणि तुम्ही नोकरीच्या नावाखाली घराबाहेर फिरायचं हे बरं आहे गं तुम्हा मुलींचं."

तेव्हा नोकरीचा नाद सोडून, व्यवसायात जे आपल्याला जमतं असेल ते करण्याचा विचार केला,.. तेव्हा, त्यामुळे मनाशी ठरवलं तर इच्छेविरुद्ध जाऊनही एखादं काम करता येऊ शकतं आणि मनापासून केलं तर त्यात यशस्वी सुध्दा होता येतं हे कळलं, सासुबाईंचे सारखे उपदेश सुरू असायचे, त्यावेळी ते चुकीचे आणि नकोसे वाटत असले तरी आता ते खूप मोलाचे असल्याची जाणीव होते त्या म्हणायच्या "व्यवसायासोबत स्वत: पुढे पुढे जात असताना मागे असलेलं आपलं घर,आपली माणसं,

नाती यांचा विसर पडू देऊ नका, आयुष्यात ती सुद्धा तितकीच महत्त्वाची असतात."

"पण एक मात्र खरं,या सगळ्यात नोकरी करण्याची इच्छा अपूर्णच राहिली याची खंत मनाला आयुष्यभर राहील"सुचित्रा सांगत होती.

शरयू म्हणाली "आई ,पण तू त्यावेळी तुझ्या नोकरीच्या निर्णयावर ठाम राहिली असती तर आज ही खंत उरली नसती ना गं,"..मी नाही असं करणार कधीच.., शरयू पुढे बोलत होती

मला सांगा ,आपण स्वत:च्या विचारांचा आदर केला नाही, स्वत:च्या इच्छांना पूर्णत्वास नेऊ शकलो नाही, स्वत:ला जे हवं ते मिळवलं नाही, तर या जन्माचं सार्थक झालं असं म्हणताच येणार नाही.."

"शरयू तसं नसतं गं "

माई बोलत होत्या

"आपण जे करू शकलो नाही त्यांची खंत बाजूला ठेवून जे केलंय जे मिळवलंय त्यात समाधान मानायला शिकलो ना तर आयुष्य अधिक सुखकर होतं"

"पण माई, तुम्हालाही वाटलं असेलच ना कधी की ,आज हा फक्त नि फक्त माझा दिवस,एक दिवस फक्त स्वत:साठी जगावं, किंवा काही काळ जोडीदार आणि आपण दोघंच राहावं, फिरावं ,बोलावं, एकमेकांना वेळ द्यावा" शरयू विचारत होती ..

"अगं त्यावेळी असं कधी वाटलं नाही , त्यावेळी असे विचार कुणाच्याच मनात येत नव्हते,तो काळ , आणि त्यावेळच्या पध्दती सगळंच खूप वेगळं होतं..

आज काळ बदललाय, काळाप्रमाणे विचार, पध्दती, गरजा, मागण्या सगळंच बदलत जातं आणि त्यात चूक आहे असं अजिबात म्हणता येणार नाही. पण म्हणून आमच्या वेळचे विचार, पध्दती चूकीच्या ठरवता

येतील असंही नाही." माई बोलत होत्या.

"आपण जे करू शकलो नाही त्यांची खंत बाजूला ठेवून जे केलंय जे मिळवलंय त्यात समाधान मानायला शिकलो ना तर आयुष्य अधिक सुखकर होतं"

"पण माई, तुम्हालाही वाटलं असेलच ना कधी की ,आज हा फक्त नि फक्त माझा दिवस,एक दिवस फक्त स्वत:साठी जगावं, किंवा काही काळ जोडीदार आणि आपण दोघंच राहावं, फिरावं ,बोलावं, एकमेकांना वेळ द्यावा" शरयू विचारत होती.

अगं त्यावेळी असं कधी वाटलं नाही,

त्यावेळी असे विचार कुणाच्याच मनात येत नव्हते,तो काळ , आणि त्यावेळच्या पध्दती सगळंच खूप वेगळं होतं.

आज काळ बदललाय, काळाप्रमाणे विचार, पध्दती, गरजा, मागण्या सगळंच बदलत जातं आणि त्यात चूक आहे असं अजिबात म्हणता येणार नाही.

पण म्हणून आमच्या वेळचे विचार,पध्दती चूकीच्या ठरवता येतील असंही नाही." माई बोलत होत्या..

शरयू म्हणाली माई याचा अर्थ असा की," प्रसंगी तडजोड, समाधानी वृत्ती, इतरांच्या विचारांचा आदर,जुन्या पिढीतल्या या आणि अशा बऱ्याच गोष्टींचा नव्या पिढीने स्वीकार केला तर माणसं जोडता येतील,नाती जपता येतील ,सुखी आयुष्य जगता येईल..

आणि दिलखुलासपणा,स्वच्छंदी वृत्ती, पुढारलेले विचार, हुशारी,नव्या बदलांचा स्वीकार, नव्या पिढीतल्या या आणि अशा बऱ्याच गोष्टींचा स्वीकार जुन्या पिढीनं केला तर आयुष्याचा मनमुराद आनंद लुटता येईल.. बरोबर ना हो"

थोडक्यात काय तर, जुन्या-नव्याची सांगड घालून आयुष्य जगलं

तर आपणच आपल्या आयुष्यातला प्रत्येक क्षण अविस्मरणीय करू शकतो हे शरयूला आता उमगलं..

खरंतर नव्या आयुष्याची सुरुवात करताना वाड्यातल्यां कडून विचारांच्या रुपाने तिला मिळालेला अनमोल दागिना ती तिच्या मनाच्या तिजोरीत कायम जपून ठेऊ शकणार होती..

जणू माहेरचा अहेरच होता तो..

# निसर्गाचे देणे : भारतीयांचे लेणे

स्मिता होटे

आज साराच्या घरात खूप लगबग होती. तिच्या वहिनीचं डोहाळजेवण होतं .ती सारी लगबग तिची अमेरिकेतील मैत्रीण ॲना कुतुहलाने न्याहाळत होती. तिच्या मनाली वहिनीला ती आणि तिची आई फुलांनी सजवत होती.

अमेरिकेत चौका चौकात रंगीबेरंगी फुलांनी लगडलेली झाडे तिच्या नित्य दृष्टीस पडायची पण फुलांचा उपयोग असाही करता येतो ही भन्नाट कल्पना तिच्या विचारापलीकडे होती. तिची आंटी महाराष्ट्रीयन असल्यानं तिला इथल्या संस्कृतीबद्दल प्रचंड उत्सुकता होती. त्यामुळे ती मुद्दाम सारासोबत भारतात आली होती. ताईंचं लग्नाच्या निमित्तानं सारा भारतात जाणार आहे असं कळताच, तिने लगबगीने तिचा विजा काढून ठेवला होता.

आज मनालीला असं का सजवत आहेत? असा तिचा निरागस प्रश्न होता. बरोबरच आहे, लिव्ह इन रिलेशन मध्ये राहणाऱ्या तेथील तरुणाईला आपल्या येथे गर्भवतीचे होणारे हे कौतुक जरा नवलाईचेच होते. ती फुलांच्या एकेका दागिन्याचं नाव विचारत होती. फुलांचा मुकूट, कमरपट्टा, बाजूबंद, वेणी, डुल, गजरे साराच्या आईने सुनेसाठी हौसेनं आणलं होतं. पाळणा रंगीबेरंगी फुलांनी सजविण्यात आला होता.

दारासमोर फुलांची सुंदर रांगोळी, फुलांचे तोरण अशी सगळी फुलांची सजावट मनमोहक दिसत होती. सगळीकडे फुलांचा दरवळ पसरला होता .साराच्या सहवासात शिकलेल्या मोडक्या तोडक्या हिंदीत ॲनाने आईला विचारलं," ये ऐसे सब लोख करते है ख्या? आई माहिती पुरवत होती " हो ना .आमच्याकडे ही खूप प्राचीन परंपरा आहे." "प्राचीन म्हणजे किती जुनी?" साराने विचारलं?" अग अगदी वेदकाळापासून हे सुरू आहे म्हणजे

बघ, पाचसहा हजार वर्ष नक्कीच झाली असतील." O my god! ॲनाने आश्चर्याने डोळे विस्फारले. आता सारा दुभाषाचं काम करू लागली. आईने ॲनालाही सजावटीच्या कामात सामील करून घेतलं.

"मुलगी वयात येते ना, तेव्हा सुद्धा तिला फुलांच्या मखरात बसवून असेच सजवतात" "अय्या हो मी तर कधीच पाहिलं नाही?"

सारा म्हणाली.

"अगं, आता ती प्रथा प्रचलित नाही पण आमच्या वेळी हे सारं करायचे.हा सृजनाचा सोहळा असायचा. स्त्रिला लाभलेल्या सृजनाचा तो सन्मान असायचा. त्यानंतर विवाहित स्री जेव्हा पहिल्यांदा गर्भवती असते तेव्हा तिची ओटी भरून, तिला फुलांनी सजवून, सर्वांना बोलावून तो आनंदोत्सव साजरा करतात ". आईने एका दमात सगळं सांगितलं पण ट्रान्सलेटर म्हणून साराची फारच दमछाक होत होती. ओटी ,मखर,सृजन ह्या अस्सल भारतीय शब्दांना इंग्रजीत पर्यायच नव्हते.

भारतीय अलंकार ॲनाला फार आवडायचे.तिने इथे आल्यावर बांगड्या, माळा, अंगठी इत्यादी बरेच काही खरेदी केले होते. पण आज तिला भारतीय अलंकारांच्या सर्व प्रकाराबद्दल जाणून घ्यायचं होतं. आज हळदी कुंकवाची गडबड असल्यामुळे मनालीने तिला समजावले की मी उद्या तुला सर्व सविस्तर सांगेन. ॲना अंथरुणावर पडली तरी तिला झोप येईना .तेव्हा साराने तिला सांगितले, "अग, झोप तू आता.उद्या मनाली तुला सगळं सविस्तर सांगेल कारण तिची पीएचडी याच विषयावर आहे."

उद्याची उत्सुकता उशाला घेऊन ॲना निद्रादेवीच्या अधीन झाली.

सकाळी नाश्त्यासाठी एकत्र जमले तेव्हा ॲना मनालीला म्हणाली,"now tell me everything about the tradition of decoration and all the types of ornaments."

मनाली सांगू लागली.

"अग, अलंकार हा भारतीय स्त्रियांचाच नव्हे तर पुरुषांचाही आवडीचा विषय सात आठ हजार वर्षापासून ही परंपरा आहे."

ॲनाचे डोळे विस्फारले ती म्हणाली,

" हे अलंकार फक्त फुलांचेच असतात का?" छे ग, फूल, चांदी, सोने, मोती, हिरे माणके कशाचेही असायचे पण फुलं सहजतेने मिळतात ना? आणि सर्वांना परवडणारे असतात नाही का? म्हणून नैसर्गिक अलंकार चलनात आले असावे." मनालीनेआता आपला प्रबंधच तिच्या समोर ठेवला. त्यातील देवी देवतांचे फोटो तिने दाखवले. त्यातील प्रत्येकीच्या हातात असलेले कमळ दाखवून तिने सांगितले की फार पूर्वी ही तरुणींमध्ये फॅशन होती की हातात एखादं फूल घ्यायचं.

"अच्छा म्हणजे , आपण जशी स्टायलीश पर्स मिरवतो किंवा महागडा मोबाईल मिरवतो अगदी तसंच ना?" सारा वदली "होय अगदी तसंच आणि शिवाय कानात फुलं, मनगटावर गजरे, गळ्यात फुलांच्या माळा, केसात गजरे, भांगात बिंदीसारखे फुलं असा सगळा फुलांचा शृंगार असायचा.

"याला काय पुरावा?"साराने शंका घेतली, तेव्हा मनालीने कालिदासाचा मेघदूतातील श्लोकच म्हटला . "शिवाय हा साजशृंगार श्रीमंत तरुणी करत असे नव्हे तर अगदी मजूरस्त्रिया वगैरे करत" मनाली म्हणाली.

"स्त्री कोणत्या का कॅटेगिरीतील असो स्वतःला सजवणं, मटकणं हा कॉमन फॅक्टर आहे नाही?"हसत हसत सारा म्हणाली

"अगं अजुन एक फॅशन त्याकाळी होती. गव्हाची ओंबी किंवा आम्रमंजिरी कानावर खोवत.शिंपी जसा पेन्सील कानावर ठेवतो अगदी तशी" मनालीने पुष्टी जोडली "wow very interesting!" ॲना उद्गारली.

तिला प्रबंधातील देवदेवतांचे फोटो दाखवून मनालीने सांगितले की प्रत्येक देवतेच्या गळ्यात हार असतो

तसा पूर्वी प्रत्येक सुसंस्कृत व्यक्ती स्नान आटोपल्यावर अंगाला चंदनाचा लेप लावी. कपाळाला तिलक लावी आणि मग फुलांच्या माळा घालून घराबाहेर पडे".

"हेच सारे उपचार आपण देवपूजेतही करतो "आई स्वंयपाक करताना म्हणाली.

"अगदी बरोबर! तात्पर्य काय? जे जे साजश्रृंगार आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग होते तेच षोडशोपचार म्हणून पूजेत आले आणि.....

"आणि तेच सोळा शृंगार म्हणून स्त्रियांमध्ये प्रचलित झाले असेच ना?" मनालीला मध्येच अडवत साराने पुष्टी जोडली. आज रोज हार घालण्याची पद्धत नसली तरी साक्षगंध, लग्न, मौंज डोहाळजेवण इ. प्रसंगी हारांना असलेलं महत्व त्याच परंपरेचे अवशेष आहे."

"अगं वहिनी, भरतनाट्यम् सारख्या भारतीय नृत्यप्रकारातही फुलांचे महत्व आहेच." नृत्यविशारद झालेल्या साराला एकदम आठवले

अग बरी आठवण करून दिलीस भरतमुनींनी आपल्या 'नाट्यशास्त्र' या ग्रंथात फुलांच्या अलंकाराचे, ते कसे धारण करायचे यावरून चार प्रकार सांगितले.ते कसे गुंफायचेयावरून त्याचे आठ प्रकार सांगितले आहेत."

"यावरून फुलवाले त्याकाळी चांगलेच कलाकार असावेत असं वाटतं"साराने निष्कर्ष काढला.

"खरय तुझं, दोन हजार वर्षापूर्वी वात्सायनाने लिहिलेल्या 'कामसूत्र' या ग्रंथात वरील कलेला चौसष्ट कलांमध्ये स्थान दिले.आणि या संबंधी पहिली कला 'माल्यग्रथन' दुसरी कला म्हणजे 'शेखरकापीडयोजना'.

"काय अर्थ होतो या शब्दाचा? ॲनाच्या तर डोक्यावरून जाईल" सारा डोळे मिचकाऊन म्हणाली .ॲनाला साराचा रोख लक्षात आला. ती म्हणाली, "though I am not getting every-thing but I know it very well that

India was very advance country from ancient time, isn't it? "

"absolutely right my baby!" मिताली कौतुकाने म्हणाली.

"माल्यग्रथन म्हणजे माळा गुंफण्याची कला आणि केसांवर आणि केसांवर गजरे माळायची कला म्हणजे शेखरकापीडयोजना. आज विवाहप्रसंगी वधूच्या केशरचनेवर फुलांची, गजऱ्यांची कलात्मक योजना करतात तीच ही कला! आणि एक गंमत, काल माझा मेकअप करायला जशी ब्युटिशिअन आली होती ना तशीच फार पूर्वीही यायची तिला प्रसाधिका म्हणत असत." "अरे वा इन्टरेस्टींग!"सारा उल्लसित होऊन म्हणाली.

मनाली पुढे सांगू लागली, "स्त्रियाप्रमाणे पुरुषांसाठी प्रसाधक होते याचा उल्लेख कालिदासाच्या साहित्यात अनेकदा येतो आणि विशेष म्हणजे केवळ सुंदर दिसण्यासाठीच हे फुलांचे अलंकार घालत नसत तर त्यांच्या सुगंधाने घामाची दुर्गंधी दूर व्हावी हाही उद्देश असावा"

आता ॲनाच्या हळूहळू लक्षात आलं की कालच्या कार्यक्रमात प्रत्येक महिलेच्या केसांवर गजरा किंवा फूल होतेच याचे मूळ या परंपरेत दडले आहे.भारतीयांनी आपल्या साऱ्या परंपरा आजतागायत जपल्या याचे तिला मनोमन कौतुक वाटले. तिने मनालीच्या खोलीतून कालचे सगळे फूलांचे दागिनेआणले. थंडीमुळे ताजे वाटणारे ते सगळे दागिने तिने स्वतःच्या अंगावर चढविले. साराकडून यथेच्छ फोटो काढलेत आणि सारे फेसबूक अन् इन्स्टाग्रामवर पोस्ट करून लिहीले 'I love India and Indian ornaments too'!

# ओवाळणी

मीनाक्षी मोहरील

पंधरा दिवसांपूर्वी दीपकचा फोन आला.

"शारदा, काहीही कारण न सांगता दिवाळीत इथे यायचं आहे हं.... आपण ठरवलं आहे नं तसं ?"

" हो दीपक, माझ्या चांगलं लक्षात आहे, नक्की येणार आहे मी. आई बाबा बरे आहेत नं रे? आणि तुझी कशी आहे तब्येत मुख्य ?"

" माझी मस्त गं शारदा... आणि आई बाबा ही छान आहेत.तू बरी आहेस नं ? कधी येणार तसं कळलं, म्हणजे घ्यायला येईन. "

" मी छान रे दीपक, कळवते मी तुला.... पण घ्यायला नको येऊन,मी कारनेच येईन. फार काही दूर नाही यायचं. अमरावती नागपूर काही खूप अंतर थोडीच आहे? "

" बघ , काय ठरवतेस ते, सांभाळून मात्र ! ठेवतो गं, भेटू " ....

" हो दीपक, भेटू....बाय...."

फोन ठेवला आणि गेलं अख्खं वर्ष माझ्या डोळ्यांसमोर सरकून गेलं.

दीपक तसा माझा लहान भाऊ, दोनच वर्षांनी लहान.

त्यामुळे एकाच वयाचे असल्यासारखे रहायचो आम्ही.

खेळायचो, भटकायचो, सोबत असल्यास, आणि कधीतरी सोबत बोलणीही खायचो. दोघेही भावंडं आम्ही शिक्षणात बरे होतो. शिष्यवृत्ती घेत मी डॉक्टर झाले आणि दीपक इंजिनिअर झाला.

मी गायनाकोलॉजिस्ट होऊन 'बर्थ पॅलेस' नावाने स्वत:चं हॉस्पिटल थाटलं आणि थोड्याच अवधीत ते चांगलं नावारूपाला येऊन भरपूर प्रतिसाद मिळायला लागला. दीपक एका मोठ्या प्रसिद्ध कंपनी मध्ये लठ्ठ पगारावर नोकरीला लागला.आम्ही

दोघेही भावंडं आपापल्या नोकरी, व्यवसायात व्यवस्थित स्थिरावलो.

यथावकाश दोघांची लग्न होऊन आमच्या घरसंसार , मुलाबाळात रमलो. माझा नवरा श्रीमोहन डॉक्टर असला तरी सैन्यात असल्याने कुटुंबापासून दूर बहुतेक वेळा सीमेवर तैनातीत असायचा.

आम्हा दोघा भावंडांचे व्यवसाय, नोकरी दणकून सुरू होतं. धावतपळत का होईना, एखाद्या रात्री मी माहेरी मुक्काम करून यायचे. हॉस्पिटल मुळे केव्हाही अर्ध्या रात्री सुद्धा परत यावं लागायचं, पण एकुण आम्हा भावंडांचे संसार चांगले सुरू होते. माझ्या दोघी मुली आणि दीपकच्या दोघा मुलांनी आमचे संसार परिपूर्ण होते. आई बाबा ही त्यांच्या मुलांच्या संसारात, नातवंडांचे खुश होते, तृप्त होते.सगळं सुरळीत चालू आहे म्हटलं की, काहीतरी संकट समोर ठाकलंच पाहिजे,असा सर्वसाधारण नियमच असतो नं? तसंच काहीसं झालं खरं. कुणाची तरी दृष्टच लागली की काय, असं सारखं मनात यायला लागलं.

दीड वर्षापूर्वी साधारण माझ्या त्रासाला सुरुवात झाली. काय झालं समजेचना. एकाएकी प्रचंड गळल्यासारखं वाटायला लागलं. झपाट्याने वजन कमी व्हायला लागलं . जेवणावरची वासना नाहीशी होत चालली, आणि जन्मोजन्मीचा थकवा आल्यासारखं काहीतरी....

सुरुवातीला स्वत:ला माहिती असलेलेच उपचार तात्पुरते म्हणून करून बघितले. पण कशाचा काही उपयोग होईना. रोज एखादं वेगळ्याच प्रकारचं दुखणं डोकं वर काढी. कधीतरी पायांवर सूज येई, कधी संपूर्ण अंग सुजून जाई, कधी प्रचंड डोकं दुखायला सुरुवात होई तर कधीतरी अचानक रक्तदाब खूप जास्त वाढून जाई. शेवटी एक दिवस सारं असह्य वाटायला लागलं. अंगभर सूज आलेली आणि मानेच्या किंचित वरून संपूर्ण डोकं दुखायला लागलं. मी स्वतः एक डॉक्टर असून हतबल होऊन गेले, असहाय्य झालेल्या होते. शेवटी

नागपूरच्या एका प्रख्यात डॉक्टरची अपॉईंटमेंट घेऊन त्यांच्याकडे गेलो.

दीपक सतत सोबत होता, धावाधाव करायला.

ही टेस्ट , ती टेस्ट, एक्स रे , सोनोग्राफी, सी टी स्कॅन पॅथालॉजी या सगळ्या प्रकारात बी पी आणि थकवा आणखीनच वाढला. मनावर प्रचंड दडपण आलं. शेवटी नको तेच वाटेला आलं. सगळ्या टेस्ट्सचे रिपोर्ट्स आल्यावर त्यातून दोन्ही किडनीज निकामी झाल्याचं लक्षात आलं.एक डॉक्टर असून सुद्धा माझ्या पायाखालची जमीनच सरकली. दोघी मुली शाळेत शिकणाऱ्या, हॉस्पिटलचा वाढलेला एवढा मोठा पसारा, माझा मेंदू पार बधीर होऊन गेला. डॉक्टर म्हणत होते,

" मी तात्पुरती ट्रीटमेंट सुरू करतोय... पण ऑपरेशन शिवाय दुसरा काहीही पर्याय नाही. प्रत्यारोपण हाच एकमेव इलाज आहे, तो ही शक्य तितक्या लवकर करायला हवाय....."

मी अंगभर शहारले. एवढं मोठं ऑपरेशन, डोनर कोण मिळणार? त्यातून ही शंभर टक्के जीव वाचेल ही खात्री नाहीच. हॉस्पिटल कडे कोण बघणार? श्रीमोहन कितीतरी दूर.... मुलींचं कसं होणार? दीपक केव्हातरी पाठीशी येऊन उभा होता.त्याने डोक्यावर हात ठेवला आणि माझे डोळे काठोकाठ भरून आले.

"शारदा, अगं काय हा वेडेपणा? होईल सगळं चांगलं.... तू स्वत: डॉक्टर आहेस, माझ्यापेक्षा या क्षेत्रातील जास्त माहिती तुला आहे. मेडिकल सायन्स इतकं समोर गेलं आहे, कशाला इतकी काळजी करतेस? मी बोलतो डॉक्टरांशी, आणि काय करायचं ते बघतो.ठीक आहे नं?"

दीपकच्या बोलण्याने मी बरीच शांत झाले. पण मनाची घालमेल काही कमी होत नव्हती. दीपक धीटपणे डॉक्टरांच्या केबीनमध्ये जाऊन त्यांच्याशी बरंच काही बोलत होता. मी बाहेरच डोळे मिटून शांत बसून राहिले. जरा वेळाने डॉक्टरांनीच मला आत

बोलावून घेतले. मी बरीच सावरले होते. आत जाऊन मी दीपकच्या बाजूला बसले. एक डॉक्टर असल्याने त्यांनी सांगितलेल्या गोष्टी मला लवकर आणि व्यवस्थित समजल्या.

दीपक त्याची एक किडनी मला देणार होता. पण त्यासाठी खूप प्रकारच्या अनेक टेस्ट्स , किडनी मॅच होणं अनंत भानगडी होत्या. सगळं तातडीने करणं गरजेचं होतं. वेळ वाया घालवून चालणार नव्हतं. पुढच्या सगळ्या गोष्टी भराभर घडत गेल्या. देवाच्या दयेने काहीही अडथळे न येता सगळ्या टेस्ट्स व्यवस्थित पार पडल्या . सर्व रिपोर्ट्स पाहिजे तसे आले,मग मात्र एकच धावपळ उडाली, गडबड नुसती !

समोर तोंडावर दिवाळी होती. दोघी मुली बावरून गेल्या होत्या. श्रीमोहन काळजी करण्या पलीकडे काही करू शकत नव्हता.तो सध्या येऊच शकत नव्हता. ठराविक वेळेत फक्त बोलावं लागायचं.

दीपकसाठी मला मनोमन फार फार वाईट वाटत होतं. बिचाऱ्यानी माझ्या साठी केवढी मोठी जोखीम पत्करली होती. स्वत:च्या जीवावर उदार होऊन बहिणीच्या आयुष्यासाठी तो किती तरी मोठा त्याग करायला निघाला होता. दीपकच्या पत्नीने , लताने एकाही शब्दाने विरोध केला नव्हता.आई बाबांनी सगळ्या देवांना साकडं घालत कितीतरी नवस बोलून ठेवले होते.दिवाळी नावापुरतीच व्हायची होती. लक्ष्मीपूजन करून दुसऱ्या दिवशी ॲडमिट व्हायचं होतं. भाऊबिजेच्या दिवशी सकाळी सात वाजता प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया शस्त्रक्रिया व्हायची होती. मुलींना घेऊन मी दिवाळीच्या आधीच नागपूरला जायचं असं ठरलं. भराभर हालचालींना वेग आणला.आधी हॉस्पिटल साठी एक अनुभवी आणि एक नवीन नावारूपाला आलेल्या डॉक्टर्सची सोय लावली. बाकी हॉस्पिटलचे व्यवहार बघायला माझी जिवलग मैत्रीण माणिक ताबडतोब तयार झाली. आणि मी केवढी तरी

निश्चिंत झाले.

मुलींना हळूहळू सारं समजावून सांगितले. बॅग्ज भरून तयार केल्या. मुलींना आणि भाच्यांना खाऊ म्हणून थोडेफार फराळाचे पदार्थ तयार करून घेतले. श्रीमोहनशी रोज पण फक्त पंधरा मिनिटांत बोलावं लागायचं. त्यानी समाधान नाही व्हायचं पण बळ यायचं. त्याच्या मनाची घालमेल तर केवढी मोठी!

पण त्याने कधी शब्दात नाही जाणवू दिली. कधीतरी बोलताना आवाज भरून आल्यासारखा जाणवायचा मात्र....!

शेवटी सारं मार्गी लावून मुलींना घेऊन मी नागपूरला निघाले. स्वत: ड्राईव्ह न करता, टॅक्सी बोलावली. मुली फार मोठ्या नव्हत्या. आपसात गप्पा मारत मलाही त्यांच्यात ओढण्याचा प्रयत्न करत होत्या. उसन्या अवसानाने मी त्यांच्यात सामील झाले, पण डोक्यात प्रचंड कोलाहल माजला होता.मन सरतील होत नव्हतं. गुरूमाऊलीचा जप आज मन शांत करत नव्हता. सारखी अशुभाची पाल मनात चुकचुकत होती. थकलेल्या मनानं मी डोकं मागे सीटवर टेकून घेत डोळे मिटून घेतले. मानसिक थकव्याने आणि एसी च्या गारव्यात मला झोप लागून गेली.

तीन तासांतच घरी येऊन पोहोचलो आम्ही.आई बाबा, दीपक लता सारे सर्वांगाला समोर आले. दीपक ने घाईने सारे सामान आत घेतले. तो आनंदात आणि उत्साहात होता. कोणत्याही प्रकारचा ताण त्याच्या चेहऱ्यावर, वागण्या बोलण्यात दिसत नव्हता. त्याच्या कडे बघून मी स्वत:ला सावरत होते. माझ्या डोक्यावर टपली मारत दीपक म्हणाला,

" शारदा, हांस बरं आता, अगं आपण काहीतरी चांगलं करायला निघालोय, काय अशी सतत तणावाखाली वावरते



"ती"चं पान
तिच्याकडून । सगळ्यांसाठी

आहेस?, तुझी मन:स्थिती मी समजू शकतो गं, पण तरीही सांगतो तुला, सगळं चांगलं होईल बघ. अशांनी आई बाबांना नाही का वाईट वाटणार? मुलींकडे बघ, त्याही कशा शांत होऊन गेल्यात.

“ Be brave शारदा!”

" हो दीपक, तू म्हणतोस ते बरोबरच आहे, पण मन ऐकत नाही रे.... नको तेच विचार मनात गर्दी करतात. म्हणतात नं, 'मन चिंती ते वैरी न चिंती' तसंच काहीसं झालं आहे सध्या.पण करते मी प्रयत्न " असं म्हणत निग्रहाने मी डोळ्यातील पाणी परतवून लावलं.

दिवाळीचे पहिले दोन दिवस पार पडले. अभ्यंगस्नान, लक्ष्मीपूजन साग्रसंगीत साजरं केलं. श्रीमोहनशी रोजंच बोलणं व्हायचं. हॉस्पिटलची फार चिंता नव्हती.

शेवटी एकदाचा ऑपरेशनचा दिवस उजाडला. सारं आवरून आम्ही दोघेही भावंडं निघालो.आई बाबा नातवंडांबरोबर घरी थांबणार होते. दीपकचा एक जिवलग मित्र आणि नागपूरला स्थायिक असलेला श्रीमोहनचा एक डॉक्टर मित्र आमच्या सोबत होते. लता बहिणीच्या मायेनी सतत माझ्या पाठीशी होती.

मनात गुरुमाऊलीचा जप सुरू होता. दीपक सातत्याने माझ्याशी काही ना काही बोलत होता. ऑपरेशनच्या आदल्या रात्री खूप वेळ गप्पा मारल्या आम्ही. रात्री सिस्टरने येऊन औषध व इंजेक्शन दिल्यावर मात्र गाढ झोप लागली.

सकाळी लवकरच सिस्टर आम्हाला उठवायला आली. पुन्हा औषध इंजेक्शन देऊन झालं . एकदा ऑपरेशन टेबलवर घेऊन अॅनस्थेशिया (भूल) दिल्यावर मात्र पुढचं काही समजलं नाही. किती तास ऑपरेशन चाललं माहिती नाही.कितीतरी वेळाने जडावलेले डोळे उघडले आणि परत बंद करून घेतले.काही समजत नव्हतं.

घसा कोरडा पडून जन्मोजन्मीची तहान लागल्यासारखं वाटत होतं. तोंडाला कडसर चव, ओठांची सालटं टोचत होती.

ओल्या जखमेची वेदना शरीरभर पसरली. असह्य वेदनेने डोळ्यातील अश्रू सैरभैर वाहत होते. हुंदका बाहेर पडू नये म्हणून ओठ दातात दाबून धरला होता.

एवढ्यात बाजुच्या बेडवरून जोरदार कण्हल्याचा आवाज आला.पाठोपाठ
"आई गं...... अरे देवा....! वाचवा
मला..... आई....आई ...... "

काळजात तापलेली सुरी फिरल्यासारखं वाटलं मला. दीपक वेदनेने तडफडत होता, पाण्याबाहेर असलेल्या भावासारखा. मला त्याचा आक्रोश ऐकवत नव्हता.

शेवटी हळूहळू सगळं व्यवस्थित झालं. वर्षभरात आम्ही आपल्या आपल्या ठिकाणी स्थिरावलो.

आज वर्ष झालं , मी दररोज देवाला म्हणते....

" देवा मला जन्मोजन्मी हाच भाऊ मिळू दे... आणि दीपक सारखा भाऊ सगळ्या बहिणींना मिळू दे...."

ऐन दिवाळीत भाऊबिजेला बहिणीच्या तबकात तिचे प्राणच ओवाळणी घालणाऱ्या माझ्या भावा बद्दल मला प्रचंड अभिमान आणि आदर मनात दाटून आला. मी त्याच भारलेल्या अवस्थेत जाण्यासाठी तयारी करायला घेतली. माझी आयुष्याची ओवाळणी मला कधीच मिळाली होती.

# समारोप

"ती" चं पान. जे फक्त तिचं असेल तिच्या हक्काचं असेल. तिच्या भावनेला शब्दबद्ध करण्याचं एक माध्यम. या माझ्या संकल्पनेला सगळ्यांनी आनंदाने होकार दिला आणि कुठल्याही चांगल्या हेतूने सुरुवात केलेलं कार्य हे सिद्धीस जातं याचं प्रमाण म्हणजे हे आगळंवेगळं मासिक असंच मी म्हणील..यात ज्यांनी ज्यांनी लेख लिहिले कविता लिहिल्या या सगळ्या सख्यांचं वाचन आणि लेखन संस्कृतीवर असलेलं प्रेम असंच राहावं अशी इच्छा व्यक्त करते. आपण हा छोटासा प्रयत्न गोड मानुन घ्याल या अपेक्षेसह माझ्या लेखणीला विराम देते.

धन्यवाद ...!

आपलं प्रेम असंच असू द्या.पुन्हा भेटूया पुढील महिन्यात नवीन विषय आणि मासिकांकासह...!

आणि हो, तुमच्या पैकी कुणाला या उपक्रमात सहभागी व्हायचे असेल तर तुम्ही नक्की सहभागी व्हा. आम्ही आपल्या प्रतिक्षेत आहोत. खालील QR कोड स्कॅन करून दिलेला गुगल फॉर्म भरून आपण या उपक्रमात सहभागी होऊ शकता.

फॉर्मची लिंक

तसेच तुमचा अभिप्राय आम्हाला tichapaan@gmail.com या आमच्या ई-मेल आयडीवर नक्की कळवा.



"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

तो शब्दमोहोर **ती** चा चहू दिशांत मोहरावा..

त्याच्या सुवासानेच केवळ आसमंत दरवळावा..!!

ती लेखणी दिवसागणिक **सायली** सम फुलावी..

अन् तिच्या फुलण्याची नित्यच, **अक्षय** रूपे असावी..!!

तो शब्दांचा सडा, **प्राजक्ता** सम अंगणी पडावा..

त्याचा **स्वर्णिम्** परिमळ मनामनात रुजावा..!!

त्या **जाई** च्या अपूर्वतेची गोडी सदा रहावी..

डोळ्यांच्या त्या **तृष्णेला** मग कसलीच भ्रांत नसावी..!!

या साऱ्यांच्या गंधाने ती **मृण्मयी** गंधित व्हावी..

पुन्हा एकदा तिच्यातूनच **ती** ची **निर्मिती** व्हावी..!!

ही सारी शब्द सुमने त्या **रेणुकेला** अर्पावी..

तिच्याच रंगी रंगून ही **भार्गवी** शब्दांकित व्हावी..!!

- भार्गवी बाबरेकर

# आमचे आधीचे प्रकाशित अंक

## अंकाच्या मुखपृष्ठावर क्लिक करून तुम्ही तो अंक ऑनलाईन वाचू शकता

